
# माणूस


एक समग्र साप्ताहिक



९६५ : महिना सप्टेंबर : भारत-पाक युद्धात विजयाचा क्षण आपले जवान पकडू पाहत होते....



पण ताश्कंद झाले. आयुबखान सुटले– जसे मागे महंमद घोरी सुटले तसे....पुन्हा उलटण्यासाठी..



## राजसूय...

पूर्वी राजे राज्यविस्तारासाठी राजसूय यज्ञ करीत असत.

## प्रजासूय...

आज काळ आहे प्रजासूय यज्ञाचा
प्रजेने, सर्वसामान्य जनतेने आपल्या विकासासाठी,
आत्मस्वातंत्र्याच्या संरक्षणासाठी आणि संवर्धनासाठी,
परस्परांच्या हिताची व देशाच्या उभारणीची लहानमोठी कार्ये
स्वयंप्रेरणेने पुढे येऊन सिद्ध करण्याचा.

## माणूस प्रतिष्ठान

म्हणजे 'माणूस' साप्ताहिकाच्या असंख्य वाचकांनी
स्वयंप्रेरणेने आरंभिलेला एक प्रजासूय यज्ञच आहे.
* विक्री झालेल्या दर अंकाच्या दर प्रतीमागे ४० पैशांतीलच एक पैसा
'माणूस प्रतिष्ठान' साठी (माणूस फौंडेशन) वेगळा शिल्लक टाकणे.
* या शिल्लक निधीतून सर्वप्रथम महाराष्ट्रातला एखादा
लहानसा मागासलेला भाग निवडून तेथे अन्नधान्य वाढीसाठी
उपयुक्त ठरणारी पाणीपुरवठ्याची काही कामे पुरी करणे—
विहिरी, तळी, एखादा छोटा तलाव इत्यादी.
येत्या २॥ वर्षात १। लाख रुपयांचा निधी
या कार्यासाठी उभा राहावा असा संकल्प आहे.
यासाठी 'माणूस' साप्ताहिकाच्या १। लाख प्रतींची विक्री
दर आठवड्याला होणे अवश्य आहे.





एक समग्र साप्ताहिक

वर्ष — सहावे

अंक : नववा

किंमत : चाळीस पैसे

वार्षिक वर्गणी : वीस रुपये

**संपादक**

श्री. ग. माजगावकर

**संपादक मंडळ**

अ. मा. साधू

दिलीप माजगावकर

सौ. निर्मला पुरंदरे

**व्यवस्था विभाग**

अ. वा. गंधे

अ. वि. गणपत्ये

पत्ता — ४९९ नारायण, पुणे २.

दूरध्वनी — ५७३५९



प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे संपूर्णपणे काल्पनिक आहेत.


## स. न. वि. वि.

दिनांक २० ऑगस्टच्या 'माणूस'मध्ये डॉ. वसंत अवसरे या व्यक्तीवर आपण उधळलेली 'मुक्ताफळे' वाचून आश्चर्य वाटले व भयंकर संताप पण आला. डॉ. वसंत अवसरे यांनी केलेल्या कृत्याचा आपण समाचार घेण्याऐवजी त्या कृत्यावर तात्त्विक मुलामा चढवून पांघरूण घालावे याची फार चीड आली. आंतरभारती, प्रेमविवाह, द्विभार्या प्रतिबंधक कायदा वगैरे गोष्टींचा दाखला देऊन वृद्ध अवसरे यांच्या विवाहाची बाजू सावरण्याचा आपण वृथा प्रयत्न केला आहे. (आपल्या भोगलालसेसाठी) मुसलमानधर्म स्वीकारून आपल्या सरकारच्या तोंडात डॉ. अवसरे यांनी झणझणीत चपराक दिली आहे असे म्हणणे किती फसवे आहे! एकतर आपल्या संवेदनाशून्य सरकारच्या तोंडात या गोष्टीने चपराक बसेल हे केवळ अशक्य आहे. बरे, चपराक देण्याचा हाच मार्ग डॉ. अवसरे यांना (आणि आपल्यालाही) योग्य वाटतो का? स्वतःला 'पी. एस्. पी.' वाला म्हणवून घेणाऱ्या व्यक्तीला द्विभार्या प्रतिबंधक कायदा मोडण्याचा दुसरा मार्ग सापडत नाही का? म्हणजे ही 'पी. एस्. पी'वाली मंडळी अत्यंत भेकड, करंटी, हाय खाणारी आणि अवसानघातकी आहेत. कोणतेही चांगले कार्य या व्यक्तींनी आजपर्यंत हिंमतीने केलेले नाही. वैचारिक गोंधळ, विक्षिप्त विचारसरणी आणि खोटा बुद्धिवाद हा यांचा विशेष! दुसरे, आपल्याला वाटते त्याप्रमाणे डॉ. अवसरे पुन्हा हिंमतीने जाहीर हिंदुधर्म स्वीकारतील असे तुम्हांला वाटते का? अगदी अशक्य! म्हातारपणी आपली रसिकता भलतीकडेच दाखविणाऱ्या डॉ. अवसरे यांच्यापेक्षाही,

गंमत वाटली 'माणूस'च्या विचारसरणीची ! का आपल्या विचारसरणीचेही 'अवमूल्यन' झाले आहे ? का मासिक, पाक्षिक, साप्ताहिक या उतरंडीमुळे 'माणूस'ला विचार करायला वेळ मिळत नाही ?/ असे असेल तर 'माणूस'ची ती शोकांतिका ठरावी !...

— प्रा. वसंत दीक्षित, अहमदनगर

प्राध्यापक महाशयांनी आपले विचार फारच घाईने लिहून पाठविले आहेत, असे पत्राच्या एकूण भाषेवरून वाटते. 'मुक्ताफळे' या सदरात 'माणूस'ने एवढेच लिहिले होते, की "लग्नाची बायको व इतर संबंध अनौरस स्वरूपात ठेवण्यापेक्षा डॉ. अवसरे यांनी विवाह पत्करला या धीटपणाबद्दल त्यांचे अभिनंदनच केले पाहिजे." म्हणजे अभिनंदन आहे धीटपणाचे, भोगलालसेचे नाही. छुप्या प्रेमसंबंधांपेक्षा उघड विवाहबंधनात नैतिकता अधिक, एवढाच याचा अर्थ. हा विवाह चालू सरकारी कायद्याप्रमाणे धर्मांतर केल्याशिवाय होऊ शकत नाही ही चूक सरकारची. सरकारने कायद्यातील ही फट बंद केली पाहिजे, सर्व धर्मीयांना समान कायदा लागू केला पाहिजे हा त्यापुढचा मुद्दा. यानंतरची स्फुटातील सूचना डॉक्टरमहाशयांनी पुन्हा हिंदुधर्मात यावे ही. धर्माला आधुनिक सामाजिक व्यवहारांत तसे फारसे स्थान उरले नाही हे खरे असले, तरी हिंदुस्थानच्या चालू परिस्थितीत 'धर्मांतर हे राष्ट्रांतर' ठरते असा अनुभव असल्याने डॉक्टरमहाशयांचे हिंदुधर्मात पुन्हा येणे 'राष्ट्रीय' दृष्ट्याही अवश्य ठरते अशी 'माणूस'ची सुस्पष्ट भूमिका स्फुटात शेवटी व्यक्त झाली आहे.

आता डॉक्टरमहाशय हिंदुधर्मात पुन्हा येतील की नाही, पी. एस्. पी.वाले भेकड आहेत की मर्द आहेत, हा विषय गैरलागू आहे. 'माणूस'मधील स्फुटाचा त्याच्याशी संबंध पोहोचत नाही. असले फालतू व विषयाशी संबंध नसलेले मुद्दे उपस्थित करणे हे खरे 'वैचारिक अवमूल्यन.' नियतकालिकांचे वेळापत्रक हा त्यामानाने गौण भाग. वर्षातून एकदाच अवतार घेणाऱ्या वार्षिकांतही भिकार साहित्य प्रसिद्ध होऊ शकते व दैनिकाच्या धबडग्यातही एखादे वेळी तेजस्वी विचाराचा अग्रलेख चमकून जातो.

— संपादक

स. न.

एकाच दृष्टिक्षेपात झेपावून हस्तगत करावा अशा देखण्या भरजरी शालूसारखा सजला आहे "माणूस"! पण देखण्या भरजरी शालूला जसं घोंगडीचं तसं सर्वांगसुंदर 'माणूस'ला 'भविष्यवाणीचं' ठिगळ कशाला ? प्रत्येकाला आपलं भविष्य (निदान स्वतंत्र भारतात) काय आहे ते आता पुरतं समजून चुकलं आहे. त्यापेक्षा कवितेला एक पान अधिक देऊन श्री. गोपीनाथ तळवलकरांच्या अमृतझरणीचा "आस्वाद" आकंठ घालाल का ?

आपला हा सुसंस्कृत 'माणूस' अशीच नव्या रक्ताची, नव्या दमाची कदर करून सुप्रतिष्ठित होवो एवढीच सदिच्छा !

— बाळ सडवेलकर

## टुचकावळे...



### □ उपासांचे पीक

उपासांचे पीक आले आहे! उपासाला पीक आले आहे, असे म्हणण्यात थोडीशी चूक होते आहे. कारण उपास करणाऱ्याला पिकाचे काय हो? परंतु साऱ्या शहरांतून कलेक्टर कचेऱ्यांसमोर व राज्याराज्यांतील सचिवालयांसमोर, तसेच केंद्र सरकारच्या दाराशी सतत कुणी ना कुणी उपासाला बसलेले असते. यापुढे सचिवालयांत व जिल्हाधिकाऱ्यांच्या कार्यालयात 'उपास-कोठी' म्हणून उपासासाठी स्वतंत्र खोली ठेवण्यात यावी अशी, सूचना करावयास हरकत नाही. या खोलीत उपासाचे साहित्य ठेवण्यात यावे. एक खाट, उपास करण्याची, प्रकृती तपासण्याची सर्व उपकरणें, पत्रकारांसाठी खुर्च्या, टेबले, उपास सोडताना लागणारी मुसुंबी वगैरे गोष्टी हाताशी ठेवलेल्या असाव्यात.

उपासांचे प्रकारही आता वाढले आहेत. ताप जसा मुदतीचा व मरणाचा असतो, तसा उपासही मुदतीचा व मरणाचा असतो! आमरण उपोषणे क्वचित होतात, परंतु मुदतीच्या उपोषणात आता अनेक वारकावे निर्माण झाले आहेत. 'उपोषण खो-खो' हा नवा प्रकार साखळी–उपोषण म्हणून मान्यता पावला आहे.

उपासासाठी सध्या सुशोभित मांडव वगैरे घालून घेतला जातो. टेकायला लोड असतात. उपासाचे हेतू सुवाच्य अक्षरात लिहिलेले असतात. माचणावर इतकी मंडळी असतात की, यांतली उपाशी कोण आणि नुसतीच '—पाशी' कोण याचा उलगडा बघणाऱ्याला होत नाही. उपास करणारी ही माणसे चांगली हसत असतात, त्यामुळे त्यांना काही क्लेष होत नसावेत असे उगाचच वाटते.

काँग्रेसी राज्यकर्त्यांना या उपास-अस्त्राविषयी फार प्रेम आहे. विन्स्टन चर्चिल यांनी आपल्या युद्धस्मरणिकेच्या चौथ्या खंडात महात्माजींच्या उपवासाविषयी मागे लिहिले–

" उपासाच्या सुरुवातीच्या काळात गांधी ग्लूकोजमिश्रित पाणी घेत होते. यामुळे व त्यांची अनासक्त दिनचर्या यांमुळे मोठाले उपवास करणे गांधींना शक्य होत असे."

यात खरे पाहता चिडण्यासारखे काय होते? परंतु महात्माजींचे उपास–डॉक्टर बी. सी. रॉय यांनी चर्चिल यांच्यावर टीकास्त्र सोडले. उपासाच्या पावित्र्यावर चर्चिल आघात करीत आहेत अशी त्यांनी तक्रार केली.

सध्याच्या उपासांकडे कुणीच फारसा गंभीरपणे पाहत नाही व त्याचे पावित्र्य वगैरे शब्द तर हद्दपार झाले आहेत.

मागण्या मान्य करून घेण्याकरिता उपास करण्याचे तंत्र तसे फार जुने आहे. पूर्वी याला "धरणे धरून बसणे," असे म्हणत असत. धरणे धरून बसलेला माणूस एकदा दारात बसला की बसला. जेवण नाही, खाण नाही–काही नाही! १८५७ च्या बंडापूर्वीची अशीच एक हकीकत एका बिशपाने लिहून ठेवली आहे.

बनारसला गोऱ्या जिल्हाधिकाऱ्याने प्रत्येक घरावर कर (House Tax) बसवला. बनारस गावातली घाण कमी करण्याकरता बहुधा हा पैसा त्याला हवा असेल. लोकांत क्षोभ माजला. कलकत्त्याला त्या वेळी गोरे सरकार असे. तिथे पत्रे गेली, "हा अन्याय आहे." दाद लागेना. गावातल्या लोकांनी धरणे धरायचे ठरवले. तीस हजार लोक–आपापले उद्योगधंदे सोडून बनारसच्या घाटावर येऊन बसले.

गोऱ्या सरकारला हा प्रकार नवीन होता. धरणे धरून बसल्यावर लोकांचे नैसर्गिक विधी घाटावरच होऊ लागले. दोन तीन दिवसांत निरनिराळ्या साथी पसरून माणसे मरतील, अशी भीती निर्माण झाली. सरकारने कळवले–

"तुम्ही दंगा वगैरे करीत नाही तोपर्यंत सरकार तुमच्या नुसत्या उपाशी बसण्याला हरकत घेणार नाही."

सरकार वळत नाहीसे पाहून यांतल्या दहा हजार लोकांनी कलकत्त्याला जाऊन गव्हर्नर जनरलला भेटावे असे ठरवले. यांचा जायचा–यायचा खर्च कसा करावयाचा? म्होरक्यांनी सुचविले– "आपण घरागणिक वर्गणी बसवू–!"


घराघरावर कर बसला म्हणून उपास आणि आता उपास यशस्वी व्हावा म्हणून पुन: घराघरांवर कर!! फाटाफूट सुरू झाली. काही लोक धरणे उठवून घरी गेले. दुसऱ्या दिवशी अधिक गेले. तीन दिवसांत 'धरणे' उठले.

परंतु उपासाचे पीक असेच वाढणे आवश्यक आहे. त्यामुळे अन्नधान्याचा प्रश्न काहीसा सुटेल. भारतातल्या सतरा राज्यांनी महिन्यातून फक्त दोन दिवस उपास केला तर पन्नास कोटी लोकांचे एक महिन्याचे अन्न वाचेल. हळूहळू सवयीने दोन ऐवजी तीन-चार-पाच– असे उपवास राज्य सरकारांनी अंगावर घ्यावेत म्हणजे आपला देश हां हां म्हणता अन्नधान्याबाबत स्वयंपूर्ण होईल.

## ☐ व्यावहारिक गणित

"दहा माणसे एक काम आठ दिवसांत करतात तर वीस माणसे तेच काम किती दिवसांत करतील?"

याचे उत्तर– माणसे सरकारी नोकर असतील तर– सोळा दिवसांत! पटत नसेल त्यांनी व्यावहारिक गणिते सोडविण्याची सवय ठेवावी.




## □ ॲटमबॉंब आणि स्वस्ताई

कोईन्सबरगर नावाचा एक डच साहेब गतवर्षी माओच्या चीनमध्ये जाऊन आला. त्याने 'न्यू यॉर्कर " या पत्रात चीनमध्ये जीवनावश्यक वस्तूंचे भाव काय आहेत यांची यादी प्रसिद्ध केली आहे. हे भाव आपण रुपये-पैशांत करून घेऊन काय दिसते पाहू. भाव असे आहेत.

| | |
|---|---|
| तांदूळ : १६ पैसे ते २४ पैसे पौंड | सायकली : २९० रुपये—चांगली मजबूत |
| अंडी : दोन रुपयांना २० | रेडियो : १०० रुपयांपासून पुढे |
| साखर : १ रुपया ४० पैसे पौंड | प्लॅस्टिक चपला : ४ रुपये ५० पैसे |
| छत्र्या : ८ रुपये नगाला | चामड्याचे सॅन्डल्स : १६ रुपये |

सर्व भाव उतरवण्यात हशील नाही. आपल्याकडे चीनएवढीच स्वस्ताई असली पाहिजे असे कुणी म्हणत नाही. परंतु आपल्याकडे 'ॲटम बॉंब ' तयार केला तर उपाशी-अर्धपोटी राहावे लागेल, असा युक्तिवाद केला जातो. तेव्हा बोलणाऱ्याच्या तोंडात हा बोळा सारावा. हे चोखणे तोंडात दिले तर रडकी बाळे गप्प राहतील. ●

# विचारवारे

— समीर

## ● लंकेची परराष्ट्र–नीती

लंकेला भारताची मानसकन्या म्हणतात, तेव्हा भारताच्या पायथ्याशीच असलेला हा छोटेखानी देश कुठल्या परराष्ट्रीय धोरणाच्या आधारावर आजच्या आंतरराष्ट्रीय परिस्थितीत मार्ग काढू पाहतो, याचा विचार उद्बोधक ठरेल. ‘ सिलोनची परराष्ट्र–नीती ’ या विषयावर ‘ इंडियन सोसायटी ऑफ इंटरनॅशनल लॉ ’ या संस्थेच्या विद्यमाने थोड्या दिवसांपूर्वी दिल्लीत भाषण करताना सिलोनचे भारतातील हाय-कमिशनर श्री. अमरसिंगे म्हणाले की, “ आंतरराष्ट्रीय क्षेत्रात तटस्थता, यूनोच्या जाहीरनाम्यावर विश्वास, शांततापूर्ण सहजीवन आणि कुठल्याही देशात परकीय हस्तक्षेप नसावा, असे ठाम मत, ही सिलोनच्या परराष्ट्र–नीतीची प्रमुख सूत्रे आहेत. गेल्या दहा–बारा वर्षांत शेजारच्या देशांशी अधिक जवळचे संबंध स्थापित करण्याची इच्छा, हाही सिलोनी परराष्ट्र–नीतीचा एक महत्त्वाचा भाग झाला आहे. गल्या दहा वर्षांत पाश्चिमात्य राष्ट्रांनी वेळोवेळी सिलोनची आर्थिक नाकेबंदी केल्याने सिलोनला परराष्ट्र–अर्थकारणाचा जो ‘ खेदजनक ’ अनुभव आला त्या अनुभवामुळे शेजारी राष्ट्रांशी सौहार्दाचीही जाणीव विशेष वाढली आहे. सिलोनला साम्यवादी राष्ट्रांशी व्यापार करता येऊ नये, म्हणून ही नाकेबंदी करण्यात आली होती. सिलोनने तटस्थतेचे धोरण स्वीकारण्याचे कारण म्हणजे कुठल्याही गटापासून दूर राहिले तरच इतक्या छोटया देशाला आपल्या हिताला जपून शांततापूर्वक राहता येते, आणि शांततापूर्ण वातावरणातच त्याला आपल्या आर्थिक व सामाजिक उन्नतीचे कार्यक्रम अंमलात आणता येतात.”

## ● जागतिक परराष्ट्र-नीतीची संक्रमणावस्था

एका अगदी छोटया राष्ट्राची परराष्ट्र-नीती कशी घडते, हे श्रीअमरसिंगे यांच्या भाषणात पाहायला मिळाले, तर सबंध जगाचीच परराष्ट्रनीती सध्या कशी संक्रमणावस्थेतून जात आहे, याचे चित्र प्रा. सौ. व्हेरा डीन या अमेरिकन तज्ज्ञाने रंगविले. न्यूयॉर्क विश्वविद्यालयात प्राध्यापक आणि ‘ इंडियन कौन्सिल ऑफ एशिया सोसायटी ’च्या उपाध्यक्ष सौ. डीन यांनी ‘ जगातील देशांची संक्रमणावस्थेतील परराष्ट्र–नीती ’ या विषयावर दिल्लीत ‘ इंडियन कौन्सिल ऑफ वर्ल्ड अफेअर्स ’ या संस्थेच्या सभेत भाषण करताना काही प्रमुख देशांच्या परराष्ट्रीय धोरणांची वैशिष्टये सांगितली. अर्थात् त्यात अमेरिकेला प्राधान्य होते.

‘ अमेरिका अत्यंत ध्येयवादी आहे, पण जागतिक प्रश्न सोडविण्यासाठी इतर देशांशी विचार–विनिमय करायच्याऐवजी ती स्वतःचेच मत दुसऱ्यांवर लादू पाहते. अमेरिकेचा हेतू चांगला आहे याबद्दल शंका नाही; पण हा सद्हेतू अंमलात

आणायचा योग्य मार्ग कोणता हा प्रश्न आहे. आशियात साम्यवादाला आळा घालावा व व्हिएटनामचे दोन तुकडे सांधून एक असाम्यवादी राष्ट्र करावे अशी अमेरिकेची इच्छा आहे. पण या इच्छेपायी केलेल्या कृतीचा असा परिणाम झाला आहे, की पुष्कळांनी अमेरिकेवर वसाहतवादाचे पुनरुज्जीवन करण्याचा आरोप केला आहे.

व्हिएटनाम हे सध्याच्या जागतिक राजकारणातले एक मोठे प्रश्नचिन्ह आहे. तेथील संघर्षाला राष्ट्रवादी चळवळ समजणे कितपत योग्य होईल, हे सांगणे कठीण आहे. व्हिएटनाममध्ये चीनची कारवाई हे तेथील संघर्षाचे मूलभूत कारण वाटते; तरीदेखील अमेरिकेने हस्तक्षेप केला नसता तर उत्तर व्हिएटनाम चीनच्या घशात गेला असता ही भीती अतिरंजित वाटते. व्हिएटनाममध्ये कायमचे असेच लढत राहणे अमेरिकेला शक्य होणार नाही, आणि ब्रिटन, फ्रान्स, जपान, जर्मनी असल्या देशांपासून अमेरिकेला फारशी मदत मिळण्याची आशा नाही.

बदलत्या परिस्थितीत कुठलीही परराष्ट्र–नीती स्थायी होऊ शकत नाही. त्याचबरोबर हेही खरे आहे की, भक्कम आर्थिक व लष्करी पायाशिवाय कुठलाही देश जागतिक राजकारणात महत्त्वाचे कार्य करू शकत नाही. हिंदुस्थान हा अशा देशांपैकी एक आहे की, ज्यांना तसे जगात मानाचे स्थान आहे, पण आपले मत ग्राह्य ठरविण्याइतके त्यांचे वजन नाही व त्यामुळे त्यांना दुय्यम स्थान मिळाले आहे. इजिप्त व युगोस्लाव्हिया हे देशही असेच आहेत.

रशिया हा एक मोक्याचा देश सध्या अंतर्गत समस्या सोडविण्यात गुंतला आहे. रशिया स्वतःला आंतरराष्ट्रीय संघर्षात गुरफटून घेण्याची शक्यता दिसत नाही; कारण तसे केल्याने त्याच्या औद्योगिक व आर्थिक विकासाला अडथळा येईल. फारतर अमेरिका व चीन यांच्यामध्ये मध्यस्थाचे काम करणे रशियाला आवडेल–नव्हे, हे काम रशिया अधिकाधिक प्रमाणात करू लागला आहे; कारण अमेरिका व चीन या दोघांशीही रशियाला सलोखा ठेवायचा आहे. त्यामुळे व्हिएटनाम प्रकरणीही अमेरिकेजवळ काही 'कडक मागण्या' करणे रशियाने काळजीपूर्वक टाळले आहे.

चीनदेखील जागतिक संघर्षात हस्तक्षेप करण्याची शक्यता दिसत नाही. आफ्रिकेत चिनी प्रभाव ओसरू लागला आहे आणि आशियाई देश आपल्याभोवती गोळा होतील, ही चिनी आशाही फोल ठरली आहे. मात्र लाल चीनला 'कागदी वाघ' समजणे चुकीचे ठरेल.

सौ. डीनचे बालपण झारकालीन रशियात गेले. रशिया पाश्चिमात्य आहे की पौर्वात्य, या प्रश्नावर त्यांचे उत्तर–रशिया अपाश्चिमात्य आहे. आंतरराष्ट्रीय बाबतींत विशेषतः व्हिएटनामच्या प्रश्नावर, रशियाचा सध्या जो डळमळीत पवित्रा आहे त्याचे मुख्य कारण म्हणजे आपण पूर्वाभिमुख असावे की पश्चिमाभिमुख असावे याबद्दल रशियाच्या मनात अनिश्चितता आहे. ●

# श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

## निवडक निरूपणे



### १ : अंतकाळचे नामस्मरण

अंतकाळी नामस्मरण होणे म्हणजेच अंतकाळ साधणे व हा साधण्यास आधी नामस्मरण करावयास पाहिजे. अंतकाळ साधत असल्यास आणखी जगून काय करायचे व तो साधत नसल्यास आणखी जगून काय उपयोग ? अंतकाळ साधण्यासाठी जगावे. देवापाशी 'मला तू आपला म्हण, माझे मन तुझ्या चरणी अर्पण केले. मला तुजजवळ मागण्याची इच्छा न होवो,' असे मागावे. परमेश्वर तुमच्या मागेपुढे आहे, असे अखंड मानावे. त्याचे स्मरण करणे म्हणजे जे काही आपल्या हातून घडत आहे ते त्याच्याच इच्छेने घडत आहे असे समजावे. प्रपंच देवाचा मानून अभिमानरहित करणे हा परमार्थ व परमात्म्यावाचून आपणांस कोणी नाही, याचा दृढ निश्चय होणे याचे नाव ज्ञान. हे ज्ञान बाणले म्हणजे मनुष्याला खऱ्या अर्थाने परमात्म्यावाचून दुसरे काही आवडेनासे होते व ही जी अत्यंत आवड तिला भक्ती म्हणतात. या भक्तीची परिपूर्णता अंतकाळ साधण्यात होते. म्हणून या सर्व गोष्टींस सतत नामस्मरण किंवा अखंड अनुसंधान हेच एकमेव साधन सांगितले आहे.

साधन प्राणाबरोबर असावे म्हणजे प्राण जसे अभिमानरहित अखंड चालतात, त्याप्रमाणे साधन अभिमानरहित अखंड चालावे. ते करता कामा नये. करणे म्हणजे अभिमान आला. सहज प्राणाबरोबर झाले म्हणजे अखंड चाललेलेच असते. मग ते होत नाही म्हणून तळमळ का असावी ? काशीस पोचल्यावर मग मजल करण्याचे कारण काय ? देवळात श्रीरामाचे दर्शन होण्याचा जिवापलीकडे नियम केला. प्रत्यक्ष राम घरी आला तरी आपला नेम म्हणून देवळात जाण्यास निघाला, त्याला काय म्हणावे ? प्रपंचातील तळमळ सोडून वागावे, गुरूच्या आज्ञेत असावे; मग ती आज्ञा काही साधन न करण्यासंबंधी का असेना अनंत जन्मांचा देहाशी सहवास म्हणून देहावर प्रेम जडून देहबुद्धी होते. नामाचा सहवास पुष्कळ करावा म्हणजे विषयाची आसक्ती कमी होऊन नामावर प्रेम जडते. योगात कष्ट फार. या युगात तो साधणे अशक्यप्रायच व

कर्मात तर अभिमान असतो व वाटतो. भक्तीत कष्ट नसून ती करण्यात अभिमान वाटावा लागतो. पहिली दोन साधने परमात्म्याच्या दत्तक पुत्राप्रमाणे आहेत, तर भक्तीचे साधन म्हणजे परमात्म्याच्या औरस मुलाप्रमाणेच आहे. भगवंतास दृष्टि-आड होऊ न देणे हीच खरी भक्ती, हेच खरे अनुसंधान, हाच खरा परमार्थ, हेच आपले सर्वस्व आहे.

## २ : अखंड नामस्मरण हेच जन्माचे सार्थक

नामस्मरण हे प्रपंचाकरिता म्हणजे तो चांगला व्हावा म्हणून नाही, तर प्रपंचाची आसक्ती कमी करण्यासाठी आहे; पण त्याने प्रपंच बिघडणार नाही. जे होईल ते आपल्या बऱ्याकरिता आहे, असे समजून परमात्म्यावर विश्वास ठेवून राहावे कारवारचे एक गृहस्थ भेटावयास आले व म्हणाले, "मी रिकाम्या वेळात नामस्मरण करतो." त्यावर मी म्हटले, "साऱ्या जन्मात महत्त्वाचा व सार्थकी लागलेला वेळ असेल तर तो हाच. त्यास तुम्ही रिकामा वेळ कसा म्हणता ?" त्यावर ते म्हणाले, "प्रारब्धाचे भोग काही केल्या टळत नाहीत. ते भोगावेच लागतात, असे सर्व संत सांगतात. हे जर खरे आहे तर प्रारब्धाचे भोग आपण भोगत असताना त्यांमध्ये भगवंताच्या स्मरणाची काय गरज आहे ?"

"खरोखर तुमचा प्रश्न अगदी बरोबर आहे. आपल्याच कर्माचे भोग आपल्याला भोगावे लागतात हे खरे. पण भोग आले, की आपल्या मनाला चैन पडत नाही; म्हणून मनाला भगवंताच्या स्मरणात गुंतवून ठेवले असतानादेखील आपले समाधान टिकते. आपल्या सध्याच्या अवस्थेमध्ये भगवंताच्या इच्छेने घडायचे ते घडते, असे मानणे किंवा भगवंत चांगले करील, असा विश्वास ठेवून वागणे हेच सोपे जाईल. हे दिसायला साधे दिसले तरी त्यात फार मोठे मर्म साठविले आहे हे ध्यानात धरा. कारण भगवंताच्या इच्छेने घडणारे ते घडू द्यावे. अशी निष्ठा उत्पन्न होण्यास त्याचे अनुसंधान सतत ठेवले पाहिजे. विषय कसा सुटेल ? मन एकाग्र कसे होईल ? हे न कळले तरी चालेल. तो सोडण्याच्या गोष्टींचा अभ्यास करण्यापेक्षा तो धरण्याच्या गोष्टींचा म्हणजे अनुसंधानाचा अभ्यास करावा. एक भगवंताचे अनुसंधान ठेवले की, सर्व गुण आपोआप वाढतील. ते कसे घडते ? तर शरीराचे अवयव सारख्या प्रमाणात वाढतात तसे. झाडाच्या मुळाला पाणी घातले की, त्याच्या सर्व भागांना ते पोचते. तसे भगवंताचा विसर पडू न दिला तर सर्व काही घडते. अज्ञानाच्या अंधकाराने दुःख भोगीत असता तू माझे स्मरण, माझे अनुसंधान ठेव म्हणजे तुला पुढे उजेड दिसेल," असे गीतेमध्ये प्रत्यक्ष भगवान श्रीकृष्ण अर्जुनाला सुचवीत आहेत. दिवा जळायला हवा असेल तर त्यामध्ये सतत तेल घातले पाहिजे. तसे भगवंताचे अनुसंधान सारखे राहण्यास त्याचे नामस्मरण आपण सतत करीत असावे.

पा कि स्ता न चे
वि शे ष वा र्ता प त्र

# नव्या मोहिमेची तयारी

पाकिस्तानची राजधानी रावळपिंडी या शहरातील सारे रस्ते फुलून निघाले होते. पाकिस्तान-दिनाचा उत्सव त्या वेळी जोरात सुरू होता. रावळपिंडीच्या प्रमुख रस्त्यांवरून पाकिस्तानी लष्कराचे संचलन होत होते. प्रेसिडेंट महंमद आयुबखान एका उंच व्यासपीठावर ताठ उभे राहून लष्कराची सलामी घेत होते आणि आजूबाजूला उभे असलेले तीक्ष्ण नजरेचे पाश्चात्त्य पत्रकार समोरच्या रस्त्यावरून खडखड करीत जाणाऱ्या रणगाड्यांच्या ओळीकडे डोळे फाडफाडून बघत होते.

त्या रणगाड्यांपैकी पाच रणगाडे चिनी बनावटीचे होते!

रणगाडे थोडे पुढे जात आहेत, तोच कर्कश आवाज करीत पाकिस्तानी वायुदलाची विमाने सलामीसाठी आकाशात झेपावू लागली होती. विमानांच्या काफिल्यात अमेरिकन सेबर्स आणि स्टार फायटर विमानांच्या अग्रभागी चीनने दिलेली मिग १९ जातीची चार जेट विमाने झळकत होती.

आयुबखानांच्या शस्त्रसामग्रीत नवीन चिनी भर पडली होती आणि आपल्या या नवीन शस्त्रसामर्थ्याचे आव्हानात्मक उन्मत्त प्रदर्शन साऱ्या जगासमोर आयुबखान करीत होते. अमेरिका, ब्रिटन आणि सियाटो, सेन्टो गटांतील आपल्या इतर मित्र राष्ट्रांना जणू आयुब म्हणत होते, " बघा, तुम्ही नाही ना देत शस्त्रास्त्रे. मग ही बघा तुमच्या नाकावर टिच्चून मी मिळविली आहेत. आता तरी देता की नाही शस्त्रास्त्रे, बोला. चला, बोला लवकर. नाहीतर हा मी चाललो चीनकडे..."

आणि पाकिस्तानची ही धमकावणी देणारी गोळी बरोबर लागू पडली. गेल्या मार्च महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात पाकिस्तान-दिनाच्या दिवशी पाकिस्तानने आपल्याला चीनकडून मिळालेल्या शस्त्रसामग्रीचे प्रथमच नाटयमय रीतीने प्रदर्शन करून भारताला, साऱ्या जगाला आणि विशेषतः, अमेरिकेला एक सौम्यसा धक्का



दिला. त्याचा परिणाम लौकरच झाला. लगेच युरोपातून वेगवेगळ्या नावांखाली, वेगवेगळ्या कारणांसाठी, कधी उघडपणे तर कधी गुप्तपणे अमेरिकन शस्त्रास्त्रे आणि दारूगोळा पाकिस्तानात येऊन पडू लागला. गेल्या भारत-पाकिस्तान युद्धात पाकिस्तानने चांगलाच मार खाऊन सुमारे ५०० रणगाडे व ऐंशीच्यावर विमाने गमावली होती. यांपैकी बव्हंशी सामग्री अमेरिकन होती आणि अमेरिकन मदत बंद केल्याने पाकिस्तानची मोठीच पंचाईत झाली होती. पण आपल्याला मिळालेली चिनी अस्त्रे पाकिस्तानने बाहेर काढताच कळ फिरली आणि काही महिन्यांत युद्धात झालेली सारी हानी पाकिस्तानने भरून काढली.

## हे अपेक्षितच होते

भारतीय लोकसभेच्या दिङ्मूढ झालेल्या चिंतातुर सभासदांपुढे संरक्षणमंत्री ना. यशवंतराव चव्हाण यांनी गेल्या ८ ऑगस्टला सांगितले, "मागील वर्षीच्या लढ्यात झालेली शस्त्रास्त्रांची हानी पाकिस्तानने आता पूर्णपणे भरून काढली आहे. एवढेच नव्हे तर, आपले लष्कर, संरक्षणसिद्धता आणि सरहद्दीवरील वाहतुकीची साधने वेगाने वाढविण्याचे काम पाकिस्तानने जोरात सुरू केले आहे. चीन आणि इतर काही राष्ट्रांच्या मदतीने पाकिस्तान वेगाने आपली लष्करी ताकद वाढवीत असून, त्यामुळे भारताच्या सुरक्षिततेला मोठाच धोका निर्माण झाला आहे..."

वास्तविक, यात दिङ्मूढ होण्यासारखे अनपेक्षित असे काय घडले आहे ? गेल्या भारत-पाक युद्धात झालेली आपली हानी पाकिस्तान लवकरात लवकर भरून काढणार हे कळण्यास काही फार मोठ्या लष्करी वा राजनैतिक ज्ञानाची गरज नव्हती; किंबहुना, " पाकिस्तानचा मोठा भूप्रदेश जिंकण्याची आमची इच्छा नाही. त्यांचे शस्त्रबळ जास्तीत जास्त खच्ची करून त्यांच्या आक्रमक सामर्थ्याचा कणा मोडणे हा

आमचा हेतू होता, आणि तो बऱ्याच प्रमाणांत सिद्ध झाला आहे," जेव्हा अशी आपली युद्धभूमिका ना. संरक्षणमंत्र्यांनी गेले युद्ध चालू असतानाच लोकसभेत मांडली, तेव्हाच अनेकांनी इशारे दिले होते, की हे समाधान फसवे आहे, हा युक्तिवाद पोकळ आहे, आक्रमकाचा कणा असल्या अर्धवट हाणामारीने केव्हाही मोडला जात नसतो, पाकिस्तान पुन्हा उभे राहील. अगदी लवकरच. ता. १५ डिसेंबर १९६५ च्या अंकात या विषयाची चर्चा करताना 'माणूस' ने लिहिले होते.—

"... 'पाकिस्तानी आक्रमणाचा बंदोबस्त करण्यासाठी पाकिस्तानचे सैनिकीबळ खच्ची करणे एवढेच मर्यादित उद्दिष्ट डोळ्यांसमोर ठेवून भारतीय फौजांनी पाकिस्तानी प्रदेशात आगेकूच केली,' असे आपणांला सांगण्यात आले.

हा हेतू साध्य झाला का, हाच प्रश्न प्रथम आपण विचारात घेऊ ...... ...पॅटन टँक्स् व सेबर जेट्स् यांमुळे पाकिस्तानला जी एक प्रकारची अभेद्यता वाटत होती, तिला आपण तडाखा देऊ शकलो. पण त्यामुळे पाकिस्तान नरमले याला पुरावा काय? पाकिस्तान शस्त्रास्त्रांच्या बाबतीत संपूर्णतया परकीय मदतीवर अवलंबून आहे. पाकिस्तानमध्ये शस्त्रास्त्रांचे कारखाने असते आणि ते आपण उद्ध्वस्त करून पुरवठा बंद पाडला असता तर पाकिस्तानला तडाखा जाणवला असता. कारखाने सुरू होऊन पुन्हा शस्त्रास्त्रांचा साठा जमायला दहा-पंधरा वर्षांचा कालावधी लागतो आणि अशा परिस्थितीत व तेवढ्या काळापुरतेच पाकिस्तानचे लष्करी बळ खच्ची झाले आहे, असे धरून चालणे रास्त झाले असते. पण परकीय मदतीचा ओघ कोणत्याही क्षणी पाकिस्तानकडे चालू होऊ शकतो. सेबर जेट्स् व पॅटन्स निरुपयोगी ठरतात असे आढळून आल्यास, आणखी काही प्रकार येतील एवढाच फरक. मदतरूपाने, कर्ज म्हणून किंवा खरेदी करून पाकिस्तान आपले शस्त्रास्त्रांचे कोठार अल्पावधीत भरून काढील, यात शंका नाही. अगदी भारत-पाकिस्तान युद्ध चालू असतानाही तुर्कस्तानची लष्करी मदत पाकिस्तानकडे चालू होतीच. पाकचा उघड उघड पराभव होऊ देणे हे इंग्लंड—अमेरिका किंवा रशिया-चीन यांपैकी कुणालाही मानवणारे नसल्याने एक नाही दुसरा, हा नाही तो, कोणीतरी पाकिस्तानला मदतीचा हात नेहमीच पुढे करीत राहणार हेही आपण विसरून चालणार नाही. अशा परिस्थितीत पाकिस्तानच्या लष्करी सामर्थ्याचा आपण कणा मोडला, हे समाधान काल्पनिकच ठरण्याचा संभव अधिक..."

आणि दुर्दैवाने ही भीती खरी ठरली. पाहता पाहता पाकिस्तानने आपले लष्कर सुसज्ज केले आहे. आणि पाकिस्तानी लष्कराच्या सरहद्दीवरील संशयास्पद हालचाली चीन, अमेरिका, पश्चिम जर्मनी आदी राष्ट्रांकडे अधिक शस्त्रास्त्रांसाठी

आयुबने चालविलेली बोलणी, पाकिस्तानव्याप्त काश्मीरातील मुजाहिदांच्या वाढत्या हालचाली आणि पाकिस्तानी पुढारी काश्मीर प्रश्नावर वेळोवेळी करीत असलेली वक्तव्ये यांवरून पाकिस्तानचे हेतू सरळ नसावेत हे स्पष्ट होत आहे. आयुबखान पुन्हा कोणत्या नव्या आक्रमणाची तयारी तर करीत नाही ना ?

## नवी शस्त्रे अशी मिळवली

आयुबखानानी नवी शस्त्रे कशी हुशारी करून मिळविली हेही पाहण्यासारखे आहे. भारत-पाकिस्तान युद्ध सुरू होताच अमेरिका आणि ब्रिटन या राष्ट्रांनी या दोनही राष्ट्रांना लष्करी मदत देण्याचे स्थगित केले होते. त्याप्रमाणे गेल्या वर्षभरात भारताला मदत म्हणून अमेरिकन बंदुकीची एक गोळीही मिळाली नाही. परंतु पाकिस्तानने मात्र छुपेपणाने, तिसऱ्या राष्ट्रांमार्फत, दलालांकडून अमेरिकन शस्त्रास्त्रे, त्यांचे स्पेअर पार्ट्स् व दारूगोळा भरपूर प्रमाणात मिळविण्यात यश मिळविले आहे.

शस्त्रपुरवठ्याच्या बाबतीत अमेरिकेने आपले धोरण नुकतेच बदलले असल्याचे एक पेन्टॅगॉन ऑफिसर एका अमेरिकन वार्ताहराजवळ बोलल्याचे वृत्त आहे. या बदललेल्या धोरणानुसार भारत व पाकिस्तान या दोघांनाही ' घातक नसलेल्या शस्त्रां 'चा (नॉन लेथल वेपन्स) पुरवठा करण्याचे अमेरिकेने ठरविले आहे. भारताच्या बाबतीत या ' घातक नसलेल्या शस्त्रां 'ची, ट्रक्स, सिगारेट्स्, अन्न अशा वस्तू, अशी व्याख्या केली असून पाकिस्तानच्या बाबतीत मात्र ही व्याख्या अद्याप ठरविण्यात आली नाही !

बातम्या पिकविण्यात अमेरिकन वार्ताहरांचा हातखंडा. ही बातमी खरी असो वा नसो पण असेल तर ' घातक नसलेल्या शस्त्रां'ची पाकिस्तानच्या बाबतीतील अमेरिकन व्याख्या भलतीच व्यापक असली पाहिजे; कारण, अमेरिकन बनावटीची नवीन ५० सेबर जेट विमाने पाकिस्तानात आली असून पाकिस्तानी अधिकारी त्यांमधून नव्याने प्रशिक्षण घेताहेत, असा छडा भारताच्या चतुर हेरखात्याने लावला. त्याबरोबर भारताने अमेरिकेकडे निषेध-खलिता धाडला होता. ही अमेरिकन विमाने जर्मनीने कॅनडाकडून विकत घेतली होती व नंतर ती इराणला विकली होती. ही सेबर्स पुढे पाकिस्तानात कशी गेली याचा हास्यापद खुलासा पश्चिम जर्मनीने केला आहे. ती म्हणे दुरुस्तीसाठी पाकिस्तानात आली आहेत. नाटो गटाचे सर्वांत मोठे विमानतळ व वर्कशॉप्स पश्चिम जर्मनीत व तेवढ्याच दर्जाचे नाटोचे विमानतळ व वर्कशॉप्स खुद्द इराणमध्ये तेहरान येथे असताना ती उच्च प्रतीची विमाने स्पेअर पार्टस्साठी तळमळणाऱ्या पाकिस्तानमध्ये दुरुस्तीसाठी पाठविण्याइतके इराण दुधखुळे आहे की काय ? पश्चिम जर्मनीने ती विमाने इराणला विकली, तेव्हाच ती पाकिस्तानात जातील, अशी भीती भारताने व्यक्त केली होती. पण तिकडे दुर्लक्ष करण्यात आले.

इराण आणि पश्चिम जर्मनीप्रमाणेच तुर्की, पोर्तुगाल आणि साऊथ आफ्रिका या देशांतूनही पाश्चात्त्य शस्त्रास्त्रांचा ओघ आयुबखानांच्या सैनिकांना सुसज्ज करण्यासाठी पाकिस्तानकडे वाढू लागला आहे.

ही झाली पाश्चात्त्यांकडून येणारी शस्त्रसामग्री. अमेरिकेला धमकावण्या देऊन कोंडीत गाठण्यासाठी पाकिस्तानने जोडलेला नवा मित्र चीन तर दोन्ही हातांनी मुक्तपणे पाकिस्तानला शस्त्रास्त्रे पुरवीत आहे. स्वतः आयुबखानांनी ही गोष्ट गुलदस्तात ठेवलेली नाही. भारताविरुद्ध उपलब्ध होईल त्या क्षेत्रात, आणि मिळेल त्या देशांत आघाडी उभारून भारताचे महत्त्व कमी करण्याचा चंगच चीनने बांधलेला आहे. आणि भारताचा शत्रू तो आपला मित्र, असे साधे गणित करून पाकिस्तानने चीनला मिठी मारली आहे. 'काश्मीरी जनतेच्या स्वयंनिर्णयाच्या हक्का'च्या पाकिस्तानी आवाजात त्यामुळे चीनही आपला आवाज मिसळू लागला आहे.

परंतु या वेळी चीनने आपल्या शाब्दिक मदतीबरोबर काही भरीव मदतही देण्याचे ठरवले. त्याप्रमाणे पाकिस्तानला मिग १७ व मिग १९ या जातींची १२५ जेट विमाने, २७५ रणगाडे पुरविण्याचा चीनने नुकताच करार केला होता. त्यांपैकी ६७ विमाने आणि २०० रणगाडे पाकिस्तानात येऊन दाखल झालेही आहेत.

त्याचप्रमाणे मार्शल आयुबखानांनी स्वतःच जाहीर केले आहे की, पूर्व पाकिस्तानात दारूगोळ्याचे दोन प्रचंड कारखाने लवकरच उभारण्यात येतील. यांपैकी एक तरी कारखाना संपूर्ण चिनी मदतीने उभारला जावयाचा आहे. पूर्व पाकिस्तानातील सशस्त्र अन्सारांची संख्या ६० हजारांवरून २ लाख ६० हजारांवर नेल्याचेही आयुबखानांनी जाहीर केले. या अन्सारांना चिनी अधिकाऱ्यांच्या देखरेखीखाली गनिमी युद्धपद्धतीचे शिक्षण दिले जात आहे.

एकीकडून पाश्चात्त्य राष्ट्रे व दुसरीकडून चीन अशा रीतीने एकमेकांशी स्पर्धा करीत पाकिस्तानच्या हाती आपल्या शस्त्रास्त्रांची कोलिते देत आहेत. आणि पाकिस्तानी लष्कर सारखे वाढत आहे.

## वायुदल व भूदल यांवर भर

संरक्षण मंत्री यशवंतराव चव्हाणांच्या सांगण्यानुसार पाकिस्तानने आपल्या पाच इन्फन्ट्री डिव्हिजन्स वाढवून ती संख्या अकरापर्यंत नेण्याचे काम जोरात सुरू केले असून त्यांपैकी कमीत कमी दोन डिव्हिजन्स तरी चिनी युद्ध-सामग्रीच्या मदतीने उभारल्या जात आहेत. त्याचबरोबर पाकिस्तानव्याप्त काश्मीरमध्येही अनेक नवीन डिव्हिजन्स पाकिस्तान उभारीत आहे. पाकिस्तानजवळ दोन चिलखती डिव्हिजन्स जय्यत तयार असून २०० चिनी रणगाड्यांमुळे या चिलखती पलटणींना वेगळेच महत्त्व प्राप्त झाले आहे.

पाकिस्तानी वायुदलानेही गेल्या युद्धात गमावलेल्या फायटर्स आणि बॉंबर्सची

ह्यानी भरून काढली आहे. गेल्या वर्षापेक्षा पाकिस्तानजवळ आता विमानदलाची पाच स्क्वाड्रन्स म्हणजे सुमारे शंभर विमाने अधिक आहेत. आपले वायुदल पाकिस्तानने चीनची मिग विमाने, तसेच चिनी बनावटीची आय. एल्. २८ जातीची बाँबर्स व इराणकडून मिळविलेली सेबर जेट्स् यांच्या मदतीने वाढविले आहे. पाकिस्तानी वायुदलातील अधिकाऱ्यांची आणि सैनिकांची संख्याही मोठ्या प्रमाणावर वाढविली आहे.

आपले नाविक दल वाढविण्याची पाकिस्तानची योजना लांब पल्ल्याची असली तरी गेल्या काही महिन्यांत पाकिस्तानने चीनकडून कित्येक देखरेख-बोटी व काही पाणबुड्या मिळविल्या असून त्यांच्याही हालचाली अरबी सागरात व बंगालच्या उपसागरात जोरात चालू असल्याचे वृत्त आहे. परंतु पाकिस्तानचा खरा भर मात्र आपले भूदलाचे व वायुदलाचे सामर्थ्य वाढविण्याकडे आहे.

एकूण गेल्या युद्धाच्या वेळी जेवढे लष्करी सामर्थ्य पाकिस्तानजवळ होते, त्यापेक्षा आता ते जास्त सामर्थ्यवान झाले आहे, ही वस्तुस्थिती आहे. पाकिस्तानने आपली शक्ती संख्येने तर वाढविलीच आहे, पण त्याचबरोबर आपल्या लष्कराची गुणवत्ताही वाढविली आहे हे आपण विसरून चालणार नाही. पाकिस्तानने आपल्य वायुदलात फायटर, बाँबर्सचा आता मोठ्या प्रमाणात समावेश केलेला आहे. गेल्या युद्धात पाकिस्तानच्या बाँबर्सना फायटर विमानांचे संरक्षण नव्हते म्हणून त्यांची बरीच हानी झाली होती. ही उणीव पाकिस्तानने वेगाने भरून काढली आहे. युद्धात शिकलेला धडा पाकिस्तानने वाया जाऊ दिला नाही. भारतीय वायुदल गेल्या युद्धात पाकिस्तानी वायुदलापेक्षा वरचढ ठरले; कारण भारतीय बनावटीच्या नॅट या चिलटासारख्या दिसणाऱ्या फायटर विमानांनी भारतीय बाँबर्सना चांगले संरक्षण दिले होते. म्हणून उच्च प्रतीची अमेरिकन बनावटीची पाकिस्तानी विमाने त्यापुढे टिकाव धरू शकली नाहीत. उणीव पाकिस्तानच्या लगेच लक्षात आली.

तेच रणगाड्यांच्याही बाबतीत. पॅटन रणगाडे चालवणारे सैनिक तेवढेसे कुशल नव्हते. त्यांना मिळालेले शिक्षण पुरेसे नव्हते. हेही पाकिस्तानच्या लक्षात आलेले आहे. आणि ही चूकही वेगाने दुरुस्त करण्याचा पाकिस्तानचा प्रयत्न आहे. पाकिस्तानी लष्कराची ताकद आणि कौशल्य अशा रीतीने सारखे वाढत आहे. गतवर्षापेक्षा ते युद्ध करण्यास अधिक पात्र झाले आहे.

देशात युद्धाचे वातावरण निर्माण करण्यासाठी गेल्या दोन महिन्यांत पाकिस्तानी सरकारने लष्कर-भरतीची जोराची मोहीम उघडली आहे. प्रमुख शहरांमध्ये भिंती-भिंतींवर लष्करी जीवनाचे मोठेपण सांगणारी पत्रके चिकटविण्यात आली आहेत. लष्कर–भरतीसाठी पाकिस्तान रेडिओवरून खास कार्यक्रम प्रक्षेपित होतात. विशेष म्हणजे वायव्य पाकिस्तानात आणि पाकिस्तानव्याप्त काश्मीरात या लष्कर-भरतीवर खूपच जोर देण्यात येत आहे.

## फौजी मेळे

जाहिरातींचा आणि रेडिओचा प्रचार कमी पडेल असे वाटले, म्हणूनच की काय लष्कर-भरतीसाठी पाकिस्तानात ठिकठिकाणी 'फौजी मेळे' भरविण्यात येत आहेत. गेल्या जुलै महिन्यातच पश्चिम पाकिस्तानातील बन्नू, कोहाट, पेशावर आणि दांडी-कोट या गावी असे 'फौजी मेळे' आयोजित करण्यात आले होते. ब्रिटिशांचे साम्राज्य असताना वायव्य प्रांतातील मागासलेल्या जमातीची लष्कर-भरती करण्यासाठी ब्रिटिश सरकार तेथील जमातींच्या प्रमुखांना, सरदारांना हाताशी धरीत असे व ते सरदार आपल्या अनुयायांना लष्करात भरती होण्यास उत्तेजन देत असत. त्याच पद्धतीने पाकिस्तान सरकारने हे 'फौजी मेळे' उभारले होते व ते बऱ्याच प्रमाणांत यशस्वी झाल्याचे वृत्त आहे. "लष्करात भरती होऊन 'काश्मीरच्या मुक्ती'-साठी सरकारला मदत करण्याच्या हेतूने हजारोंनी लष्करभरती केंद्रांपुढे रांगा लावल्या" अशा तऱ्हेचो वृत्ते पाकिस्तानी वर्तमानपत्रांत छापून आली होती.

आपल्या लष्करी शिक्षणामध्येही पाकिस्तानने बराच फरक केला आहे. मागील युद्धाच्या अगोदर पाकिस्तानी सैन्याला सर्व शिक्षण अमेरिकन पद्धतीचे मिळत होते. परंतु भारतीय प्रदेशात अमेरिकन पद्धतीच्या लढयाचा विशेष उपयोग होत नसल्याने चिनी गनिमी पद्धतीचे शिक्षण पाकिस्तानी सैनिकांना द्यावे, अशी हाकाटी झाली. त्यामुळे व चीनच्या वाढत्या प्रभावामुळे लष्करी शिक्षणात पाकिस्तानने गनिमी युद्ध-तंत्राचा मोठया प्रमाणात अंतर्भाव केला आहे.

त्याचबरोबर पाकिस्तानव्याप्त काश्मीरमध्ये तेथील तरुणांना लष्करी शिक्षण देण्यासाठी पाकिस्तानी लष्कराने युवक प्रशिक्षण शिबिरे घेण्यास सुरुवात केली आहे. गेल्याच महिन्यात अशी आठ शिबिरे अत्यंत गुप्तपणे घेतली गेली होती. गेल्या युद्धाच्या आधी एप्रिल ते जुलै १९६५ मध्ये अशीच गुप्त प्रशिक्षण शिबिरे घेऊन पाकिस्तानने घुसखोरांना काश्मीरात पाठविले होते.

इकडे अशा तऱ्हेने अतिशय वेगाने आपले शस्त्रसामर्थ्य, सैनिकी बळ व लष्करी प्रशिक्षणाचा दर्जा वाढविण्याचा पाकिस्तानचा जोराचा प्रयत्न चालू असतानाच पाकिस्तानी सैन्य भारतीय सरहद्दीवर युद्धाचे पवित्रे घेऊन मोर्चे बांधीत आहे. लाहोर विभागातील इच्छोगिल कालवा ही पाकिस्तानी संरक्षणाची पहिली जबरदस्त फळी. गेल्या युद्धात तो नादुरुस्त झाला होता. तो आता संपूर्ण दुरुस्त करण्यात आला असून अधिक खोल व अधिक रुंद करण्यात आला आहे. अंतराअंतरावर काँक्रीटचे भक्कम खंदक (पिल बॉक्सेस) बांधण्यात आले आहेत. असेच खंदक सियालकोट विभागातही बांधण्यात आले असून, सियालकोट, छांब, जौरीयन व पूंच आदी विभागांत पाकिस्तानी रणगाडे व सैन्य मोठया प्रमाणावर येऊन दाखल झाले आहे. दरम्यान पूंच-राजौरी भागातून काही घुसखोर घुसले असून सरहद्दीवर त्या ठिकाणी सुमारे वीस हजार सशस्त्र सैनिक जय्यत तयारीने खडे असल्याचे वृत्त आहे. इकडे पूर्व पाकिस्तानात

चितगावजवळील जंगली विभागात शांगाचारी येथे बंडखोर मिझोंच्या तुकड्यांना व पाकिस्तानी सैनिकांना पाकिस्तान संयुक्तपणे गनिमी शिक्षा देत आहेत तर तिकडे वायव्येला पाकिस्तानव्याप्त काश्मीरातील गिलगिटजवळील स्कारो या कारगील-पासून जवळच असलेल्या ठाण्याजवळ पाकिस्तानी सैनिकांनी चिनी लाल सैन्याशी संधान बांधले आहे.

## हिशेब पूर्ण करण्याची घाई

१० जानेवारी १९६६ रोजी ऐतिहासिक ताश्कंद-करारावर सह्या झाल्या आणि त्याच रात्री पंतप्रधान शास्त्री निधन पावले. त्यामुळे त्या कराराला भारतात वेगळेच महत्त्व प्राप्त होऊन भारत प्रामाणिकपणे कराराच्या अटी पाळू लागला होता. परंतु करारावर सही करून पाकिस्तानी अध्यक्ष महंमद आयुबखान रावळपिंडीत परतताहेत तोवर त्या वेळचे पाकिस्तानी परराष्ट्र मंत्री झुल्फिकारअली भुट्टो यांनी उलटाच प्रचार सुरू केला होता. पाकिस्तानमधील चिनी राजदूताशी बराच वेळ गुप्त चर्चा करून आल्यावर ते एका जाहीर सभेत काश्मीरमधील आपल्या आक्रमक युद्धाचे समर्थन करताना म्हणाले, " राष्ट्रांना आपल्या स्वातंत्र्यासाठी सशस्त्र लढा करण्याचा अधिकार युनोच्या घटनेतच दिला आहे. तो आम्ही बजावीत होतो. काश्मीरी जनतेने स्वयंनिर्णयाचा हक्क बजावल्याशिवाय आमचा हिशेब पूर्ण होणार नाही. ताश्कंद–करार हा केवळ हा प्रश्न सोडविण्याचा एक मार्ग आहे हे आपण लक्षात ठेवले पाहिजे. "

पुढे ताश्कंद–करारानुसार भारत–पाकिस्तानच्या परराष्ट्र मंत्र्यांची बैठक १९६५ च्या मार्चच्या पहिल्या आठवड्यात झाली. परंतु शांतता स्थापनेचा ' मूड ' पाकिस्तानात नव्हताच. ही बैठक सुरू होण्याच्या आधीपासूनच पाकिस्तानी वृत्तपत्रांत ' भारत युद्धाची प्रचंड तयारी करीत असल्या 'चा भडक प्रचार पद्धतशीरपणे चालू होता.

त्याच सुमाराला चिनी डॉक्टरांचे एक शिष्टमंडळ पाकिस्तानचा दौरा करीत होते. एकाएकी या शिष्टमंडळाला भलतेच महत्त्व प्राप्त झाले. त्याच्या प्रत्येक हालचालीच्या बातम्या पाकिस्तानी वृत्तपत्रांतून ठळकपणे पहिल्या पानांवर झळकू लागल्या. ज्या दिवशी रावळपिंडीत मंत्र्यांची बैठक सुरू झाली त्याच दिवशी या चिनी शिष्टमंडळाचा प्रमुख डॉ. लीऊ चि चीन याच्या एका भाषणाला खूपच प्रसिद्धी मिळाली. डॉ. चिन म्हणाला होता, " जगातील कोणत्याही शक्तीविरुद्ध लढा देण्यास पाकिस्तानचा मित्र म्हणून चीन त्याच्या पाठीशी उभा राहील. "


नंतर लगेच मार्चच्या शेवटच्याच आठवड्यात पाकिस्तानने आपल्याला मिळालेल्या चिनी शस्त्रास्त्रांचे प्रदर्शन केले आणि लगेच पाच दिवस पाहुणे म्हणून आलेले चीनचा अध्यक्ष लीऊ शाओ ची आणि परराष्ट्र मंत्री चेन यी यांची यथास्थित सर-

बराई केली. रावळपिंडीच्या रस्त्यावरून त्यांची मिरवणूक काढली, तेव्हा हजारो पाकिस्तानी, रस्त्याच्या दुतर्फा उभे राहून त्यांच्यावर फुले उधळीत होते. परदेशी पाहुण्यांचे एवढे प्रचंड स्वागत पाकिस्तानात क्वचितच होते.

चीन व पाकिस्तानची ही युती भारताला निश्चितच अशुभ आणि धोकादायक आहे. सामोपचाराने, शस्त्राने, कोणत्याही मार्गाने काश्मीर घशात घालण्याचा पाकिस्तानचा अट्टाहास आहे. मागे दोनदा त्याने त्यासाठी भारतावर सशस्त्र आक्रमण करण्याचा प्रयत्न केला. त्या वेळी चीनसारखा योग्य जागी असलेला प्रबळ शत्रू त्याच्या पाठीशी असता तर त्याचा हेतू साध्य झाला असता. आता त्याच चीनच्या उत्तेजनामुळे तिसरे साहस करण्यास पाकिस्तान प्रवृत्त झाले आहे.

संरक्षण मंत्र्यांनी लोकसभेत या युतीचा उल्लेख करून चिनी अधिकाऱ्यांच्या मदतीने पाकिस्तान आपल्या सैन्याला शिक्षण देत आहे, असा आरोप केला होता. परवा अध्यक्ष आयुबखानांनी आपल्या भाषणात या आरोपाचा ओझरता उल्लेख केला. पण आश्चर्याची गोष्ट म्हणजे त्याचा इन्कार केला नाही. उलट ते म्हणाले, "भारत सरकार आपली शस्त्रास्त्रे परजीत आहे व त्यांची वाढ करीत आहे. ती डोंगरी प्रदेशात लढण्याच्या तयारीने नसून मैदानी युद्धाच्या तयारीने आहे. म्हणजेच त्याची तयारी चीनविरुद्ध नसून आमच्याविरुद्ध आहे, हे उघड आहे."

चीन हा भारताचा धोकेबाज शत्रू असल्याने त्याच्याविरुद्ध शस्त्रसज्ज राहणे भारताला भाग आहे. पण चीन हा पाकिस्तानचा दोस्त आहे. त्यामुळे पाकिस्तानची मात्र सारी तयारी भारताविरुद्ध आहे हे उघड आहे. काश्मीरचा निर्णय पाकिस्तानला स्वतःच्या बाजूने करवून घ्यायचा आहे. तो निर्णय युद्धाने करण्याची तर पाकिस्तानची तयारी नाही ना ? आज तरी आपल्या नव्या लाल मित्राच्या उत्तेजनामुळे अधिकच शेफारून पाकिस्तान सरहद्दीवर दंड थोपटून मोर्चे बांधीत आहे. शस्त्रे परजली जात आहेत, सीमेपलीकडे शत्रूच्या भयानक रणगाड्यांच्या हालचाली दिसताहेत, शस्त्रास्त्रांनी खच्चून भरलेली सुसज्ज विमाने शत्रूच्या विमानतळावर फुरफुरताहेत. तशी सरहद्द आज शांत आहे, पण पुढच्या अशुभ वादळाची ती भयसूचक शांतता तर नाही ना ?



श्री. ब. मो. पुरंदरे

यांची एक ऐतिहासिक कादंबरी

# शिलंगणाचं सोनं



मूल्य तीन रुपये

राजहंस प्रकाशन

४१९ नारायण, पुणे २

३ सप्टेंबर १९६६

## अशा अवेळी.... !

कधी न वाटले,
दिशादिशांचे,
जमून येईल अवेध नाते,
अनिंद्य सुंदर
नवलाईचे
हसेल अवखळ स्पंदन झुलते !
कधी न वाटले,
अवतीभवती,
फिरती नव उन्मेषशालिनी,
शोधील ढळत्या
पडछायेची
कल्पांती गतिमंद सावली !
कधी न वाटले,
कळी पाकळी,
मिठीत ओविल अंग शहारुन;
स्वानंदाचा,
निषाद कोमल,
असा 'धैवती' फुलेल रेलुन !
कधी न वाटले,
अशा अवेळी (!)
काव्यकौमुदी प्रसन्न होईल;
शब्द जुळविता,
रुसेल शामल,
अवखळ स्पंदन 'झुरून' जाइल !

—बाळ सडवेलकर.

## आज मौन कशासाठी ?

आज मौन कशासाठी
कशासाठी हा रुसवा
सांग हितगुज तुझे
हेतू मनींचा फसवा.
आज मौन कशासाठी
सोड शब्दांचे बंधन
तुझ्यासाठीच दारात
रात्र चांदणे शिंपून.

*विष्णु रा. गिरी*

## एक अभंग

तुवा केली माझी
ऐसी फरफट
मांडलेले पट उधळिले.
शांत झोप मला
नाही घेऊ दिली
जागा बदलली कितीकदा.
मांजरीने पिला
ऐसे फिरविले
दात न लागले कोठे मात्र.

*सतीश काळसेकर*

## "मधे हिवाळी रात्र–"

दोन किनाऱ्यावरती आपण–मधे हिवाळी रात्र
दुखऱ्या ज्योतिमधुनि वितळते केवळ माझे गात्र
बर्फमनाची हसुनी गेलिस–हरविलेस अवकाश
दिलेस त्यातुनि वेचुनि घेतो माझे हळवे पाश
विजनातुनि मज कुणी अनामिक घालित आज उखाणे
माझेही नभ माझ्या भोती गाते स्वैर तराणे

जुन्या पुराण्या वाद्यामधुनी जगविन माझे शब्द
रात्र दुखे– पण तीहि अकल्पित करिते काळिज विद्ध
काळ म्हणावा– तरि हाताला लक्ष लागती क्षते
बुझली नाहित वाऱ्यावरुनी अश्रूमधली भुते
डोळ्यांचे तट कोसळताना रक्त गळे पुष्पांचे
निष्पर्णाचे शिशिर जागे माझ्याभोति घरेचे !

*— विद्याधर भागवत*

# आस्वाद

'मधे हिवाळी रात्र' ह्या कवितेतली सृष्टी विरहाची आहे, पण रमणीय आहे. नदी, रात्र, विजन यांचे कवीने मानुषीकरण केले आहे. चौदा ओळी असल्या तरी हे सुनीत नसावे. ११ आणि १२ या ओळींतले वृत्त का बदलले कळत नाही. शुद्ध रचने-विषयी कवी गाफिल किंवा अज्ञानी नाही. मग हा बदल सहेतुक आहे का? वृत्ताच्या बदलाने भावनांचाही लय बदलतो. बाकी रचना सुश्लिष्टच नव्हे तर ढंगदार आहे. विद्याधर भागवत यांना प्रत्यक्ष सांगण्यापेक्षा अधिक सुचवायचे आहे, असा भास होतो. अर्थात् असा भास कवितेच्या रसवत्तेला पुष्कळदा पोषकच होतो. या कवितेतला सौम्य पण हृदयंगम आक्रोश मनाचा ठाव घेणारा आहे.

'आज मौज कशासाठी ?' ही विष्णु रा. गिरींची कविता मुक्तकाप्रमाणे आहे. अभंग, सुभाषित, कणिका यांच्याशी तिचे जवळचे नाते दिसते. 'रात्र चांदणे शिपून' ही क्रिया अर्धवट वाटते. अर्थ लक्षात येतो. पण वाक्य अर्धेच राहिले आहे, ही उणीव जाचत राहते. पण थोडक्यात आशय मांडण्याचे कसब बरे आहे. अने-कांना आपला संभ्रम शब्दरूप झाल्यासारखा वाटेल इतके हे चित्रण सर्वस्पर्शी आहे.

सतीश काळसेकर यांचा अभंग सुबोध, तितकाच उत्कट आहे. हाही मुक्तकाचाच एक प्रकार म्हणता येईल. अभंग म्हटल्यानंतर सामान्यपणे भक्तिरसाचाच आवि-ष्कार असावा, असे वाटते. पण हा अभंग व्यापक आहे. भक्तीची दुसरीही जात असते. तिलाही हे बोल शोभावेत. छोटी मुक्तकवजा कविता सरळ आणि स्फटिकासारखी निर्मळ असली म्हणजे ती विशेष मन वेधून घेते. ही कविता अशी आहे.

'अशा अवेळी,' नेटक्या शब्दांत आणि लयबद्ध ओळींत चितारलेला एक सुंदर अनुभव. कलावंतांच्याच नव्हे तर प्रेमिकांच्या वाटचालाही येतो हा. 'अवेध,' 'अनिद्यसुंदर' अशा काही शब्दसंहती वापरून बाळ सडवेलकर आपले स्वतंत्रपण दाखवितात. सौंदर्यवादी मनाचे आल्हादकारक दर्शन होते. अवेळी जरी ही कविता आठवली तरी रसिकाला तिच्यातल्या भावनांचा प्रत्यय येऊन पुलकित झाल्यासारखे वाटेल.

*—गोपीनाथ तळवलकर*

"लिहिताना माणूस कलावंत असतो, अन् लिहिल्यावर त्याच्या जागी व्यवहारीपणा येतो, म्हणून तो आपले लिखाण प्रसिद्धीस पाठवतो." बाई सांगत होत्या..

# बाई

लेखक
**महादेव मोरे**

बाईंच्या कथा मी खूप दिवसांपासून वाचत होतो. नवसाहित्याचा पुरस्कार करणाऱ्या एका मासिकातून त्या प्रसिद्ध होत असत...ठराविक चाकोरीतील लहरी जीवनावरील 'चाळ–वाङमय' व ग्रामीण जीवनावरील 'माळ–वाङमय' वाचून मला अतिशय उबग आला होता. मीही अधून मधून लिहीत होतो, पण माझेही लिखाण मला पुरेसे समाधान देत नव्हते–अशा अवस्थेत बाईंच्या कथांनी मला फार मोठा दिलासा दिला. नवसाहित्यिकांनी फार परिश्रमपूर्वक जोपासलेल्या मराठी कथेला बाईंनी खूपच पुढे ओढून नेले. नित्याच्या धकाधकीच्या जीवनात दबले नि दडपले जाणारे, लपले नि लपवले जाणारे मानवी मन आपल्या कथांतून बाईंनी फार समर्थपणे उभे केले. ह्या संज्ञाप्रवाहाच्या चित्रणासाठी आपली अशी एक खास शैली निर्माण केली. ह्या सर्वस्वी वेगळ्या शैलीने मी वेडावून गेलो– ह्या दरम्यान बाईंचा एक कथासंग्रह प्रसिद्ध झाला होता. तोही मी खरेदी करून वाचून काढला– एकदा, दोनदा, तीनदा...

अशा प्रकारे एखाद्या लेखकाचे लिखाण आपणांस फार आवडले की, आपली ही खुषी लेखकास पत्ररूपाने कळवावी, असं मला वाटायचं. पण मराठीमध्ये नट-नटींचे पत्ते वाचावयास मिळतील, पण लेखकांचे मिळणार नाहीत! त्यामुळे माझी ही इच्छा माझ्या मनातच विरून जायची..

पण एके दिवशी माझा मित्र बाळासाहेब मला म्हणाला की, ह्या वर्षी आपल्या कॉलेजला मराठी विषयासाठी नवीन प्राध्यापिका आलेल्या आहेत, यावर मी नाव विचारलं, तर त्यानं बाईंचं नाव सांगितलं. बाई प्राध्यापिका असतील असं मला स्वप्नातही वाटलं नव्हतं; त्यामुळं मी विचारलं, तुझ्या बाई कथा वगैरे लिहितात का? माझ्या ह्या प्रश्नात अविश्वास भरला होता. बाळासाहेब 'होय' म्हणाला, तरीसुद्धा हा अविश्वास कमी झाला नव्हता. वाटायचं, आपण कथा वाचतो त्याच

ह्या बाई का ? की नव्हेत ? त्यांना एकदा भेटावं का ? की नको ? तितका काही परिचय नसताना असे अनाहूतपणे भेटणे कितपत संयुक्तिक ठरेल ?



अशाच विचारांमध्ये आणखी काही दिवस गेले. मी कॉलेजच्या आणखी दोघां–तिघां विद्यार्थ्यांकडे चौकशी केली. त्यांनीही बाळासाहेबांच्याच बोलण्याला पुष्टी दिली. मग मात्र मी आनंदून गेलो अन् त्याच अवस्थेत बाईच्या समग्र कथांचं एक दीर्घ समालोचन लिहिलं आणि ते पाकिटात घालून बाळासाहेबांकडे दिलं.

बाईंनी माझं ते समालोचन वाचलं की नाही, कोणास ठाऊक; पण बाळासाहेबांकडून निरोप मात्र आला– बाईंनी भेटायला बोलावलंय म्हणून !

हे ऐकताच मनोमन मी हरखून गेलो. ज्यांच्या कथा श्रद्धेने वाचल्या, त्यांच्याशी चार शब्द बोलायला मिळणार– ही कल्पनाच भूल पाडणारी होती.

मी माझ्या व्यवसायातून संध्याकाळची एक–दोन तासांची सवड काढली नि सायकलवर टांग टाकून निघालो. कॉलेज गावापासून दोन मैलांवर होतं; आणि बाई तेथेच राहतात, असं मला बाळासाहेबांकडून समजलं होतं. संध्याकाळचा चारचा सुमार होता. जुलैचा पहिला आठवडा चालू होता; त्यामुळे वायुलहरीत एक प्रकारचा सुखद ओलावा आलेला होता अन् तो रंध्रारंध्रांना स्पष्ट जाणवत होता....मी निम्मं-अधिक अंतर काटलं असेल नसेल, एवढ्यात पावसाची एक जोरदार सर आली. मी तीत पुरता भिजून गेलो. मी कॉलेजवर आलो त्या वेळी अंगावरील गार्डन मॅनिला व अमेरिकन पॅण्ट माझ्या इंडियन बॉडीला चिकटून बसले होते. त्यांना वेगळं करीत जवळच असलेल्या हॉस्टेलकडे मी गेलो. बाई हॉस्टेलमध्येच राहत असतात असं समजल्यानं तेथील विद्यार्थ्यांकडे मी बाईंबद्दल चौकशी केली. एका विद्यार्थ्यानं समोरील लेडीज हॉस्टेलकडे बोट दाखवून सांगितलं, " बाई त्या हॉस्टेलमध्ये राहतात– नंबर २ च्या खोलीत !"

हे ऐकताच मी खूप गांगरलो. थोडा बुचकळ्यात पडलो... ह्या सायंकाळचे वेळी माझ्यासारख्या २३–२४ शीच्या तरुणाने लेडीज हॉस्टेलमध्ये जायचे म्हणजे...?

तरीही मी मनी धैर्य एकवटले. काय होईल ते होवो पण बाईंना भेटायचंच, हा विचार मनी पक्का केला अन् लेडीज हॉस्टेलजवळ आलो. बहुतेक खोल्यांची दारं बंदच होती. मी दोन नंबरच्या खोलीचं दार ठोठावलं. 'कोण हवंय् ?' असा प्रश्न विचारला गेला. दार उघडून एक कॉलेज–कन्यका माझ्यासमोर उभी राहिली. तेव्हा मी गडबडलो. कसातरी म्हणालो–"बाईंना भेटायचं होतं. कुठं राहतात त्या ?" दार बंद करून घेत ती तरुणी म्हणाली– "पलीकडील खोलीत !"

पलीकडील खोली म्हणजे नं. १ ची खोली तर– विचार करीत मी त्या खोलीचं दार ठोठावलं. परत मी गोंधळलो. पुन्हा एक तरुणीनं दार उघडलं, परत माझी पृच्छा अन् परत तसंच उत्तर– "बाई पलीकडील खोलीत राहतात !"

मी चक्रावून गेलो. हॉस्टेलमधील त्या विद्यार्थिनींनी माझा 'बंडू' केला, की ह्या तरुणी आता ते करीत आहेत हे मला समजेना. म्हणालो,

"अहो, पलीकडूनच मी आलोय्. तिथं सांगितलं..."

यावर ती तरुणी हसली. एखाद्याचा 'बंडू' केल्यावर पोरी हसतात तसंच ते हसू मला वाटलं त्या वेळी ! मग ती म्हणाली, "तिथं नव्हे, त्याच्या पलीकडे..."

"त्याच्या पलीकडे ?" मी पाहिलं तर त्या खोलीला कुलूप होतं. पण पुढील लगतच्या खोलीचं दार उघडं होतं. तिथं विचारलं, "अहो, बाई कुठे गेल्यात ?"

माझ्या त्या प्रश्नावर खोलीतून एक बाई बाहेर आल्या, "कोणत्या बाई..?" त्यांनी मला विचारलं, तसं मी बाईंचं नाव सांगताच त्या म्हणाल्या, "आहेत इथंच. या, आत या." आणि त्यांनी खोलीत जाऊन कुणालासं म्हटलं, "बाहेर तुम्हांला भेटायला कुणी आलंय !"

आणि काही वेळातच तीस–एक वयाच्या, डोळ्यांवर चष्मा घातलेल्या व आपल्या सावळ्या, कृश देहयष्टीवर शुभ्र साडी नेसलेल्या बाई बाहेर आल्या.

"नमस्कार !" मी म्हणालो. "माझं नाव पाटील. आपला निरोप पोचला आणि.."

"ओ ऽ ह, पाटील का तुम्ही. तुमचं पत्र मिळालं बरं.." आणि एवढ्यात बाईंचं माझ्या 'अवतारा'कडे लक्ष गेलं असावं. त्या आश्चर्य करीत म्हणाल्या, "अरे, पण तुम्ही भिजलाय किती ! चला, थोडा गरम गरम चहा करून देते तुम्हांला..."

बाई बाहेर पडल्या, नि आपल्या खोलीजवळ येऊन त्यांनी कुलुप काढलं व दार उघडत त्या मला म्हणाल्या, "या आत..."

मी आत जाताच त्यांनी एका खुर्चीकडे अंगुलीनिर्देश केला व म्हणाल्या, "बसा हं तुम्ही, गारठून गेला आहात. थोडा चहा करते." आणि त्या आतमध्ये गेल्या.

आजूबाजूस पाहत मी बाहेर बसून राहिलो. आतली खोली व ही बाहेरील खोली – अशा त्या दोन खोल्या होत्या. आतली खोली स्वयंपाकघर म्हणून उपयोगात आणली जात होती; अन् बाहेरील खोलीचा उपयोग बसण्याउठण्यासाठी

केला जात होता. एका कोपऱ्यात कॉटही होती. जवळच एक टेबल व खुर्ची! टेबलावर शेल्फ होतं. शेल्फमध्ये व टेबलावरही काही पुस्तकं विखुरलेली होती.

असा काही वेळ गेला; आणि मग बाई चहा घेऊन बाहेर आल्या. चहा घेऊन झाल्यावर मी बाईंच्याच कथेवर खूप वेळ बोलत राहिलो. मला त्यांच्या बहुतेक कथा जवळजवळ पाठ होत्या. मी भान हरपून बोलत होतो आणि काहीशा कुतूहलाने, काहीशा विस्मयाने व बऱ्याचशा चकित अवस्थेत टेबलाजवळच्या खुर्चीवर बसून बाई माझी बडबड ऐकत होत्या. त्यांना हे सारं नवीन असावं; किंवा माझ्याच वयाचे त्यांचे अनेक विद्यार्थी यापूर्वी अशा प्रकारचं बोलून गेले असावेत; कदाचित् असे असेल, कदाचित् तसेही असेल—काही अजमावणं कठीण होतं. कारण बाईंच्या चेहऱ्यावरून व त्यांच्या डोळ्यांवरील जाड भिंगांच्या चष्म्यावरून कुठलाही निश्चित तर्क करणे फार अवघड होते... वास्तविक, बाईंसारख्या प्रथम श्रेणीच्या कथालेखिकेकडून माझ्यासारख्या नवोदिताला मार्गदर्शनपर चार शब्द ऐकायला मिळतील, अशी रास्त अपेक्षा ह्या भेटीमागे होतीच... पण चाललं होतं उलटच, मीच फक्त बोलत होतो आणि केव्हा हुंकार देत, केव्हा आश्चर्योद्‌गार काढीत, केव्हा चौकसपणा दाखवीत बाई फक्त ऐकत होत्या. बाईंच्या कथेच्या ओघात मराठीतील इतर सर्व प्रथितयश लेखकांच्या कथांची हजेरी मी घेत होतो—काही बऱ्या, काही वाईट, काही साधारण...

मध्येच केव्हा तरी मी बोलायचा बंद झालो. बाईंचा बराच वेळ मी घेतला होता आणि याची काहीशी अपराधी जाणीव मला होऊ लागली. तसा मी म्हणालो, "बाई, बराच वेळ घेतला मी आपला. आता निघतो मी..."

"बरं तर", बाई म्हणाल्या, "असेच येत चला वरचेवर..."

"हो. अवश्य येत जाईन..." मी निरोपाचे बोलली नि बाहेर पडलो.

ह्या भेटीत बाईंच्याबद्दल प्रामुख्याने दोन गोष्टी आढळून आल्या. एक: म्हणजे, त्या स्वतःच्या कथांविषयी मौन पाळतात. बरेच साहित्यिक आपल्याच साहित्याविषयी भेटेल त्याच्याशी बडबडत असतात—हे काही थोडे ऐकून, काही थोडे अनुभवाने मला माहीत होते; त्यामुळे मला थोडे आश्चर्यच वाटले बाईंच्याबद्दल. आणि दुसरी गोष्ट म्हणजे— अलिकडे बाईंनी नवसाहित्यातील फारच थोडे वाचले होते.... बाई मराठीच्या प्राध्यापिका होत्या व एक प्रथितयश लेखिकाही होत्या—या पार्श्वभूमीवर ह्या गोष्टीचा विचार करताना मला फार आश्चर्य वाटले... ही दोन आश्चर्ये मनी घोळवत मी परत फिरलो होतो...

यानंतर दोन महिने होऊन गेले... ह्या अवधीत दोन मैलांचे ते अंतर काटून बाईंची भेट घेणे माझ्या व्यापामुळे जमलेच नाही... तसेच आणखी म्हणजे—बाईंच्या कथांविषयी आपणांला जे काही बोलायचे होते ते बोलून झाले आहे गेल्याच भेटीत; तेव्हा आणखी भेटण्याचे काय कारण—असाही एक विचार मनात

निर्माण होत होता. एखाद्या विषयाचे किंवा व्यक्तीचे कुतूहल ओसरल्यावर जी काही एकप्रकारची पोकळी निर्माण होऊन औत्सुक्य व आकर्षण संपुष्टात येते, तसेच काहीसे माझ्याही बाबतीत झाले असेल, कुणी सांगावे !

सप्टेंबरच्या मध्यास माझा पहिला कथासंग्रह प्रसिद्ध झाला, तेव्हा त्याची एक प्रत घेऊन मी बाईंच्या भेटीस गेलो. ती प्रत मी बाईंना भेट म्हणून दिली. माणसाचे मन किती विचित्र असते ! माझा कथासंग्रह प्रसिद्ध होताच बाईंची भेट घ्यावी अन् माझ्या कथांबद्दलचे त्यांचे मत अजमवावे, माझ्या लिखाणात काही उणीवा असल्यास त्यांची जाणीव करून घ्यावी अशा प्रकारच्या विचारांची तीव्रता वाढू लागली होती. अशा विचारांतच मी बाईंच्या भेटीस गेलो होतो.

माझा कथासंग्रह पाहताच बाईंना फार आनंद झाला. " छान !" कौतुकाने त्या म्हणाल्या, " नंतर मी वाचीन हं..."

" वाचून अभिप्रायही सांगितला पाहिजे तुम्ही बाई !" मी आग्रही स्वरांत म्हणालो, " निदान माझ्या लिखाणातील दोष तरी दाखवून द्यायला हवेत !"

यावर बाई हसल्या. म्हणाल्या, " दोष दुसऱ्याने दाखवून देण्यापेक्षा ते स्वतःचे स्वतःलाच कळून यायला हवेत, नाही का ?"

" स्वतःचे स्वतःला कळून येणे कसे शक्य आहे ?"

" आता जरी नाही कळले तरी पुढे हळूहळू कळून येतीलच की !"

यावर मी निरुत्तर झालो. थोडा निराशही. तरी पण मी अखेरचा प्रयत्न करण्यासाठी म्हटले, " बाई, मी तुमचा विद्यार्थी असतो तरी असंच सांगितलं असतं ?"

" हो...स्वतःच स्वतःच्या लिखाणातल्या उणीवा समजून घेणं हे केव्हाही जास्त चांगलं असतं. ह्याचा परिणामही लिखाण सुधारण्यासाठी फार चांगला होतो..."

" मी पुन्हा याबद्दल आपणास भेटायला येईन, आता चलतो मी..."

" बसा ना– थोडा चहा घेऊन जा."

" छे: छे:, चहा नको आता, उगीच तुम्हांला त्रास..."

" त्रास कसला त्यात," आणि बाई आत वळल्या. नेहमीप्रमाणे भांडी घासायला म्हणून १०–१२ वर्षांची जी मुलगी येत होती तिला त्यांनी कॉलेज कॅन्टिनमधून चहा व काही खायला घेऊन येण्यास सांगितले...

चहा घेऊन झाल्यावर मी बाईंचा निरोप घेतला.

यानंतर दसरा-दिवाळीची सुट्टी पडली; आणि बाई गावी निघून गेल्याचे समजले. दिवाळी अंकांचे वाचन हा एक मोठाच उद्योग होऊन बसला. पाच-सहा दिवाळी अंकांत माझ्या कथा प्रसिद्ध झाल्या होत्या. मराठीतील इतर 'फॉर्मा'तील लेखकांनी २५–२५, ३०–३० कथांचे रतीब घातले होते...

ह्या सर्वांत बाईंची गैरहजेरी फार जाणवत होती, खटकत होती... बाई अलीकडे का लिहीत नाहीत ? गेले दीड-दोन वर्षे बाईंनी काहीच लिखाण केलेले नव्हते. बाईंच्या कथा नवसाहित्याचा पुरस्कार करणाऱ्या त्या मासिकातच प्रसिद्ध होत असत, आणि त्याच मासिकाचा मी एक वर्गणीदार अन् त्यामुळे नियमित वाचक होतो. त्यामुळे मी हे ठामपणे सांगू शकत होतो.

दिवाळीची सुट्टी संपली. गावाहून बाई परत आल्याचे समजले. साहित्याचे नादिष्ट असे आम्ही दोन–चार तरुण होतो. आम्ही एकत्र जमल्यावर आजकालचे साहित्य, लेखक–संपादक–प्रकाशक यांचे परस्पर संबंध व मानगडी, त्यांचे चांगले, बोगस, किंवा चोरलेले साहित्य अशा विषयावरच बोलणे होई. आजकाल चांगले कसदार साहित्य वाचणे कसे दुर्मिळ झाले आहे, केवळ ' मानधनावर नजर ठेवून प्रथितयश लेखकांनी साहित्याचे कसे कारखाने काढले आहेत, ह्या कारखान्यांत तयार झालेले टाकाऊ साहित्य संपादक कसे छापतात अन् अशा प्रकारे लेखक व संपादक मिळून वाचकांच्या खिशावर डल्ला मारून त्यांची कशी फसवणूक करतात वगैरे बरेच काही आमच्या बोलण्यात येई... मराठी साहित्याच्या भविष्यकाळाविषयी आम्ही चिंतातुर होऊन उगीच हळहळत असू आणि चर्चा करीत असू, ह्या अशा वेळी बाईंनी तरी निदान आपले लिखाण थांबवू नये ! त्यांनी का लिहायचे बंद केले असावे ?

तेव्हा एक भला रविवार गाठून आमचे हे टोळके बाईंना भेटायला गेले. यांत फक्त मी सोडून बाकीचे सर्व बाईंचे विद्यार्थीच होते. त्यामुळे संभाषणाला एक निराळाच मोकळेपणा आला... मध्येच केव्हा तरी मी विचारले.

" बाई, तुमच्याविषयी एक फार मोठी तक्रार घेऊन आलो आहोत आम्ही ! "

" माझ्याविषयी ?" बाईंच्या चष्म्याआडचे डोळे मोठ्या गमतीदारपणे फडफडले... हे सारे त्यांना अनपेक्षित होते, म्हणून आश्चर्य वाटले.

" होय. आजकाल तुम्ही लिहायचं बंद का केलंय् ?"

" कशावरून म्हणता–बंद केलंय् ?"

" अलीकडे वर्षा–दीड वर्षांत आपलं कुठंच काही प्रसिद्ध झालेलं नाही !"

" प्रसिद्ध झालं नाही म्हणून लिहिलंहि नाही, असं कसं ठरविता ?"

बाईंनी आम्हांला उलट प्रश्न केला, आणि आम्ही सारे बुचकळ्यात पडलो. बाईंचे चष्म्याआडचे डोळे गंमतीने आमच्याकडे पाहू लागले !

" बरं, लिहिलंय तर प्रसिद्धीला तरी का पाठवायचं नाही ते ? " आमच्यातील एकाने भीत भीत विचारले.

" लिहिलं म्हणजे ते प्रसिद्धीला पाठवावं असं कुठं आहे ? आणि नाही पाठवलं म्हणून काय होतं ? "

मघा आम्ही बुचकळ्यात पडलो होतो, आता तर कोलमडूनच गेलो. आम्ही जसं

बाईंना अनपेक्षितपणे विचारलं होतं, तशी त्यांची ही उत्तरं, हे बोलणं आम्हांला-देखील अनपेक्षित होतं.

" मग लिहायचं तरी कशाला ? " थोडचाशा त्राग्याने एकाने प्रश्न केला.

" स्वतःच्या समाधानासाठी लिहायचं ! " शांतपणे बाई म्हणाल्या.

" आणि मग यापूर्वी तुम्ही लिहून प्रसिद्धीला पाठवलं, त्याचं काय ? "

" लिहिताना माणूस कलावंत असतो अन् लिहिल्यावर त्याच्या जागी व्यवहारीपणा येतो; म्हणून तो ते प्रसिद्धीस पाठवितो..."

" पण आताच असं का ? "

" आता वाटतं–लिहायचंच कशाला ? आणि लिहिलं तर ते प्रसिद्धीला तरी कशाला पाठवायचं ? "

" ज्यांच्या लिखाणाकडे आम्ही आशेनं पाहतो त्यांनीच असं हातपाय गाळल्यावर मग आशेनं पाहायचं कुणाकडे ? टक्का शेर भावाने कथाकादंबऱ्यांचे रतीब घालणाऱ्या बाजारू लेखकांकडे, की नवीनतेच्या नावाखाली मराठी वाङमयात नाही तसा धुडगुस घालणाऱ्या ह्या विक्षिप्त नवसाहित्यिकांकडे ? "

यावर बाई काही बोलल्या नाहीत. लहान मुलांची वटवट गमतीनं ऐकताना, मोठ्यांच्या चेहऱ्यावर भाव असतो तसा त्यांच्या चेहऱ्यावर होता.

" बाई, तुम्ही लिहायलाच हवं ? " मी म्हणालो, " बाई, आम्हांला तुमचं बोलणं खरं वाटत नाही. खरंच तुम्ही अलीकडे बरंच काही लिहिलं असलं पाहिजे..."

" मग समजा असं–बाईंनी खूप खूप लिहिलंय...बरंचसं लिहिलंय्...! " आणि बाई हसू लागल्या...

अन् ह्या भेटीत हा विषय तसाच राहून गेला...

बाईंच्या प्रत्येक भेटीत असं काही तरी निराळं, वेगळं ऐकायला मिळायचं... बाईंची मतं, बाईंचं बोलणं हे सारं कुठल्या चौकटीत बसणारं होतं ? त्या स्वतःच्या कथांविषयी कधीच बोलत नसतं, काही विचारलं तर मोठ्या कौशल्याने तो विषय बदलीत...त्यांच्या स्वभावाचा थांग लागणं फार कठीण होतं...त्यामुळं त्यांच्याविषयी माझ्या मनात सारे प्रश्नच प्रश्न होते—

बाईंचा ओढ सार्त्र, कामू, जिरादू, डिलन टॉमस अशा लेखकांकडे. मराठी वाङमयाबद्दल त्यांना तितकीशी आस्था नव्हती; तरीही त्यांनी मराठीमध्ये काही लिहिलं हे आश्चर्य म्हणायचं की योगायोग! बाईंनी पूर्वी कुठल्या प्रेरणेनं लिहिलं ? आणि आता लिहायचं बंद केलं ते का म्हणून ?

मध्ये, जवळच्या एका मोठ्या शहरातील कॉलेजमध्ये एक परिसंवाद झाला. साहित्य अकादमीचं बक्षीस मिळालेली एक ताजी कादंबरी हा परिसंवादाचा विषय होता. ह्या परिसंवादामध्ये भाग घेण्यासाठी बाईंनाही आमंत्रण आलं होतं...साऱ्या

वक्त्यांनी आपल्या भाषणामध्ये त्या कादंबरीचा उदोउदो केला...बाई उठून उभ्या राहिल्या आणि त्यांनी कादंबरीच्या एका अंगावर कडाडून हल्ला चढविला अन् त्या कादंबरीची लक्तरे श्रोत्यांसमोर टांगली...सारे श्रोते व वक्तेही अवाक् झाले. त्या मध्यम उंचीच्या, शुभ्र वस्त्रातील मूर्तीकडे अचंब्याने पाहू लागले...बाईंनी ती सभा जिंकली; बाकीचे सारे वक्ते निष्प्रभ झाले. त्या कादंबरीवर बाईंनी घेतलेले आक्षेप त्यांना खोडूनच काढता आले नाहीत !

बाईंचा हा विजय पाहून मला वाटले, मराठी वाङ्मयाबद्दल बाईंना तितकीशी आस्था नाही, असे आपण समजत होतो; मग हे कसे घडले ? बाई इतक्या काळजी-पूर्वक मराठी वाङ्मय वाचतात ? इतके तळमळून मराठी वाङ्मयावर बोलतात ?

सारेच अनोखे ! सारेच निराळे ! सारेच आश्चर्यकारक ! बाईंच्याबद्दलचं माझं लेखकीकुतूहल चाळवलं—बाई कशा आहेत ? कशा असतील ?

एखाद्या खोल खोल विहिरीच्या तळाचा ठाव घेण्याची अयशस्वी धडपड केल्या-प्रमाणे मला वाटायचे अशा वेळी...

असेच भराभर दिवस सरले, विद्यार्थ्यांच्या परीक्षा झाल्या, अन् ते वर्ष संपले. फारच लवकर...

सुट्टी संपताच बाई आपल्या गावी केव्हा निघून गेल्या, ते मला समजलेही नाही.

सुट्टीत अनेक अफवा उठल्या...पुढील वर्षी बाईंना घेण्यात येणार नाही; त्यांच्या जागी मराठीसाठी दुसरं कुणी तरी येणार आहे..कुणी असं म्हणत; तर कुणी म्हणत, अजून काहीच निश्चित ठरलेलं नाही; पण बराच स्टाफ बदलणार आहे...वगैरे.

कॉलेज खाजगी होतं; कॉलेजच्या संचालक मंडळामध्ये, तसेच विद्यापीठामध्येही नामांकित 'उद्योग' करणारे प्राध्यापक कॉलेजमध्ये होते...यांतील काही गणंगांना मराठी विभागाच्या प्रमुख असलेल्या बाईंचे वर्चस्व सहन झाले नसावे किंवा असलेच काही कारण असेल..

हे मात्र खरे होते की, बाई कॉलेजमध्ये आल्यापासून त्यांच्या विद्वत्तेपुढे व व्यासंगापुढे मराठीचे इतर प्राध्यापक निष्प्रभ पडले होते.

तेव्हा अशांची कारस्थाने यशस्वी झाली असतील. खाजगी कॉलेजामध्ये हे असेच चालायचे—तेथे विद्वानांचा अवमान व्हायचा अन् मूर्खांची खोगीर भरती केली जायची. तेव्हा ही अफवा खोटी कशी म्हणावी, मला कळेना ! एकाच वेळी गेल्या वर्षातील सर्व घटना आठवल्या अन् वाटतं—आपलं हे श्रद्धास्थान असं नष्ट होणार आहे का ? उगीच काळजाला तात लागून राहिली.

बाईंना व्यवहारी जगाच्या ह्या व्यवहारी हालचाली कितपत ज्ञात असतील ? बाई पुढील वर्षी कुठे असतील ? काय करीत असतील ?

असेच दिवस जात होते. मे संपला. जून सुरू झाला. आणि नवसाहित्याचा पुरस्कार करणाऱ्या त्या मासिकाच्या जूनच्या अंकात बाईंची कथा प्रसिद्ध झालेली आढळली.

मला खूप खूप आनंद झाला. वाटलं बाई पुन्हा लिहायला लागल्या, हे फारच चांगलं झालं. कॉलेजच्या व्यापातून त्यांना कदाचित् लिहिणं जमलं नसेल, आणि आता...

आणि नेहमीसारखी कॉलेजं सुरू झाली. एके दिवशी बाळासाहेबांनी सांगितलं— बाई ह्या वर्षीही कॉलेजात आलेल्या आहेत !

मग, मध्ये उठविण्यात आलं होतं ते खरं की खोटं ? की आधी घेतलेला निर्णय मग बदलला ? की केवळ ती अफवा होती.

काही का असेना; बाई ह्या वर्षी कॉलेजला आहेत, हे सत्य होतं; अन् एवढंच माझ्यासाठी पुरेसं होतं...

बाईंची कथा प्रसिद्ध झालेला तो अंक मी हाती घेतला अन् सायकलवर टांग टाकून कॉलेजकडे निघालो...भराभर पायडल मारू लागलो...मला बाईंशी खूप खूप बोलायचं होतं, काही विचारायचं होतं...या ताज्या कथेबद्दल, तसेच...

मी निम्मं अंतर काटलं असेल नसेल एवढ्यात वळवाच्या पावसाची एक जोरदार सर आली अन् मी तीत पुरता भिजून गेलो.

मला आठवले, गेल्या वर्षी बाईंना प्रथम भेटायला जाताना वाटेत असेच आपण भिजलो होतो अन् आपल्या 'अवतारा'कडे पाहून बाई म्हणाल्या होत्या, " अरे पण, तुम्ही भिजलाय् किती ! चला, थोडा गरम गरम चहा करून देते तुम्हांला ! "

आणि वाटले, बाईंनी आताही असेच म्हणावे. त्यांनी केलेला गरम गरम चहा आपण प्यावा अन् भान हरपून त्यांच्या कथेवर बोलत राहावे—खूप वेळ, खूप खूप वेळ !

● ● ●



# आणि ड्रॅगन जागा झाला

लेखांक चवथा

## अरुण साधू

उंच उंच करड्या रंगाच्या भिंती, शेकडो शतकांपासून उभ्या असलेल्या इमारती यामुळे पेकिंगच्या प्राचीनत्वाची साक्ष सहजच पटते. जगातल्या प्राचीनातल्या प्राचीन शहरांपैकी पेकिंग हे एक आहे. 'पेकिंग मानव' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या अतिप्राचीन मानवाचे सांगाडे पेकिंगच्या आसपासच सापडले आहेत.

भारताच्या इतिहासात जसे दिल्लीचे महत्त्व होते, तसेच थोड्याफार फरकाने चीनमध्ये पेकिंगचे होते. पेकिंग काबीज केल्याशिवाय चीनवर राज्य केल्यासारखे होत नसे. म्हणून सत्ताभिलाषा धरणाऱ्या कुठल्याही चिनी सरदाराच्या व बंडखोराच्या मोहिमेची सुरुवात 'चलो पेकिंग'नेच होत असे. म्हणूनच डॉ. सन् यत सेनने आणि त्याच्यानंतर चॅन्ग-कै-शेकने शेवटपर्यंत पेकिंगच्या स्वारीच्या मोहिमा आखणे सोडले नाही. आणि सत्ता हाती आल्याबरोबर कम्युनिस्टांनी पेकिंग हीच आपली राजधानी जाहीर केली.

'पेकिंग' या शब्दाचा अर्थच आहे, उत्तरेची राजधानी. चिनी इतिहासात जास्तीत जास्त काळ राजधानीचे वैभव उपभोगलेल्या या नगरीच्या वायव्येला तीस मैल अंतरावरून ती सुप्रसिद्ध चीनची भिंत जाते. उत्तरेकडील रानटी टोळयांपासून चीनचे रक्षण करण्यासाठी 'चिन' बादशहाने इ. स. पूर्वी दुसऱ्या शतकात ही भिंत बांधण्यास प्रारंभ केला होता.

फ्रान्सला जाण्याच्या उद्देशाने माओ-त्से-तुंग चांगशाहून मोठ्या उत्साहाने या अवाढव्य पेकिंगमध्ये आला खरा; पण फ्रान्सला न जाता त्याला शेवटी पेकिंगमध्येच राहावे लागले. प्रवासापुरतेही त्याच्याजवळ पैसे नव्हते आणि त्याला जाणे बरेही वाटत नव्हते. कारण फ्रान्सला विद्यार्थी पाठविण्याची योजनाही साम्राज्यवाद्यांच्या डोक्यातून उतरली होती आणि डॉ. सन् यत सेनने तिचा निषेध केला होता.

पहिले महायुद्ध सुरू झाल्यानंतर अडीच-तीन वर्षांनी म्हणजे १९१७ मध्ये ब्रिटनच्या आग्रहाने पेकिंगचे चिनी सरकार ब्रिटनच्या बाजूने युद्धात पडले होते. युद्ध-प्रयत्नांना मदत म्हणून ब्रिटनच्याच विनंतीखातर चीनमधून फ्रान्समध्ये हजारोंच्या संख्येने मजूर पाठविण्यात येऊ लागले, त्याच सुमारास चिनी विद्यार्थ्यांसाठी नोकरी करून शिकण्याची ही योजना होती.

१९१८ च्या उन्हाळ्यात् माओ-त्से-तुंग पेकिंगमध्ये आला, तेव्हा पेकिंग कसे अगदी शांत होते. चार वर्षे गाजत असलेल्या आणि आता संपत आलेल्या महायुद्धाचा तेथल्या जीवनावर जणू काहीच परिणाम आला नव्हता. सरदारी राजवट उलट भरभराटीला आल्यासारखी दिसत होती. दूर दक्षिण चीनमध्ये कॅन्टॉनमध्ये चालू असलेल्या डॉ. सन् यत सेनच्या चळवळींचा आवाज पेकिंगपर्यंत ऐकू येतच नव्हता. त्याची कुणाला तिथे क्षितीही दिसत नव्हती. वायव्य सीमेपलीकडे रशियात आणि सायबेरियात कम्युनिस्टांच्या लाल सेना झारशाहीची सारी चिन्हे नेस्तनाबूत करीत होत्या. त्यातही पेकिंगच्या राजवटीला स्वारस्य वाटत नव्हते.

अशाही परिस्थितीत चीनमधून ठिकठिकाणाहून परागंदा झालेले बुद्धिवादी, राजकारणी, क्रांतिकारक पेकिंगमध्येच नव्या घटनांची मोठ्या आशेने वाट पाहत वावरत होते. पहिल्या महायुद्धात लोकशाहीवादी राष्ट्रांचा विजय होत होता आणि एकदा या उदारमतवादी, लोकशाहीमतवादी राष्ट्रांचा विजय झाला की चीनमध्ये मग क्रांती होऊन प्रजासत्ताक राज्य यावयास उशीर लागणार नाही, असे त्यांना वाटत होते. युद्धाच्या गडबडीत जपानने लटपटी करून पेकिंग सरकारच्या संमतीने चीनमधील संस्कृतीचे माहेरघर समजल्या जाणाऱ्या ईशान्य भागातील शांटुंग प्रांतावर ताबा मिळविला होता. तो या क्रांतिवाद्यांच्या, बुद्धिवाद्यांच्या डोळ्यांत सलत होता. महायुद्ध संपल्यानंतर तो प्रांतही चीनला परत मिळेल, असे त्यांना वाटत होते.

## पगार रुपये पस्तीस

सुरुवातीला माओला पेकिंगमध्ये भयंकर निराशाजनक अनुभव आला. त्याचे विद्यार्थी मित्र फ्रान्सच्या दिशेने निघून गेले आणि निष्कांचन माओ पेकिंगमध्ये एकटाच उरला. त्याला नोकरी नव्हती, उदरनिर्वाहासाठी दुसरे साधन नव्हते आणि शहरात विशेष आवश्यक अशा कुणाच्या ओळखीही नव्हत्या. मात्र प्रोफेसर यॉंग चांग ची त्याच सुमारास पेकिंग विद्यापीठात आला होता. त्याच्या मदतीने माओला विद्यापीठाच्या वाचनालयात नोकरी मिळाली खरी, पण ती अतिशय हीन दर्जाची होती. वाचनालय स्वच्छ ठेवणे, पुस्तके साफ करणे हे त्याचे काम होते.


महिन्याला सुमारे ३५ रु. पगार मिळत होता. विद्यापीठाजवळच एक दोन खोल्यांच्या घरात त्याचे सहा हुनानी मित्र राहत होते. त्यांतच माओलाही जागा

ताश्कंद कराराचे आम्ही मनोभावे पालन केले.

रक्ताचे सडे शिंपून जिंकलेला मुलुख शत्रूला परत केला . . . सैन्य माघारी घेतले, का ? आपले परावलंबन. नागरिकांचा उत्साह ओसंडत होता, जवानांचे बाहु फुरफुरत होते, पण हातात नव्हती स्वतःच्या मालकीची शस्त्रे, पोटात नव्हते स्वतः पिकवलेले अन्न. हाती आलेला विजय दवडावा लागला तो या परावलंबनामुळे —



हे परावलंबन कमी करण्याचे
प्रयत्न आता जारीने सुरू आहेत . .



उत्तर पाकिस्तानातील आणि
किस्तानव्याप्त काश्मीरातील
टोळीवाल्या ' मुजाहिदां 'ना,
नां सैन्याच्या ज्यात हातखंडा
ाहे, अशा गनिमी पद्धतींच्या
युद्धाचे शिक्षण १९६४ च्या
डिसेंबरपासून देण्यास सुरुवात
ली.या मुजाहिदांना काश्मिरात
वून, त्यांच्यामार्फत घातपाती
कृत्ये घडवून, काश्मीरातील
जनतेने स्वातंत्र्यासाठी बंड
ारले आहे, असा जगभर प्रचार
रावयाचा आणि मग काश्मीरी



जनतेच्या मदतीला सैन्य पाठवायचे, अशा तऱ्हेची एक गुप्त योजना पाकिस्तानने आखली.

—लाहोरच
म्हणून का
सैल पडला
वाहत अस
' नंदनव
—शाही वा
जेहलमच















—योजना फसली. मुजाहिद सापडले—
त्यांच्याजवळचे
शस्त्रास्त्रांचे साठे जप्त करण्यात आले.
—लाहोरच्या दिशेने भारतीय फौजांनी कूच केले
म्हणून काश्मीरवरील पाकिस्तानी सैन्याचा फास
सैल पडला, युद्ध थांबले. युद्धाच्या जखमा अंगावर
वाहत असतानाच काश्मीरने आपल्या नित्याच्या
'नंदनवनी' जीवनाला हळूहळू सुरुवात केली.
—शाही बागा गुलहौशी प्रवाशांनी फुलू लागल्या,
जेहलमच्या संथ प्रवाहात शिकारे डोलू लागले.

तऱ्हेची एक





इकडे कैलासावर गहजब उडाला.
शिवपार्वतींचा खेळ सुरू होता . सारीपाटाचा
शंकरांवर डाव हरण्याची पाळी आली.
नेहमीप्रमाणे डोक्यात राख घालून ते कुठेतरी निघून गेले.
पार्वतीने नृत्याची तयारी केली–
मध्यस्थीला नारदाला घेतले–
आणि सुरू झाले
" जय जय गौरीशंकर "
'नृत्यगाननिपुण 'लीलावतीच्या नृत्यगानाने शिवशंकर तृप्त झाले,
प्रसन्न होऊन ते तिच्यावर सुखानंदाची
संगीताची शुभ्र बरसात करू लागले.



पण या रंगाचा केव्हा बेरंग होईल,
आपले शंभुमहाराज डोक्यात राख घालून
केव्हा निघून जातील, याची मनोमन
शाश्वती नसल्याने ती चतुर दक्षकन्या
पार्वती आपल्या पतिदेवांना
हळूच आवरते, सुचवते. . .
'प्रियकरा छंद नसे हा भला' .........

मिळाली. हुनान प्रांतापेक्षा पेकिंग बरेच उत्तरेला आहे. त्यामुळे तेथील थंडी कडाक्याची. खोलीमध्ये हवा गरम ठेवण्याची काही व्यवस्था नव्हती आणि माओजवळ गरम कोट, पांघरुणे घ्यायला पैसा नव्हता.

या दारिद्र्यात भर पडत होती तो वाचनालयात येणाऱ्या लोकांच्या वागणुकीने. विद्यापीठाच्या त्या वाचनालयात पेकिंगमधील मोठमोठे पुढारी आणि साहित्यिक नियमाने येत. माओला तर त्यांच्याविषयी फार आकर्षण असे आणि त्यांच्याशी तो बोलण्याचा प्रयत्नही करी. पण त्याचा हीन दर्जा, दरिद्री अवतार आणि दक्षिणी उच्चार यांमुळे सारे त्याला टाळीत. अशा विषण्ण अवस्थेत आपले आवडते प्रोफेसर यॉंग चांग ची यांच्या घरीही जाण्याची त्याला लाज वाटे.

पण त्याची ही निराशा फार काळ टिकली नाही. पेकिंगमधील बुद्धिवाद्यांच्या चैतन्यमय वातावरणात तोही लवकरच मिसळून गेला. त्याने पुन्हा वाचनास जोराने सुरुवात केली. हळूहळू तो नवे मित्र जोडू लागला. वेगवेगळ्या संघटनांच्या सभांना तो जाऊ लागला. पत्रकारांच्या, राजकारण्यांच्या अभ्यासमंडळांत तो जाऊन बसू लागला. थोड्याच दिवसांत त्याचा उद्वेग आणि न्यूनगंड पार मावळला आणि आपल्या जाड्याभरड्या कपड्यांची पर्वा न करता प्रोफेसर यॉंग चांगची यांच्याकडे चर्चेसाठी नियमाने तो जाऊ लागला. त्याच्या आयुष्यातील सर्वांत आनंदी कालखंडाला सुरुवात झाली होती.

अवध्या चीनप्रमाणे प्रोफेसर यॉंगच्या घरीही नवविचारांचे वारे वाहू लागले होते. देशाच्या राजकारणावर, समाजकारणावर त्यांच्या घरी विद्यार्थी तासन् तास कडाक्याची चर्चा करीत. प्रोफेसर महाशयांची तरुण सुंदर आणि हुशार मुलगी यॉंग कुई हुई हीसुद्धा या चर्चांमध्ये भाग घेत असे.

माओ या वेळेस पंचवीस वर्षे वयाचा होता. पेकिंगच्या वातावरणात त्याच्या चेहऱ्यावर एक वेगळेच तेज आले होते. तो उंच आणि सडपातळ होता. त्याच्या अंगावर आणि चेहऱ्यावर अजून फारसे मांस चढले नव्हते. त्याचे काळेभोर डोळे, ठळक भुवया, भव्य भालप्रदेश त्याच्या जोरदार अंतर्गत सामर्थ्याची साक्ष देत होते. चर्चांमध्ये तो अतिशय मनापासून भाग घेई. ओठ दुमडून अतिशय लक्ष देऊन तो दुसऱ्याचे संभाषण ऐकत असे. आणि कधीकधी गंभीरपणा जाऊन तो एकदम बालिश स्मिताने उजळून जाई. त्याचे स्मित आकर्षक होते.

निदान यॉंग कुई हुईला तरी ते अत्यंत आकर्षक वाटत असले पाहिजे. कारण तशी चिन्हे दिसू लागली होती. माओबरोबर त्याचे जे मित्र प्रो. यॉंगकडे येत त्यांच्या लवकरच ध्यानात आले की माओ आणि हुई कुई यांच्यांतील प्रकरण चांगलेच रंगत आहे.

माओचे सारे बालपण दारिद्र्यात, कष्टांत आणि हालअपेष्टांत गेले होते. तारुण्यातही त्याला आतापर्यंत एकलकोंडेपणाने उपासमारीत जीवन काढावे लागले

होते. आणि आता एकदम त्याच्यावर सुखाचा वर्षाव होत होता. एका आधुनिक, सुशिक्षित आणि सुंदर मुलीवर त्याचे प्रेम जडले होते आणि लवकरच ती दोघे लग्न करणार होती.

या आनंदी वातावरणातच ११ नोव्हेंबर १९१८ रोजी पहिल्या महायुद्धाचा दोस्तांच्या बाजूने निकाल लागला होता. पेकिंगभर आणि साऱ्या चीनभर विजयोत्सव उत्साहाने साजरे झाले. दोस्तांचा विजय झाला म्हणून पेकिंग सरकारला आनंद झाला होता आणि हुकूमशाहीविरुद्ध लोकशाहीवादी राष्ट्रांचा विजय झाला म्हणून चीनमधील साऱ्या क्रांतिवाद्यांना आणि लोकशाहीवाद्यांना आनंद झाला होता. या आनंदाच्या भरात १७ नोव्हेंबर रोजी पेकिंगमध्ये झालेल्या विजय-संचलनात माओ आणि त्याच्या मित्रांनीही भाग घेतला होता.

## आनंदी आनंद

आता क्रांतिवाद्यांचा व लोकशाहीवाद्यांचा चीनमध्येही विजय होण्यास हरकत नव्हती; कारण युद्धाच्या शेवटालाच अमेरिकन अध्यक्ष वुड्रो विल्सन यांनी जगातील सर्व राष्ट्रांसाठी स्वयंनिर्णयाची तत्त्वे जाहीर केली होती. ही स्वयंनिर्णयाची तत्त्वे चीनमध्येही अंमलात आणण्यास व चीनला संपूर्ण सार्वभौमत्व प्राप्त करून देण्यासही पाश्चात्त्य राष्ट्रे मदत करतील व पूर्वी त्यांनी ज्या अन्याय्य व्यापारी व आर्थिक सवलती चीनमध्ये स्वतःच्या बळावर प्राप्त करून घेतल्या होत्या त्यांवर ते पाणी सोडतील, असे डॉ. सन् यत सेन, त्याचे अनुयायी आणि इतर अनेक लोकशाही-वाद्यांना वाटू लागले होते.

पण त्यांची ही आशा फार काळ टिकून राहिली नाही. लोकशाहीवादी राष्ट्रांनी पाश्चात्त्य-धार्जिण्या चिनी जनतेला एकामागून एक असे काही धक्के दिले की लवकरच तमाम जनता आणि विद्यार्थी खवळून उठले आणि आधुनिक चीनमधील दुसरा ऐतिहासिक उठाव घडून आला.

महायुद्ध संपल्यानंतर जानेवारी १९१९ मध्ये पॅरिस येथे भरलेल्या शांततापरि-षदेत राष्ट्राराष्ट्रांची भवितव्ये घडत होती. चीनच्या शांटुंग प्रांताचे भविष्यही इथेच घडणार होते. त्यामुळे चिनी जनता या परिषदेकडे मोठ्या अपेक्षेने डोळे लावून बसली होती.

परंतु जपाननेच या परिषदेत एक धक्का देणारा गौप्य स्फोट केला. आपण शांटुंग प्रांतावर ताबा मिळवला तो ब्रिटन, फ्रान्स आणि इटली यांच्या संमतीनेच. १९१७ साली या तीन राष्ट्रांनी एका गुप्त कराराअन्वये या चिनी प्रांतावर ताबा मिळविण्यास आपणांला संमती दिली, असे जपानने जाहीर केले व त्यामुळे आपण शांटुंग सोडणार नाही असे सांगून टाकले.

मागाहून आणखी एक वार्ता कळली. पेकिंगच्या सरदारी राजवटीने जपानकडून

एक मोठे गुप्त कर्ज काढले होते व त्या रकमेच्या मोबदल्यात पेकिंग सरकारने शांटुंग प्रांत खुशीने जपानला दिला होता.

### गुप्त कराराचा धिक्कार

एकामागून एक झालेल्या या गौप्यस्फोटांमुळे चिनी जनता दिङ्मूढ झाली होती. पाश्चात्त्यांच्या कावेबाजपणाबद्दल चीड अनावर होत होती. तरीदेखील पॅरिस परिषदेत आपणांला न्याय मिळेल, जाहीर केल्याप्रमाणे जनतेच्या इच्छेला मान मिळेल असे त्यांना वाटत होतेच.

परंतु पॅरिस परिषदेने जनतेच्या इच्छाआकांक्षा पायदळी तुडवून त्यांच्या अपेक्षांचा चक्काचूर केला. परिषदेने चीनच्या विरुद्ध निर्णय दिला. जपानने कर्ज देऊन शांटुंग प्रांत विकत घेतला असे सांगण्यात आले.

झाले. पॅरिसच्या अन्यायी निर्णयाने चिनी जनतेला आणि विद्यार्थ्यांना प्रचंड धक्का बसला. देशाचा एक मोठा प्रांत कर्जासाठी तेथील जनतेला न सांगता विकला जातो आणि त्यावर लोकमताचा, जनतेच्या इच्छेचा डिंडिम वाजविणारी पाश्चात्त्य लोकशाहीप्रेमी राष्ट्रे निर्लज्जपणे शिक्कामोर्तब करतात म्हणजे काय! साऱ्या चीनला एकदम खडबडून जाग आली आणि कळून चुकले की ही सारी राष्ट्रे दांभिक आहेत, स्वार्थी आहेत, लष्करी मनोवृत्तीची आहेत आणि सत्याची तर यांना मुळीच चाड नाही. वुड्रो विल्सनसारख्या तथाकथित महान् नेत्यांच्या फोल तत्त्वांवरही विश्वास ठेवण्यात अर्थ नाही, हे चिनी जनतेला कळून चुकले.

संतापाची एक तीव्र लाट साऱ्या चीनभर पसरली. प्रत्यक्ष कृतीची आता वेळ आली होती.

३ मे १९१९ रोजी पेकिंगच्या विद्यार्थ्यांनी एक सभा घेऊन पॅरिस निर्णयाविरुद्ध जोराचा लढा देऊन शांटुंग प्रांत विकणाऱ्या सरदारी मंत्र्यांना पदभ्रष्ट करावयाचे ठरविले.

दुसऱ्या दिवशी सकाळपासून पेकिंग विद्यापीठाच्या आवारात विद्यार्थी जमू लागले. सकाळी दहा वाजण्याच्या सुमारास ते मोठ्या मिरवणुकीने पेकिंग तियेन–आन–मेन या मुख्य चौकात आले. हा वेळपर्यंत त्यांची संख्या दहा हजारांवर गेली होती. त्यांच्या हाती लाकडी दंडुके, लोखंडी सळया आणि काचेच्या बाटल्या दिसत होत्या. तेथून त्यांनी "सत्ता स्पर्धेचा धिक्कार असो", "गुप्त करार जाळून टाका", "जपानचा धिक्कार असो" अशा घोषणा देत चीनला न्याय मागण्यासाठी परदेशी वकिलातीवर मोर्चा नेला.

प्रथम त्यांनी अमेरिकन वकिलातीवर मोर्चा नेला. पण अमेरिकन वकिलाने त्यांच्या प्रतिनिधींची भेट घेण्याचे नाकारले. वकिलातीभोवती परदेशी सनिकांचा पहारा होता. मायभूमीवर परकीय सैनिक अडवतात म्हणजे काय? विद्यार्थ्यांचे

पित्त खवळले. ज्या राज्यकर्त्यांनी ही परिस्थिती आणली, त्यांच्या शोधात प्रक्षुब्ध विद्यार्थी निघाले. प्रथम त्यांनी अर्थमंत्र्यांच्या निवासस्थानाकडे मोर्चा वळवला त्याच घरी पेकिंग सरकारचे तीनही जपानधार्जिणे मंत्री असल्याचे त्यांना कळले त्यांनी घरावर दगडफेक करावयास प्रारंभ केला आणि सशस्त्र पोलिसांचे कडे तोडून ते आत घुसले. त्या तीन मंत्र्यांना सपाटून मार बसला असता. पण तेवढ्यात पोलिसांनी गोळीबार करावयास सुरुवात केली. आणि विद्यार्थ्यांना पळून जावे लागले.

चीनमध्ये विद्यार्थ्यांनी केलेले असे हे पहिलेच निदर्शन होते. त्यांच्या प्रभावाने स्वत: विद्यार्थीच आश्चर्यचकित झाले होते. स्वत:ची शक्ती त्यांना प्रथमच जाणवली होती. दुसरे दिवशी विद्यार्थ्यांनी संपास सुरुवात केली आणि पेकिंगच्या पावलावर पाऊल ठेवून शांघाय, नानकिंग आणि इतर चिनी शहरांतील विद्यार्थ्यांनीही उग्र निदर्शनांना सुरुवात केली.

सरकारही स्वस्थ बसले नव्हते. लष्कराच्या मदतीने चळवळ दडपण्यास सुरुवात झाली. विद्यार्थ्यांच्या म्होरक्यांना अटक करण्यात आली. विद्यार्थ्यांच्या मतानुसार सरकार चालणार नाही असे जाहीर करण्यात आले.

मग विद्यार्थ्यांनी प्रथमच सार्वत्रिक संपाचे अस्त्र बाहेर काढले. वास्तविक पाहता विद्यार्थ्यांमध्ये कुणी मोठा नेता नव्हता. विद्यार्थ्यांनी सार्वत्रिक संपाचे आवाहन केले तरी इतर कामगारांवर ते पाळण्याचे कोठलेच बंधन नव्हते. परंतु विद्यार्थ्यांच्या या आवाहनाला अभूतपूर्व असा प्रतिसाद साऱ्याच कामगारांकडून मिळाला. पेकिंगमधील दुकाने पण बंद झाली. पेकिंग-तियेनस्तिन मार्गावरील रेल्वे कामगारांनी काम करण्याचे नाकारले. लगेच पेकिंगमधील औद्योगिक कामगारांनी संपात उडी घेतली. आणि त्या पाठोपाठ तियेनस्तिन, शांघाय, नानकिंग, हँकोव या शहरांतील कामगारांनीही विद्यार्थ्यांच्या विनंत्यनुसार संपूर्ण संप घडवून आणला.

शेवटी सरकारला मान तुकवावी लागलीच. त्या तीन जपानधार्जिण्या मंत्र्यांना हाकलून देण्यात आले. विद्यार्थ्यांच्या या चळवळीचा पूर्ण हेतू जरी सफल झाला नाही तरी विद्यार्थ्यांना आपल्या सामर्थ्याची जाणीव झाली आणि देशाच्या राजकारणात त्यांचा अधिकाधिक प्रभाव पडू लागला.

## विद्यार्थी नेता माओ

या 'चार–मे' चळवळीच्या चार महिनेच अगोदर माओ पेकिंग सोडून आपल्या मायप्रांतात चांगशाला आला होता.

पेकिंगच्या उण्यापुऱ्या सव्वा वर्षाच्या वास्तव्यात माओचे सारे व्यक्तिमत्त्व उजळून निघाले होते. हुनानमध्ये असताना तो हुनानच्या दऱ्याखोऱ्यांतून हिंडला होता.

आता तो पेकिंगच्या असंख्य बादशाही बागांमधून हिंडू लागला. पेकिंगच्या मध्य-भागाला निषिद्ध शहर ( फारबिडन सिटी ) म्हणत. बादशहांची आणि त्याच्या नातेवाईकांची निवासस्थाने तेथे असत. १९१३ साली बादशाही पदभ्रष्ट झाल्यावर सामान्यांना आता या जागेत प्रवेश मिळत होता. तेथील संगमरवरी पुलांवरून, रंगीत सुशोभित वृक्षांच्या रांगांमधून, आतील सरोवरांच्या काठच्या वैभवशाली राजवाड्यांच्या दालनातून तो आपल्या दारिद्र्याला विसरून मुक्तपणे संचार करू शकत होता. वसंतऋतूमध्ये साऱ्या पेकिंगवर हिरव्या रंगाची शाल पांघरली जाते आणि हिवाळ्यामध्ये तुरळक पडलेल्या बर्फामुळे राजशाही राजवाड्याच्या उंचच उंच लाल भिंतींचे आणि त्यांवरील कलत्या पिवळ्या रंगांच्या छपरांचे सौंदर्य अधिकच खुलते.

माओ कवी होता. कुई हुईच्या आणि पेकिंगच्या सौंदर्याच्या सहवासात तो आपले दारिद्र्य पार विसरून गेला.

याच सुमारास त्याची विद्यापीठ वाचनालयाचा ग्रंथपाल ली ता चाओ आणि विद्यापीठातील एक प्राध्यापक चेन तु हूसियू यांच्याशी मैत्री जमली. चेन तु हूसियू त्या वेळच्या पेकिंगच्या विद्यार्थ्यांचा आवडता नेता होता. पुढे दोनच वर्षांनी चिनी कम्युनिस्ट पक्षाची स्थापना झाली. पक्षाच्या इतर संस्थापकांमध्ये माओ, ली आणि चेन हे तिघेही होते.

पेकिंग विद्यापीठाच्या वाचनालयाचा यथेच्छ फायदा घेतल्यानंतर माओ-त्से-तुंगला पुन्हा बाहेर पडावेसे वाटू लागले. प्रत्यक्ष काही कृतीत भाग घ्यावा असे वाटू लागले. त्यात फ्रान्सला जाणाऱ्या विद्यार्थ्यांच्या जथ्याबरोबर तो शांघायपर्यंत आला. शांघायहून चांगशापर्यंत येण्यास त्याच्याजवळ पैसे नव्हते. त्याने तो सुमारे आठशे ते हजार मैलांचा प्रवास पायीच करण्याचे ठरविले व त्याप्रमाणे वाटेत वेगवेगळ्या ऐतिहासिक स्थळांची दर्शने घेत घेत तब्बल सहा आठवड्यांनंतर तो चांगशाला पोचला.

'मे-चार'च्या चळवळीची माओला चांगलीच संधी चालून आली. उठावामध्ये चांगशा शहराने उडी घेतली. विद्यार्थ्यांचा नेता म्हणून माओ आपोआप निवडला गेला. ह्या वेळपर्यंत त्याने चांगशातच स्थापन केलेले लोकांचे अभ्यास मंडळ चांगलेच संघटित झाले होते. पेकिंगमधील पुढाऱ्यांमध्ये माओच्या चांगल्या ओळखी झाल्या होत्या. वृत्तपत्रांतील स्तंभ-लेखक म्हणूनही त्याने आपली चमक दाखविली होती. त्यामुळे चांगशाच्या विद्यार्थ्यांना त्याचे नेतृत्व एकदम मान्य झाले.

चांगशाला येताच हुनान प्रांतातील विद्यार्थ्यांचे मुखपत्र म्हणून माओने 'हूसियांग रिव्हर रिव्ह्यू' हे वृत्तपत्र सुरू केले. त्याचा संपादक म्हणून त्याने लवकरच अखिल चीनमधील क्रांतिकारकांमध्ये चांगले नाव कमावले. चार मेच्या उठावाच्या वेळी त्याच्या वृत्तपत्राने आणि माओनेही चांगलेच काम केले. हुनानच्या

सरदारी राजवटीला त्याचा एवढा धाक बसला की विद्यार्थ्यांचा संप संपताच ताबडतोब ' हसियांग रिव्हर रिव्ह्यू 'च्या प्रकाशनावर बंदी घालण्यात आली.

परंतु विद्यार्थ्यांच्या चळवळींमधून, वृत्तपत्रीय लिखाणातून आणि अभ्यास मंडळांतून कितीही आवाज उठवला तरी कार्य साध्य होस नाही हे स्पष्ट दिसत होते. जुलुमी राजवट उलथली जात नव्हती किंवा त्या राजवटीतही हवा तसा बदल घडून येत नव्हता. जमीनदारांचा जाच कायम होता आणि शेतकऱ्यांचे जीवघेणे दारिद्र्य संपत नव्हते. माओच्या हे लक्षात आले होते.

मग आपल्या क्रांतीच्या पद्धतीत तर काही दोष नाही ना, याचा माओ गंभीरपणे विचार करू लागला.

## नव्या मार्गाचा शोध

दहा वर्षांपूर्वी साबण तयार करणारा कारागीर होण्यापलीकडे माओ-त्से-तुंगची महत्त्वाकांक्षा जात नव्हती. आता मात्र आसपासचे दारिद्र्य, विषमता, जुलूम धुऊन काढण्यासाठी त्याचे मन बेचैन झाले होते. त्यासाठी कुठल्या मार्गाचा अवलंब करावा, याचा तो शोध घेत होता. आज तो पेकिंग, शांघाय येथे ओळखला जाणारा मान्यवर क्रांतिकारक होता. त्याची विद्यार्थी दशा चांगशातच गेली असल्याने त्याच्याविषयी माहिती असलेले, त्याच्या जंगलांतील भ्रमंतीच्या कथा माहीत असलेले विद्यार्थी आणि शेतकरी त्याच्याविषयी श्रद्धा बाळगून होते.

राजकारणात पडूनही त्याचे आयुष्य अगदीच रुक्ष झाले नव्हते. १९२० साली चांगशाला असतानाच त्याने यॅंग कुई हुईशी प्रेमविवाह केला. माओच्या मित्रांना हा विवाह म्हणजे एक आधुनिक रोमान्स वाटत होता. कुई हुई ही केवळ सुंदर आणि हुशार होती, असे नव्हे तर ती स्वतः एक क्रांतिकारकही होती आणि माओच्या क्रांतिकार्यात ती उत्साहाने क्रियाशील भाग घेत होती.

याच सुमारास क्रांतीचा खरा मार्ग कोणता याचा शोध माओ घेत असतानाच चीनमधील तरुण वर्ग आणि क्रांतिवादीही ठिकठिकाणी आपापल्या परीने या गोष्टी-वर विचार करू लागले होते. जुलमी राजवटीपासून देशाला मुक्त करणे, जमीन-दारांच्या जाचापासून शेतकऱ्यांना मुक्त करणे, यासाठी कोणता उपाय योजावा हे समजत नव्हते. सर्वांप्रमाणे माओच्याही डोक्यात एकच विचार घोळत होता, कोणत्या पद्धतीने लोकमत प्रभावीपणे संघटित करता येईल ? या चिनी महासाग-रात हलक्या फुलक्या खळबळी निर्माण करण्यापेक्षा एकच प्रचंड लाट निर्माण करून त्यामध्ये जुना दुष्ट चीन कसा धुऊन काढता येईल ? चीनच्या भल्यासाठी या क्रांतिकारकांना जनतेचे प्रभावी नेतृत्व कोणत्या पद्धतीने करता येईल ?

या क्रांतिकारी तरुणांना हळू हळू एक अंधुक मार्ग दिसू लागला होता. रशिया-मध्ये नुकतीच साम्यवादी क्रांती झाली होती, तीविषयी बरीच उत्सुकता चीन-मध्ये होती. पण त्याबाबत विशेष माहिती, वाङ्मय चीनमध्ये मिळत नव्हते. हळू-

हळू भाषांतरित स्वरूपात ते वाङ्मय चीनमध्ये येऊ लागले आणि माओप्रमाणेच कित्येक क्रांतिकारक त्यांपैकी मिळतील ती पुस्तक वाचून काढू लागले. आणि थोड्याच अवधीत मार्क्सवादाने भारावलेल्या, मार्क्सवादावर श्रद्धा बसलेल्या क्रांतिकारकांचा वर्ग चीनमध्ये निर्माण होऊ लागला.

या तरुणांना मार्क्सवादाच्या पूर्ण तत्त्वांची खोल जाणीव नव्हती, संघटना नव्हती आणि स्वतः मार्क्सवादी झाल्याचीही जाणीव नव्हती. पण मार्क्सवादातील सोप्या आणि एकदम पटणाऱ्या तत्त्वज्ञानाकडे ते मोठ्या वेगाने आकृष्ट होऊ लागले होते.

दरम्यान कळत नकळत का होईना, चीनमधील बुद्धिवाद्यांच्या वैयक्तिक स्वातंत्र्याच्या आणि राष्ट्रीयत्वाच्या कल्पनाही वेगाने समाजवादाकडे जात होत्या.

१९०५ साली डॉ. सन् यत सेनने आपली क्रांतिकारी 'युनिटी लीग' स्थापन केली (हिचेच पुढे कोमिन्टांगमध्ये रूपांतर झाले), तेव्हा त्या संघटनेच्या शपथेमध्ये "स्वातंत्र्य, समता व विश्वबंधुत्व" यांवर जोर होता. डॉ. सन् यत सेनने १९१५ पर्यंत आपल्या भाषणांमधून व लिखाणांमधून व्यक्तिस्वातंत्र्य व लोकशाहीचा जोरदार पुरस्कार केला होता, पण चिनी राज्यपद्धतीच्या व समाजपद्धतीच्या विशिष्ट परिस्थितीमुळे, आपल्या कार्यात वारंवार आलेल्या अपयशामुळे डॉ. सन्‌ची आणि त्याच्या सहकाऱ्यांची मते बदलू लागली होती.

आपल्या मृत्युपूर्वी एक वर्ष अगोदर डॉ. सन्‌ने एका भाषणात व्यक्तिगत स्वातंत्र्यावर पुढील विचार मांडले:

"आम्हा चिन्यांना व्यक्तिगत स्वातंत्र्य म्हणजे नेमके काय, हे माहीत नसेल; पण आमचा सारा रोख व्यक्तिगत लाभाकडे, व्यक्तिगत संपत्ती साठवण्याकडेच असतो...... आपणाला खूपच—वाजवीपेक्षा जास्त—व्यक्तिगत स्वातंत्र्य आहे हेच खरे. आपणांत एकी नाही, विरोधाची शक्ती नाही; वाळूप्रमाणे आपण शक्तिहीन होऊन अस्ताव्यस्त झालो आहोत. त्यामुळेच परकीय शक्तींनी आपल्यावर आक्रमण केले आणि व्यापारी व आर्थिक युद्धांनी आपल्याला जेरीस आणले. यापुढे जर आपणांला परकीय आक्रमणांना तोंड द्यायचे असेल तर या व्यक्तिगत स्वातंत्र्याचा नाशच केला पाहिजे. आपणांला एक पक्का संघटित समाज उभा करावयाचा आहे. वाळूत सिमेंट मिसळून आपला समाज आपणांला पाषाणासारखा करावयाचा आहे.

"व्यक्तीच्या स्वातंत्र्याचे स्तोम माजविता कामा नये, परंतु राष्ट्राचे स्वातंत्र्य मात्र अमर्याद असावे. आपणांला कृती स्वातंत्र्य मिळताच आपण एक शक्तिशाली राष्ट्र बनू यात मुळीच शंका नाही. पण ते साध्य करण्यासाठी सर्वांनी आपल्या व्यक्तिस्वातंत्र्याचा बळी दिला पाहिजे."

नकळतच चिनी विचारवंतांचे विचारप्रवाह अशा रीतीने समाजवादाकडे झुकू लागले होते व या विचारांचे खतपाणी मिळालेल्या व आधीच क्रांतीसाठी सुपीक असलेल्या चिनी भूमीवर कम्युनिस्ट विचारसरणीचे बी रुजत होते. [ अपूर्ण ] ●



पुस्तके

# विधानसभेची ओझरती ओळख

**[ विधानसभा–परिचय व कामकाज. लेखक : के. टी. गिरमे मूल्य ६ रु. प्रकाशक– रुची प्रकाशन ५६५–शनवार, पुणे २. ]**

महाराष्ट्र विधानसभेच्या अध्यक्षांनी लिहिलेला ‘ विधानसभा– परिचय व कामकाज ’ हा ग्रंथ अंतर्गत लेण्यांबरोबर बड्या श्रेष्ठींच्या कौतुकांचे लेणे घेऊन प्रसिद्ध होणे, हे अपेक्षितच होते. या संपूर्ण ग्रंथाचे एकंदर तीन भाग पडतात. पहिल्या भागात संरक्षणमंत्र्यांपासून विधानसभेच्या अध्यक्षांपर्यंत “ कौतुकांचे बोल ” पाहावयास मिळतात. त्यात ना. चव्हाण आणि ना. नाईक यांची प्रस्तावना व पुरस्कार अगदीच मंत्र्यांच्या थाटाचा असल्यामुळे त्यांचा फारसा विचार करावा, असे त्यात काहीही नाही. कदाचित् या द्वयांच्या लिखाणामुळे पुस्तकाच्या प्रतींची मागणी जिल्हा परिषदा आणि पंचायत समिती यांच्याकडून मोठ्या प्रमाणावर होण्याची शक्यता आहे.

सभापती ना. भारदे यांनी मात्र केलेले “ जनार्दनांचे भजन ” बरेचसे मूलग्राही आणि मार्मिक स्वरूपाचे आहे. अनेक ठिकाणी त्यांनी परखड इशारे दिलेले आहेत. विशेषत:, ‘ बहुमत म्हणून बेपर्वाई नको ’ म्हणून केलेले विवेचन राज्यकर्त्यांनी अधिक मनन करण्यासारखे आहे. लोकशाहीचा अवलंब केवळ “ रीती म्हणून नव्हे तर नीती म्हणून करणे ” आवश्यक असल्याचे प्रतिपादन अधिक सखोल आहे. मला वाटते या प्रस्तावनेत ‘ केळकरी थाटाने ’ त्यांनी आपल्या खास शैलीने लोकशाही वृत्ती आणि तिचे विशेष फारच मार्मिकपणे सांगितले आहेत.

प्रकरण एकपासून ते प्रकरण सहापर्यंत ३६ पृष्ठांच्या प्रपंचात विधानसभेच्या इतिहासाचे उपसभापतींनी केलेले विवेचन हे बरेचसे नीरस अणि जुजबी स्वरूपाचे झालेले आहे. एखाद्या राज्यशास्त्राच्या विद्यार्थ्याने या विषयावरील टिपणे काढावयाचा संकल्प केल्यास यापेक्षा अधिक सुसूत्र टिपणे तयार होणे अवघड आहे. या विभागात ‘ के. टीं. ’ नी अनेक ग्रंथातील माहितीची जंत्री दिली आहे. भारतीय

लोकशाहीच्या पार्श्वभूमीचे विवेचन "प्राचीन पौर्वात्य शासनपद्धती" या प्रकरणात केलेले आहे. त्यात भारताशिवाय इतर कुठल्याही पौर्वात्य देशांतील लोकशाहीचा परामर्ष घेतलेला नाही. त्यातही 'वैशाली'सारख्या जुन्या 'गण–राज्यां'चा कल्पनेचे अधिक विवेचन करणे आवश्यक होते; परंतु 'के. टीं.' च्या विचारांची भूमी पाश्चात्य विचारांकडे–विशेषतः, इंग्लंडच्या, इतिहासाकडे–अधिक ओढ घेणारी आहे.

## सरस, परंतु उथळ

ग्रंथाच्या तिसऱ्या विभागात मात्र ग्रंथकार आपली मनोगते काही ठिकाणी स्पष्टपणे बोलून दाखवितो [ या संदर्भांत जिज्ञासूंनी पंजाबचे माजी सभापती यांच्याविरुद्ध अधिकारारूढ पक्षाने आणलेल्या अविश्वासाच्या ठरावांचे विवरण अवश्य पाहावे. (पृष्ठ ८६) ] अनेक ठिकाणी मात्र ग्रंथकार ज्या ठिकाणी स्वतःची मते देण्याचे टाळतो तिथे महाराष्ट्र टाईम्स, लोकसत्ता इत्यादी दैनिकांतील उताऱ्यांचा आधार घेतो. या संदर्भांत आमदार घोटे प्रकरणाचे विवेचन पाहण्यासारखे आहे जिथे ही कसरत जमत नाही तिथे तो सोईस्करपणे लेखणी आवरती घेऊन स्वतःचे काहीच मतप्रदर्शन करीत नाही.

'न बोलणारा पण स्पीकर', 'प्रश्नोत्तरांचा तास' ही प्रकरणे मात्र ग्रंथकाराने अतिशय प्रासादिकपणे लिहिलेली आहेत. परंतु या ठिकाणी जी उदाहरणे ग्रंथकाराने निवडलेली आहेत, ती बरीचशी विनोदी स्वरूपांची अथवा चमत्कृतिजन्य अशी आहेत. त्यामुळे विषयातील ग्रंथकारांची दृष्टी ही गंभीर न वाटता उथळही वाटते. 'प्रश्नोत्तरांच्या तासा'च्या शेवटी दिलेली अनेक उदाहरणेही याचीच निदर्शक आहेत. त्यात 'My Fair Lady' सारखे एखादे उदाहरण देऊन हे कार्य साधले असते, तिथे विधानसभा वृत्तांतील आजवर घडलेली अनेक उदाहरणे मालगाडी–सारखी देऊन वृत्तपत्रांत असलेल्या 'चौकटी'ची जंत्री मात्र तयार होते.

ग्रंथाच्या काही भागांत दिलेल्या इंग्रजी अवतरणांचे मराठी भाषांतर का देण्यात आले नाही तेही कळत नाही. ग्रंथ मराठी भाषिकांच्या नव्या आकांक्षा (या विषयातील) पूर्ण करण्याचा दावा करीत असताना या बाबतीत पृष्ठ ८३ वर ग्रंथकर्त्याने दिलेले इंग्रजी अवतरण पाहण्यासारखे आहे. त्यात इंग्रजी भाषेतील खाचाखोचा आहेत असेही नाही.

विधानसभेतील कामकाजाची पद्धत हा भाग ग्रंथकर्त्यांनी अतिशय रसाळपणे सांगितला आहे. ग्रंथाच्या शेवटी देण्यात आलेली परिशिष्टे उपयुक्त असली तरी अतिशय तोकडी वाटतात. महत्त्वाच्या सभासदांत त्यांनी सर्वच मंत्र्यां–उपमंत्र्यांची वर्णी लावलेली असल्यामुळे सारे कसे 'छान छान' वाटते, तर संसदीय असलेले, शब्द म्हणून दोन शब्दांची जंत्री पाहून क्वचित वाचकांस विशादही वाटल्याशिवाय राहत नाही.

**लोकशाहीचे खरे दुखणे**

भारतीय लोकशाहीच्या स्वातंत्र्योत्तर काळात जो आक्षेप घेण्यात येत आहे तो अतिशय मूलभूत स्वरूपाचा आहे. हा आरोप असा आहे की, राज्यकर्त्यांनी लोकशाहीचा सांगाडा शिल्लक ठेवला असून त्यांनी लोकशाहीच्या आत्म्याचा खून पाडला आहे. या संदर्भात ग्रंथकर्त्याला केरळमधील कम्युनिस्ट राजवटीचा अस्त, प्रिव्हेन्टिव्ह डिटेंशन ॲक्ट, अवमूल्यन यांसारख्या विषयांच्या आधारे आपली भूमिका स्पष्ट मांडता आली असती; परंतु ग्रंथकाराचे विचार या दृष्टीने कधी या प्रश्नांचा वेधच घेत नाही. किंबहुना असा वेध घेण्याचे सोयिस्कररीत्या टाळले गेले आहे असे म्हणणे क्रमप्राप्त आहे.

स्पीकर हा निःपक्ष प्रवृत्तीचा असावा याचे विवेचनही ग्रंथकार खूप करतात. परंतु गोवा विधानसभेतील सभापतींवरील आक्षेपांसारखे प्रत्यक्ष दाखले न देता ग्रंथकार हा तत्त्व–चर्वणांचीच पद्धती अंगीकारतो.

या ग्रंथाचा एक विशेष आणि मला आवडलेली गोष्ट म्हणजे श्री. खाजगीवाले यांनी काढलेले ग्रंथाचे मुखपृष्ठ. ते जितके आकर्षक आहे तितकेच सूचकही आहे. या मुखपृष्ठासाठी वापरलेली रंगसंगतीही या दृष्टीने मोहक आणि विषयानुरूप आहे.

एकंदरीत 'के. टीं.' नी अनेक ठिकाणी हे पहिलटकरणीचे अपत्य नेटकेपणाने नटवले आहे. परंतु वाचकांच्या अपेक्षा फारशा पुऱ्या करू शकत नाही, हेच खरे ! सामान्यांना न परवडणारे आहे.

रतनलाल भंडारी


परसूच्या पशुकथा — वसंत सबनीस

सहा साहसे — दा. सी. देसाई

मूल्य प्रत्येकी दोन रुपये

राजहंस प्रकाशन, ४१९ नारायण, पुणे २.

# जे नव्हते ध्यानी मनी

## We never meant to go so far

या माविस रॉन्सनकृत पुस्तकाचा परिचय

लेखांक दहावा

[ बुकित – ठिंगी गावच्या मध्यभागी पडलेला प्रतांचा ढीग कॅमेऱ्यातून बार्बाराने पाहिला व डोळ मिटून क्लिप दाबली ]

प्रत्यक्ष लढाई पाहण्याची माविस व बार्बारा यांना लाभलेली संधी अचानक संपली बुकित्–ठिंगी येथील विमानतळावर इंडोनेशियन सैन्याचे सरसेनापती जनरल नासुशन् हे तेथे उतरलेल्या सरकारी सैन्याची पाहणी करण्यासाठी विमानातून उतरले, तेव्हा त्यांच्या फोटोसाठी ही दुक्कल विमानतळावर हजर होती.

जनरल नासुशन् हा देखणा, बालसुलभ चेहऱ्याचा, पांढऱ्या शुभ्र दातांचा तरुण पुरुष दोघींना फार आवडला. पण या सेनानीच्यामागे नेहमीप्रमाणे एक हुप्प्या अधिकारी थुलथुलीत देह ढकलीत चालत होता. लेफ्ट. कर्नल प्रिगार्डी हाच तो दुय्यम अधिकारी. ऐन लढाईच्या दिवसांत पूर्वी मेनाडोत फिरलेल्या या दोन पोरी विमानतळावर पाहताच त्याचे मस्तक फिरले.

चक्रे भराभरा फिरली. सामानसुमानासह दोघींना एका विमानात कोंबण्यात आले. विमानाने उड्डाण करून एकदम जकार्ता गाठले.

दोघींना जकार्तालाच जायचे होते. भिकाऱ्यापुढे कावळ्याने भाकरी टाकावी, तशा दोघी अनायासेच अलगद जकार्ताला आल्या–आणि पस्तावल्या !

अगदी भिकार शहर ! जिथे काही हजार माणसे राहावीत या हिशेबाने डचांनी शहर वसवले, तिथे तीस लाख माणसांनी दाटी करून शहराची मुंबई उपनगरांसारखी अवस्था करून टाकली होती.

रस्त्याच्या मधून घाण पाण्याचे कालवे वाहत होते, या घाणेरड्या गावात. शिवाय अधिकाऱ्यांनी या दोघींचा परिचय ' संशयित महिला ' असा करून दिलेला. आठवडाभर दोघींनी ना मित्र, ना छत्र अशा अवस्थेत काढला. पण दोघींचे नशिब मोहोरदार हेच खरे.

एके दिवशी सकाळी आता जकार्ताला परतलेल्या लेफ्ट. कर्नल प्रिगार्डींचे बोलावणे आले. दोघींना पाहताच प्रिगार्डी लाजेने चूर झाल्यासारखा म्हणाला,

" माफ करा. तुमच्याविषयी मी चौकशी केली. तुम्ही काहीही वावग केलेले नाही. बोला, मी काय मदत करू शकतो ?"

मार्विसने लगेच सांगितले की, " आम्हांला जनरल नासुशन् यांना भेटावयाचे आहे. व्यवस्था करता का ?"

## साधा शिपाईगडी नासुशन्

जनरल नासुशन्चा भाव इंडोनेशियात विलासी सत्ताधीश सुकार्नोच्या खालोखाल होता. दोघींनी त्याच्या घरी त्याची भेट घेतली. नवा कोरा लष्करी पोषाख घालून स्वारी वाट पाहत होती. समोर नकाशे पसरलेले होते. लाडके मांजर पायांत घुटमळत होते. छोटी मुलगी तेथेच खेळत होती.

नासुशन् धार्मिक वृत्तीचा व विडी-काडीचेही व्यसन नसलेला सेनानी होता. शिकारीचा नाद होता. चार-दोन मारलेले वाघ भिंतीवर लटकलेले होते. फक्त वीस मिनिटांत या माणसाची प्रदीर्घ, सचित्र मुलाखत तयार करण्याएवढी माहिती दोघींनी मिळवली.

जनरल नासुशन्शी गाठभेट झाल्याबरोबर आता दोघींना इंडोनेशियात सर्व दारे मोकळी झाली. दोघींनी मग सुकार्नोच्या राजवाड्यापर्यंत धडक मारली. अध्यक्ष सुकार्नोसाठी जे खासगीरीत्या बाहुल्यांचे खेळ होत असतात, त्याला दोघी हजर राहिल्या. या बाहुल्यांचे खेळात, इंडोनेशियावर भारतीय संस्कृतीचा परिणाम होता, त्याची आठवण देणारी रामायणातील चरित्रे सांगितली जात होती. कृष्ण, राम हे त्यातले वीरपुरुष होते. भगवान कृष्णाचा खेळ करणाऱ्यांनी इंडोनेशियाच्या आधुनिक कृष्णाचा शेवटी सत्कार केला. रात्री ८ वाजता सुरू झालेला कार्यक्रम पहाटे ५॥ वाजता संपला. माविसला मात्र रात्री १२ च्या सुमारास झोप लागली. खुर्चीतच तिने झोप संपवली.

इंडोनेशियाची भाषा 'बहास' भाषा. या भाषेत अनेकवचने नाहीत व काळालाही सुट्टी ! बार्बारा ही भाषा चटकन् शिकली. बोलू पण लागली. म्हणून तिला हे रामायण रात्रभर पाहता आले व समजले.

सुकार्नो उत्तम इंग्रजी बोलतो. डच भाषेऐवजी आता इंडोनेशियात इंग्रजीच शिकवतात. माविसने सुकार्नोला विचारले,

" आम्हांला तुमच्या मुलांचा फोटो घ्यायचा आहे. घेता येईल का ?"

सुकार्नोने नुसताच नकार दिला नाही तर वाकड्यात शिरून सांगितले, " माझी मुलं तुमच्या राजपुत्र चार्लस् किंवा राजकन्या ॲनीप्रमाणे फोटो काढण्यासारखी नाहीत. "

एके दिवशी सकाळी सुकार्नोची आई वारली. जकार्ताहून दूर अशा एका खेड्यात ती राहत होती. तिथेच तिचे दफन होते. दोघींनी टॅक्सी पकडली व दफनाला हजर

झाल्या. दफनभूमीपासून ४ मैल अलीकडे प्रेतयात्रा सुरू झाली. सर्वजण चालत असल्यामुळे दोघींना चार मैल चालावे लागले.

दफन झाल्यावर हिंदू पद्धतीप्रमाणे सर्वजण पुनः सुकार्नोबरोबर त्याच्या राजवाड्यात आले. त्याला पुनः भेटून परत गेले. यांत बहुतेक सर्व लष्करी व मुलकी अधिकारी होते.

सुकार्नो राजवाड्याच्या दालनात बसला होता. त्याच्याशेजारी त्याची बायको नंबर दोन हर्तिनी बसली होती. हर्तिनीच्या सांत्वनासाठी शेजारी महामंत्री जुनादची बायको बसली होती. महामंत्री जुनादने माविसला सांगितले,

" हर्तिनीबाईसाहेबांबरोबर माझ्या बायकोचाही फोटो काढा ! "

हर्तिनी ही सुकार्नोची दुसरी पत्नी सहसा जकार्ताला येत नसे. जकार्ताबाहेर टेकडीवर तिचा स्वतंत्र राजवाडा होता. सुकार्नो तिला भेटायला हेलिकॉप्टरने जात असे. इंडोनेशियन स्त्रिया एकपत्नी कायद्यासाठी चळवळ करणाऱ्या असल्याने त्याचा हर्तिनीवर रोष होता. सुकार्नोची पहिली पत्नी फातमावती ही जकार्तात एकटीच राहत असे. तिला घटस्फोट न देताच सुकार्नोने हर्तिनीशी लग्न केले होते.

तिथे जमलेल्या मंडळींत बरेच परदेशीय वकील होते. अमेरिकन वकिलाकडे पाहून सुकार्नो म्हणाला,

" माझी ही टोपी घाला म्हणजे तुमचे टक्कल दिसणार नाही. "

एकच हशा पिकला. सुकार्नोची आई वारली असल्याने सगळे जमले आहेत, ही गोष्ट कुणाच्या लक्षातही राहिली नाही.

## चार बायकांचा चोख हिशेब

सुकार्नोच्या आईचे दफन झाले ते गाव सोलो. सोलोला आता अधिकारभ्रष्ट झालेला पाकुबुवानो नावाचा सुलतान राहत होता. त्याच्या संसारात सहा बायका, बावीस मुले, पंधरा स्वयंपाकी, तीस वाद्यवादक व नर्तक, एकशे अठ्ठावन्न शरीररक्षक व सटर फटर मिळून ७९१ माणसे होती. या सुलतानाची गाठ याच गडबडीत माविस-बार्बारांनी घेतली. मुलाखतीत माविसने विचारले,

" सुलतानसाहेब, आपल्या मुसलमान धर्माप्रमाणे चार बायकाच करणे धर्म्य असताना आपल्या सहा बायका कशा ? "

सुलतान गालातल्या गालात – काय मूर्ख आहेस – असे म्हणाल्यासारखा–हसला. म्हणाला–

" मला एकावेळी चारच बायका असतात. दरवेळी दोन बायका बाळंतीण असतात. त्यांना मी तात्पुरती सोडचिठ्ठी देतो व ज्या दोघी बाळंतपणातून उठलेल्या असतात त्यांच्याशी पुनः लग्न करतो. हे चक्र सतत चालू असते. "

धन्य ते इंडोनेशियन सुलतान ! ! अशा एका महापुरुषाची भेट झाल्याबद्दल आभार मानून दोघी त्या ७९१ गुलामांतून निसटल्या.

जकार्ताहून सेलेवस बेटावर जाण्यासाठी दोघींनी तिकिटे काढली. नवीनच खरेदी केलेली ही रशियन बोट होती. बोटीवरचे दोनच अधिकारी रशियन होते. परंतु बोटीवर सर्वांना मिळणारे अन्न मात्र रशियन पद्धतीचे होते. उकडलेले बटाटे, टोमॅटो व भरपूर व्होडका.

वाटेत मकासार बंदर लागले. दोघी इतरांबरोबर खाली उतरल्या. आश्चर्य म्हणजे नेमकी सुकार्नोची स्वारी तेथे आलेली. त्याने माविस-बार्बारांना ओळखले. माविसबरोबर सुकार्नोने स्वतःचा फोटो काढवून घेतला. सुकार्नोचे हे प्रेम पाहताच तिथे जमलेल्या लोकांनी दोघींना गराडाच घातला. वृत्तपत्रकारांना वाटले, सुकार्नोचे हे नवे 'प्रकरण' दिसते. मकासारच्या स्थानिक लष्करी प्रमुखाला वाटले, दोन्ही मुली त्यातल्याच असाव्यात. माविसचा सुकार्नोबरोबर फोटो निघाल्याने त्याने बार्बाराला चार दिवस आपल्याबरोबर मौज करण्याकरता चलण्याचा आग्रह सुरू केला.

बार्बाराने त्याला बोचणार नाही, अशा शब्दांत नकार दिला. परंतु, "निदान चार दिवस तरी राहा, आमचा प्रदेश पाहा," या विनंतीला दोघींनी संमती दिली.

**अजब धर्मगुरू**

स्थानिक सुलतानाची दोघींनी गाठ घेतली. हा सुलतान मुसलमानधर्मीय नव्हता. याच्या राज्यात बिस्सू जमात पूर्वी बहुसंख्येने होती. मुसलमानांच्या आक्रमणापूर्वी हे बिस्सू, सेलेवस धर्मीयांचे धर्मगुरू होते. मुसलमानांनी त्यांची लांडगेतोड केली व आता फक्त तेराच जण शिल्लक आहेत, अशी माहिती सांगण्यात आली. हे बिस्सू उभयलिंगी होते व तूर्त नांगरणीपूर्वीचे पाच दिवस हे बिस्सू देवाला आळवण्यासाठी नाचतात. हे कळताच दोघी अशाच एका नाचाला हजर राहिल्या.

रंगवलेली शरीरे व चेहरे, ओठांना ओष्ठरंग लिपलेला, काहींनी सोन्याच्या काड्यांचे चक्र घातलेले. हे प्राणी मोठे भयानक दिसत होते. हिजड्यांची ही टोळी मग मंत्र म्हणून झाल्यावर नाचू लागली. केस मोकळे सोडून अंगात आल्यासारखे ते करू लागले.

तलवार, भांडी, दागिने, ढोलकी, छत्र्या, यांच्याशी या लोकांची लग्ने लावली जातात. कारण या वस्तूंना अमूक असे लिंग नाही. उभयलिंग वधूवरांची ही अजब लग्ने पाहण्याची माविस-बार्बारांची इच्छा होती. परंतु तेवढा वेळ नव्हता.

बिस्सूंच्या प्रदेशापासून जरा उत्तरेकडे गेल्यावर तिथे एका लष्करी अधिकाऱ्याशी दोघींची गाठ पडली. इंडोनेशियात लष्करी अधिकारी खासगी व्यापारही त्या वेळी करीत असत; कारण त्या वेळी तसे अराजकच पसरलेले होते. हा अधिकारी मोटारी, घड्याळे, फ्रिज, रेडिओग्रॅम, इत्यादी वस्तू सिंगापुराहून मागवून त्या विकीत असे. आपल्या तिन्ही बायकांची घरे त्याने या वस्तूंनी भरून टाकली होती. फक्त गावात इलेक्ट्रिसिटी येण्याचाच काय तो अवकाश होता.



बिस्सू... हे प्राणी मोठे भयानक दिसत होते...

मर्सिडीज गाड्या बायकांना त्याने नजर केल्या होत्या. इतर मित्रांना तो 'ओपेल गाड्या वाटीत असे.

हा दौरा आटोपून दोघी मकासार येथे परत आल्या. आल्या आल्या पोलिसांनी त्यांना घेरले. त्या कुणाकुणाला भेटल्या याची ते चौकशी करू लागले. दोघींनी त्या लष्करी अधिकाऱ्याची माहिती सांगण्यास नकार दिला.

त्याचा वचपा पोलिसांनी दोन दिवसांनी काढला. दोन दिवसांनी दोघी मकासार-नजीकच्या आंबोन बेटावर गेल्या असताना तिथल्या गव्हर्नराने त्यांना अटक करून कोठडीत टाकले. जेवण्यासाठी मात्र त्यांना बंदोबस्तात उत्तम युरोपियन पद्धतीच्या हॉटलात नेण्यात येत असे.

दोघींनी दंगा सुरू केला. "आम्हांला का पकडले ? हुकूम दाखवा नाहीतर सोडा."

तिथला पाद्री त्यांना भेटायला आला. त्याने सांगितले, डच न्यू गिनीवर पुनः डचांचा हल्ला होणार आहे, असे म्हणतात. म्हणून ही खबरदारी आहे. म्हणजे या वेळी डचांसाठी हेरगिरी करणाऱ्या म्हणून अटक झाली होती.

आठ दिवसांच्या तुरुंगवासानंतर दोघींना एका चिनी मालवाहू बोटीवर चढवण्यात आले. बोट सुटेपर्यंत रक्षक गँग–वेवर उभे होते. दोघींना वाटले पुनः जकार्ताला नेणार. परंतु बोट सुटल्यावर बोटीवरच्या अधिकाऱ्यांनी सांगितले, "बोट बोर्नियोला निघाली आहे."   [ अपूर्ण ]

— रा. म. शास्त्री

## प्रेक्षणीय आणि श्रवणीय

### ‘ जय जय गौरीशंकर ’

‘ ललितकलादर्श ’सारखी ख्यातनाम संस्था विद्याधर गोखले यांच्यासारख्या लोकप्रिय नाटककाराचे नवे नाटक सादर करणार आणि त्यात राम मराठे, भालचंद्र पेंढारकर, प्रसाद सावरकर, यांच्यासारखे पट्टीचे गायक कलाकार कामे करणार असे कळताच नाटचरसिक उत्साहित झाले असल्यास नवल नव्हते. खरोखर गेल्या सहा-सात महिन्यांत मुंबईच्या रंगभूमीवर सादर झालेल्या नव्या संगीत अगर गद्य नाटकांत ‘जय जय गौरीशंकर ’च्या वाटचाला आलेले औत्सुक्य विलक्षण होते. एका दिवशी एकाच थिएटरमध्ये तीन प्रयोग सादर करूनही अनेकांना तिकिटा-अभावी परत फिरावे लागले, हा विजय संस्थेच्या कीर्तीचा आहे, कलाकारांच्या दर्जाचा आहे.

‘ शिवलीलामृता ’तील १४ व्या अध्यायातील एका कथेवरून नाटकाची रचना करण्यात आली आहे. गोव्यातील श्री मंगेश आणि शांतादुर्गा या प्रसिद्ध देवालयांच्या निर्मितीशी या कथेचा संबंध जोडलेला आहे. भगवान् शंकर आणि पार्वती या दोघांचे या स्थळी काही काळ वास्तव्य झाले असल्याने या स्थळांना जागृत देवस्थानांचे महत्त्व आले. कैलासावरचे आपले स्थान सोडून शंकर या ठिकाणी आले, याचे कारणही तसेच होते. एकदा शंकर-पार्वती सारीपाट खेळत असताना शंकर खेळात हरू लागले. विविध गोष्टी जिंकण्याच्या भरात पुढे शंकराजवळ पार्वतीने प्रत्यक्ष गंगेची मागणी केली; परंतु जगताच्या कल्याणार्थ शिरोधार्य मानलेल्या गंगेचा त्याग करायचे शंकरांनी टाळले म्हणून दोघांत भांडण निर्माण झाले आणि संतापाने शंकर गोमांतकातील वनात निघून गेले. शंकरांनी आपली क्षमा मागावी आणि पुन्हा कैलासावर यावे, या हेतूने नारदाच्या मदतीने पार्वती एक नाटक करते. भिल्लिणीचा वेष घेऊन ती शंकरांना मोहविण्याचा प्रयत्न करू लागते. शंकर तिला ओळखतात पण ओळख पटली नाही, असे दाखवून तिला आणि नारदाला काही काळ विजयाचा आनंद देतात. आणि योग्य वेळी त्यांचा भ्रमनिरास करतात. शंकरांना पार्वतीच्या मनातील असूया-अहंकार नष्ट करायचा असतो. ती गोष्ट साध्य होतेच, पण कलागत लावण्यात आपण प्रवीण आहोत, हा नारदाचा अभिमान खोटा ठरतो.

**कथेची ओढाताण**

नाटकाचे कथानक म्हणाल तर आहे अवघे चिमुटभर, त्यात मूठभर मसाला

टाकून ते तीन अंकांत बसवावे लागले; अर्थात कथेशी झटापट करावी लागली. ओढाताण करावी लागली आहे. पहिला अंक व्यवस्थित होत असला तरी दुसऱ्या दोन अंकांत हे प्रकर्षाने जाणवले. नाटकाचे कथानक छोटे आहे. ते तीन अंकांत व्यवस्थित बसविले पाहिजे, हे लेखकाला पक्के माहीत असावे; फार काय त्याच गोष्टीचे थोडेफार दडपणच त्याच्या मनावर पडले. लेखक त्यामुळे नाटक इतके ताणीत गेला की ही ओढाताण प्रेक्षकांना कंटाळवाणी वाटू लागते. या दडपणामुळे शाब्दिक कसरती करूनही लेखन वाढविण्याचा प्रयत्न तो करू लागतो. असे कोटीक्रम तर नाटकात ठायीठायी आढळतील. प्रथम प्रथम ह्या गोष्टी बऱ्या वाटतात, पण पुढे त्याही कंटाळवाण्या ठरतात. 'नंदीची बंदी,' 'धन्य धन्य विजया माझी भावी जाया' किंवा 'कान्त एकान्त' अशा कोटचांमुळे काहीशी नाराजी येते. शब्दच्छल करण्याचा थोडा अतिरेक सोडला तर बाकी संवाद-रचना उत्तम आहे. नेहमीच्या सरावाप्रमाणे उर्दू संवाद, शायरी घालण्याचा मोह या नाटकात टाळला आहे, हे योग्यच आहे.

व्यक्तिचित्रणाचा विचार करता खूपच समाधान मिळते. नंदीची व्यक्तिरेखा सोडली तर अन्य व्यक्तिचित्रे ठसठशीत आहेत. नंदी हा अनुशासनाचा पाईक आणि शिवगणांचा नाईक आहे, असे याचे वर्णन केले आहे. त्याच्या बंदी-हुकमावरून काही विनोद साधण्याचाही प्रयत्न आहे; पण ह्या सर्वांचा कथानकाशी काय संबंध? साहजिकच नंदीचे पात्र अप्रयोजक आहे. नंदीचा आणि त्याच्या बंदी-हुकमांचा अधिक चांगला उपयोग करून घ्यायला हवा होता. इतर व्यक्तिचित्रणांत तसे ठळक दोष नाहीत. लेखनात काही उणीवा आहेत हे जरी खरे असले, तरी शेवटपर्यंत उत्सुकता टिकविण्याचे कसब लेखकाने साधले आहे हे निश्चित !

## गायक नटांची कामगिरी

प्रयोगाच्या दर्जाचा विचार करण्याआधी विचार करायचा तो संगीताचा ! कारण नाटकात तीन प्रमुख गायक कलाकार आहेत तेव्हा संगीतवेडा प्रेक्षक नाटकाकडे आकृष्ट होणार ! तिघाही कलावंतांना गाण्याची भरपूर संधी आहे. नाटकात एकूण पंधरा-सोळा गाणी आहेत. त्या प्रत्येकात वैविध्य राहावे, नावीन्य राहावे या दृष्टीने संगीत दिग्दर्शक वसंत देसाई यांनी खूप मेहनत घेतली आहे हे निश्चित ! अनवट रागापासून ते थेट लोकसंगीतापर्यंतच्या प्रकारांचा यात अवलंब केलेला आहे. परंतु त्यांतील किती चाली लोकप्रिय ठरतील हा प्रश्न आहे. नारदाचे "जय जय रमारमण श्रीरंग" हे पद, "शिवशक्तीचा अटीतटीचा खेळ चालला भुवनपटी" हे पद किंवा "प्रियकरा छंद नसे हा भला," हे विजयाचे पद ही एवढी नावीन्यपूर्ण वाटतात.

तिघाही गायक कलाकारांनी गाण्याच्या बाबतीत मुळीच हयगय केलेली नाही. राम मराठे (शंकर) तर विलक्षण तडफेने गातात. त्यांच्या तयारीचे कौतुक करावे तेवढे थोडेच ! भालचंद्र पेंढारकर नारदाची २।३ पदेच पण व्यवस्थित, नेहमीच्या

ढंगांत आणि कौशल्याने सादर करतात. प्रसाद सावकार मात्र अभिनय उत्तम करीत असून संगीताच्या बाबतीत फारसे समाधान देऊ शकत नाहीत. नाटकाची नांदी मात्र उत्तम आहे.

अभिनयाच्या दृष्टीने विचार करता पेंढारकरांचे नारदाचे काम सहजसुन्दर झाले. प्रसाद सावकारही शृंगीच्या लहानशा भूमिकेत चमकून दिसतात. सुकुमार यांचे नंदीचे काम वास्तविक अप्रयोजक, पण ते त्यांनी लक्षात राहावे असेच वठविले. अन्य पात्रांत जयश्री शेजवाडकर (विजया), आ. दे. पाटील हे कलाकार ठीक आहेत. राम मराठे यांनी अभिनयदृष्ट्या खूपच समाधान दिले हा विशेष ! निराशा झाली ती लीलावती (पार्वती) या नव्या अभिनेत्रीकडून !! तिच्याजवळ नृत्य, अभिनय, संगीत किंवा संवाद यांपैकी कोणतेही वैशिष्ट्य आढळले नाही. तिचे संवाद मिळमिळीत वाटतात. नृत्यात 'जोश' आढळत नाही किंवा अभिनयानेही प्रेक्षक भारावत नाही. पार्वतीची प्रमुख व्यक्तिरेखा कमी पडल्याने नाटकावर काही प्रमाणात परिणाम होतो.

'ललितकले'चा प्रयोग हा रेखीव, सुव्यवस्थित असणारच हा आजवरील लौकिक या वेळीही प्रत्ययास आला. प्रयोग सादर करण्यासाठी घेतलेले कष्ट वारंवार जाणवत होते; अर्थात काही शंका येतातच. एका नृत्याचे वेळी पार्वती आधुनिक पद्धतीची पाच वारी साडी नेसून आली होती. हा वेष प्रकार पुराणकाळी कुठून आला! सारीपाट आणायला गेलेली पार्वती येताना हिंदी चित्रपटातल्या नायिकेप्रमाणे वेष बदलून आली, ह्याचाही अचंबा वाटला. तिसऱ्या अंकात शंकराच्या रागदारीने मेघगर्जना होते, विजा चमकतात, असे दृश्य आहे. तेव्हा विजा फक्त गुहेतच चमकल्या. बाहेर अंधारच होता हे कसे ? या अशा लहानसहान चुकाच, पण त्या 'ललितकले'च्या नाटकातून असू नयेत, असे वाटते.

पु. श्री. काळे यांना नेपथ्यातून आपल्या कल्पकतेची, कलात्मकतेची साक्ष पुन्हा एकदा पटविण्यास संधी मिळाली होती. पण त्यांनी तिचा उपयोग करून घेतलेला नाही. पडद्यावरून कैलासाचे दर्शन घडविण्याचा प्रयत्न फसला आहे. बर्फाच्छादित टेकड्या लांबवर अंतरावर दिसतात. हे मनात खटकते. वास्तविक नाटक बर्फाच्छादित टेकड्यांवरच घडायला पाहिजे, ते होत नाही. गोव्यातील निसर्गसौंदर्यही अधिक चांगल्या तऱ्हेने व्यक्त करायला हवे होते. गुहेचा देखावाही कृत्रिम वाटला. एकूण काळ्यांच्या नेपथ्याने पार निराशा केली. आजवरील नाटकांतून काळ्यांच्या नेपथ्याला टाळी पडत असे. या वेळी ते घडत नाही. प्रकाश-योजना ठीक होती. पहिल्या अंकातील शंकराच्या ध्यान-धारणेचा प्रसंग कल्पक प्रकाश-योजनेमुळेच स्मरणीय ठरतो.

—सौ. जयश्री दामले

# मराठी प्रेक्षक...

विजयाचे वारस आम्ही. लेखन आणि प्रयोग यांचं हे परीक्षण, समीक्षण किंवा तसलंच काहीतरी.

एक आई, चार मुलं विरुद्ध तीन आक्रमणं.–गोवा, चीन, पाकिस्तान. दिग्विजयी वडिलांचा वारसा घेऊन आलेली तीन मुलं तीन आक्रमणांत मरण पावतात...विजयी होतात. चौथा तीच वाट अखेर पसंत करतो...यावर नाटकाचा शेवटचा पडदा.

तीन अंकांत आलेली ही तीन आक्रमणं...खरीतर प्रेक्षकांवर आहेत. दरएक नव्या आक्रमणाचे नवे धोके, नवे पवित्रे यांची ही करुणगंभीर...आणि म्हटली तर कल्पिता-पेक्षाही रोमांचकारी कथा–कशा रीतीनं चित्रित झाली आहे, माहीत आहे ? फक्त मुलं मारण्यासाठी. मरामरा, त्यांचे मृत्यू आणि एका लहान जिवाचा मृत्यू दाखविण्यासाठी. अद्‌भुत, रोमांचकारी, भयानक, हिडिस पातळयावर ही आक्रमणं उभी राहती तर ते मृत्यू विजयी ठरते. तरच ! आणि तरच आईच्या खचण्याला अर्थ येता–आणि त्या खचण्याला काव्यस्वरूप येतं.

–पण मग त्यात सुभाषितांची, शब्दांच्या कोलांट्या उड्यांची, नोकर-नौकरानीच्या पांचट विनोदांची, पोस्टमन, तार, निरंजन, अपुरं जेवण, अचानक पडलेला बाँब, आईच्या पायांशी हारफुलं, श्रीखंडाचे घास, रिकामा पाळणा, असल्या बाजारी, निर्लज्ज, तथाकथित वास्तव आणि उदात्त मसाल्याची घाणेरडी भेंडोळी आली नसती ! – मग मराठी रंगभूमीचा, बाळ कोल्हटकर, बाबूराव गोखले, स्वत: कालेलकर यांनी चालवलेला हा 'विजयी वारसा' बंद पडता तर ? — तर प्रेक्षकालाही चुकल्यासारखे वाटले असते ना ? त्याचे काय ?

– मराठी प्रेक्षकांची आता लाज वाटायला हवी. नाटक म्हणजे करमणूक, डोकेदुखीवरचं एक धुंद औषध–असली गलथान समजूत करून घेतलेला हा प्रेक्षक मेल्यासारखा रडतो...तितकाच भयंकर हसतो. त्याला नाही दिसत लेखकाच्या माकडचेष्टा, त्याला लागलेली नाही सवय अभिनय पाहायची, नेपथ्य डोळे उघडे ठेवून पाहायची......त्याला फक्त रडायला लावणारा आणि हसायला लावणारा वैदू पुरे आहे ! – हाही मराठी प्रेक्षकाचा 'विजयी वारसा'च म्हणायचा.

'अशा' या नाटकाचा प्रयोग ! बिचारे नटनटी तरी काय करणार ? अगदी लीला चिटणीस तरी काय करणार ? मग बाकीच्यांची बिचाऱ्यांची नावं लिहून त्यांना का यांत ओढावं ? –खर्चबिर्च बरा केला होता. रेडिओ, पाळणा, फिरती खुर्ची वगैरे सामान कोरं करकरीत होतं. शिवाय सुधीर फडक्यांचे (कळले तर) एक तुटक तुटक गाणे ! (जसे एका आगामी नाटकात छोटया गंधर्वांचे पार्श्वगायन ! ) ...मागे पडद्यावर निळा लाईट-बिईट बरा. फायरप्लेस का काहीतरी नाटकात आहे काहो ? प्रेक्षका ! किती सांगू तुला ? मज चैन नसे ऽऽ

–आशिष

# भिंतीच्या तुंबड्या सुधाकर राजे

## □ चारित्र्याचा एकच प्याला

हिंदुस्थानी माणसाच्या चारित्र्याचा अध:पात का झाला याची अनेकांनी अनेक कारणे सांगितली आहेत; पण दारू न प्याल्याने हा अध:पात झाला असे नगा-पाणी न करता म्हणणारा कोणी निघेल याची कल्पना नव्हती. सत्य आणि कल्पना यांतला हाच फरक. कारण नुकतीच एक " अखिल भारतीय मद्यप्रेमी संस्था " स्थापित झाली असून " सरकारच्या दारूबंदी धोरणामुळे राष्ट्राचा जो नैतिक अध:पात झाला आहे, त्याच्याविरुद्ध झगडणे " हे या संस्थेचे उदात्त ध्येय असल्याचे जाहीर करण्यात आले आहे.

आता तळीरामाच्या आर्य मदिरामंडळाच्या घटनेत असे काही उच्च उदात्त कलम होते की नाही, हे त्या सुधाकरालाही ठाऊक नसेल. पण चरित्र्याचा एकच प्याला झोकून संस्कृतीचे शिखर गाठण्याची ही अफलातून कल्पना या सुधाकराला मात्र एकदम पटली. कारण आता नंदाजींच्या सदाचार समितिवाल्यांनी मुंबईच्या हात-भट्टीवाल्यांशी हातमिळवणी केली, की चारित्र्याचा हा प्रश्न एका घोटात निकालात निघेल. आता अडचण एवढीच की चारित्र्याचा अध:पाताचे जे अनेक प्रकार आहेत, त्या प्रत्येकावर कुठल्या ब्रॅन्डची उपाययोजना परिणामकारक ठरेल याचे पद्धतशीर वर्गीकरण करावे लागेल. उदाहरणार्थ, पाच-दहा रुपयांची चिरीमिरी घेऊन फाइल पुढे सरकवणाऱ्या कारकुनाचे चारित्र्य सुधारण्यासाठी बियरचा एखादा पेग पुरे. तेच लाखो रुपये खिशात घालून आयात निर्यात परवाने वाटणाऱ्य मंत्र्याला सक्तीने व्हिस्कीची सबंध बाटली रोज प्यायला लावली तरच देशाचा तरणोपाय आहे. काळा बाजार बंद करायला आता एकच उपाय व्हाइट हॉर्स ! भेसळ करण्याची वृत्ती नष्ट करायची तर पाणी न मिसळलेली ब्रँडी पाजली पाहिजे, अन् कर चुकविण्याची बदमाषी बंद करायची असेल तर न चुकता रमचा रतीब लावला पाहिजे. राहता राहिले चोर-दरोडेखोर. त्यांच्यासाठी खेड्यापाड्यां-तून नवटाक चारित्र्याचे गुत्ते उघडले की काम फत्ते !

## □ फॅशनेबल रद्दी

परमेश्वराची लीला अतर्क्य असेल किंवा नसेल, पण अमेरिकन बायकांची फॅशन अतर्क्य आहे यात शंका नाही. परवाच वाचले की अमेरिकतल्या एका डिपार्टमेंटल स्टोअरने कागदाचे झगे विकायला काढले अन् ते चुटकीसरसे खपले. आमची ही अजून क्रिकल जॉर्जेट, ट्रिकल नायलॉन, टू बाय टूच्या पुराण काळात वावरत असताना तिकडे अमेरिकन बायकांनी फॅशनेबल रद्दीपर्यंत मजल मारलेली पाहून माझी खात्री झाली आहे की, ' अंगभर कपडा ' ही माणसाची एक मूलभूत सम-

जली गेलेली गरज संपुष्टात आली आहे. आता माणसाला लज्जारक्षणासाठी अंगभर कपडा नको. कालचे वर्तमानपत्र असले की पुरे.

अर्थात कापडात असतात तशा कागदांतही फॅशन्स आल्या. अमेरिकन लक्षाधीश आर्ट पेपरचा सूट वापरेल, तर हिंदुस्थानातला गरीब माणूस न्यूजप्रिंटच्या लंगोटीवर भागवील. माझ्यासारखा मध्यमवर्गीय इसम 'व्हाईट प्रिंट'चा शर्ट करावा की जरा चैन म्हणून 'मेकॅनिकल ग्लेझ'चा बुशकोट करावा, याचा विचार करील, तर राजकीय पुढारी चक्क हॅंडमेड कुरता घालून फिरतील. रद्दीवाले आपल्या रद्दीत किती भारतीय वर्तमानपत्रे अन् किती विलायती मासिके आहेत हे पाहून साड्यांचे दुकान काढायचे की फक्त रेडीमेड बाबासूट ठेवायचे हे ठरवील. प्राचीन पंडितांच्या घरी सरस्वती पाणी भरीत असे. आधुनिक पंडिताच्या घरी ती कपडे शिवणार. कारण प्रत्येक पुस्तकातले ज्ञान आता शर्ट-सदऱ्याचा रूपाने अक्षरशः अंगाखांद्यावर खेळवता येणार.

## □ सॅटीनची लंगोटी ?

चैनीची व्याख्या मोठी कठीण आहे. लहानपणी शेजारचा आजीबाईंनी शेंगदाण्याचे कूट करून देण्याचा लेबरचार्ज म्हणून खडीसाखरेचा खडा हातावर ठेवला की माझी चैन व्हायची. मोठेपणी आतापर्यंत वाटत होते की लंडन–पॅरीस–न्यूयॉर्कमधल्या आलिशान हॉटेलांतून अखंड वाहणाऱ्या शॅंपेनच्या नदीत मनसोक्त डुंबणे ही खरी चैन असावी. पण परवा ऑस्ट्रेलियाच्या गव्हर्नरसाहेबांनी सांगितले की ऑस्ट्रेलियाच्या एका अगदी ओसाड प्रदेशात राहणारे आदिवासी दरमहा पाचशे डॉलर कमवीत आहेत अन् ते सगळे चैनबाजीवर उधळीत आहेत. आता बोला ! ही मंडळी नक्की कुठली चैन करतात याचे स्पष्टीकरण गव्हर्नरसाहेबांनी केलेले नाही. पण कधी काळी भारतीय अदिवासींचे जीवनमान भलतेच वाढून ते चैनबाजी करायला लागले तर काय करतील याची कल्पना करायला हरकत नाही.

पहिली गोष्ट म्हणजे त्यांचा पोशाखीपणा वाढेल. म्हणजे ते सॅटीनची लंगोटी वापरायला लागतील; इतकेच नाही तर अमेरिकन माणसाजवळ कुठल्या मेकच्या किती मोटारगाड्या आहेत हे ज्याप्रमाणे त्याच्या चैनीचे गमक असते त्याप्रमाणे आमच्या अदिवासीजवळ सॅटीनच्या लंगोट्या किती, टेरिलीनच्या लंगोट्या किती आणि हिवाळ्यासाठी टेरीवूलच्या लंगोट्या किती यावरून त्याच्या चैनीचे मोजमाप होऊ लागेल, दुसरे म्हणजे तो खाण्या-पिण्याची चंगळ करील. महाराष्ट्रातल्या काही दुष्काळग्रस्त भागांतले अदिवासी गवत खाऊन जगत आहेत असे मागे वाचले होते. अर्थात ही परिस्थिती पार बदलेल व ते देशी गवताऐवजी इम्पोर्टेड 'चायना ग्रास' खाऊ लागतील, अर्थात् त्यांचा बायकांची फॅशन वाढेल हे सांगायला नकोच. त्या दातांना काळा रंग लावतात तो यापुढे थेट मॅक्सफॅक्टरहून मागविण्यात येईल.

●

# राशी भविष्य : श्री. बी. डी. घाणेकर : भृगुसंहितातज्ज्ञ

## दिनांक ४ सप्टेंबर ते ११ सप्टेंबर १९६६

**मेष :** आपला राशीस्वामी जरी अशुभ स्थितीत आहे, तरी दोन तीन ग्रह या सप्ताहात आपणांस अनुकूल आहेत. त्यामुळे अडचणी दूर होऊन काहीसे अनुकूल वातावरण निर्माण होईल. ज्यांचे कृत्तिका नक्षत्र प्रथमचरण असेल, त्यांना आरोग्य विषयक व घरातील थोर स्त्रीस त्रास होईल. विद्यार्थ्यांना विद्येत यश प्राप्ती. घरात पाहुणे मंडळींची ये – जा होऊन खर्च वाढेल. दि. ९–१० अकारण द्रव्य खर्च होईल. महत्त्वाचे कार्य लांबणीवर टाकावे, कोणतेही नवीन कार्य हाती घेऊ नये. स्त्रियांचे बाबतीत गृहसौख्य चांगले मिळून मुले मनाप्रमाणे वागतील. कौटुंबिक त्रास कमी होण्याकरिता व मानसिक स्वास्थ्य कमी होण्याकरिता मंगलमूर्तीचे स्मरण करावे, म्हणजे विघ्ने टळतील. ता. ५ व ९ शुभ.

**वृषभ :** आपला राशीस्वामी सुखस्थानात येत आहे. एक राहू सोडल्यास इतर ग्रह आपणांस अनुकूल आहेत. या सप्ताहात पत्नीच्या प्रकृतीस थोडा त्रास होईल. आर्थिक दृष्टया विद्यार्थ्यांस विद्येमध्ये अडचणी निर्माण होतील. विद्येत मन लागणार नाही. मित्रांपासून सहकार्य मिळेल. दि. ४ व ५ मनाविरुद्ध घटना घडतील. मानसिक स्वास्थ्य बिघडेल. दि. ९ व ११ या तारखा शुभ. आकस्मिक प्राप्ती व येणे असलेले पैसे वसूल होतील. कुटुंबीय मंडळींच्या औषधपाण्याकरिता खर्च होईल. शक्य तो प्रवास टाळावा, कोर्टकामे लांबणीवर टाकावीत. १ ऑक्टोबर-पर्यंत तरी आपणांस असा मधून–मधून कौटुंबिक त्रास सहन करावा लागेल. आर्थिक दृष्टया सप्ताह चांगला आहे. स्त्रियांचे बाबतीत पतीला वरिष्ठ अधिकाऱ्यांपासून त्रास व बदलीचा योग आहे. मना करा रे प्रसन्न, सर्व सिद्धीचे कारण ।। १ ।। मन उल्हासित ठेवा – कार्यसिद्धी होईल.

**मिथुन :** धनस्थानात गुरू. पराक्रमात दोन–तीन ग्रह अनुकूल. त्यामुळे आपणांस हा सप्ताह फारच अनुकूल आहे. स्वपराक्रमाने पुढे येऊन लोक आपली

वाहवा करतील. नोकरीच्या बाबतीत, इन्क्रीमेंटमध्ये वाढीबद्दल अडथळे निर्माण झाले होते; ते आता दूर होतील. वरिष्ठांची मर्जी संपादाल. अधिकाराचाही योग आहे. ग्रहांची इतकी मर्जी आहे की —

जब जानकीनाथ सहाय्य करे।
तब कौन बिघार करे नर तेरो ।।

अशी स्थिती आहे. ग्रहांची अनुकूलता म्हणजे ईश्वरी कृपाच ! दि. ४–५ विशेष अनुकूल. ७–८ प्रतिकूल. मानसिक स्वास्थ्य बिघडेल. संततीचे तब्बेतीस किरकोळ त्रास. स्त्रियांचे बाबतीत आपल्या पतिराजांची आर्थिक स्थिती बरी असल्यामुळे आपले ते मनोरथ पूर्ण करतील यात शंकाच नाही.

**कर्क :** आता आपल्या राशीत गुरु आला आहे व धनस्थानात तीन ग्रहांची बैठक व भाग्यात शनी आहे. अशी आकाशस्थ ग्रहांची स्थिती असल्यामुळे आपणास चिंतेचे कारण नाही. मनाजोगत्या घटना घडून आकस्मिक लाभाचा योग. ज्यांचे पुनर्वसू नक्षत्र तृतीय चरण असेल, त्यांना हा सप्ताह फारच शुभ आहे. बेकारांस नोकरी. व्यापाऱ्यांस व्यापारामध्ये उत्तम यश. नोकरी करणारांना प्रतिष्ठा व बढतीचा योग असून लांबच्या प्रवासाचाही योग आहे. विद्यार्थ्यांना विद्येत यश. स्त्रियांच्या चितीत गोष्टी साध्य होऊन मुले मनाजोगी वागतील. संसारात नवीन वस्तूची भर पडेल. सर्व लोक आपली प्रशंसा करून कर्तबगार असल्याचे ऐकवतील. अविवाहितांच्या विवाहाबद्दल वाटाघाटी होऊन विवाह ठरतील. दि. ७–८ जास्ती शुभ.

**सिंह :** रवी व बुध हे दोन ग्रह सोडल्यास २–३ जबरदस्त ग्रह आपणांस प्रतिकूल आहेत. त्यामुळे मानसिक नैराश्य वाढून कार्यात अडथळे निर्माण होतील. उष्ण विकारापासून तब्बेतीस त्रास होईल,

तुका म्हणे एथ, नाही चाले तातडी।
प्राप्त घडी काल आल्याविना ।।

सध्या आपणांस हा काल प्रतिकूल असल्यामुळे तुकारामाच्या उक्तीप्रमाणे काही काल हा आपण शांततेतच काढावा. निदान १ ऑक्टोबरपर्यंत तरी जास्ती प्रतिकूलता आहे. कुटुंबीय व इतर मंडळीही आपणांशी नाहक वादविवाद करतील. दि. ८–९ प्रतिकूल. मनाविरुद्ध घटना घडतील. नवे कार्य करायचे काम अंगावर घेऊ नये. प्रवास टाळावा. संततीस व पत्नीसही शारिरीक त्रास होईल.

**कन्या :** आपणांस गुरू अनुकूल आहे व मग शुभफल का नाही, असे आपण विचाराल. थांबा ! निराश होऊ नका. याला थोडासा अवधी आहे. दि. १६

सप्टेंबरपासून गुरूमहाराजांचे शुभफल दिसू लागेल. एवढे उतावीळ होऊ नका. ज्यांचे उत्तरा नक्षत्र द्वितीय चरण असेल; त्यांना हा सप्ताह फायदेशीर आहे. आस्ते आस्ते सर्वच गोष्टी मनाजोगत्या होणार आहेत. व्यापाऱ्यांना धंद्यात फायदा, बेकारास नोकरी. स्त्रियांचे बाबतीत त्यांना पुत्रप्राप्ती होईल. [काहींची मुले त्यांच्या मनाजोगती वागतील. येणे असलेले पैसे वसूल होतील. आर्थिक स्थिती सुधारेल. दि. ४–५ जपून. १०–११ शुभ आहेत. कोणत्याही कार्यात धडाडीने यश. धीरा-धीराने सर्व गोष्टी मार्गाला लागतील.

तूळ : लाभात ३ ग्रह दशमान गुरू मंगळ–इतकी ग्रहांची अनुकूलता असल्यावर काळजीचे कारण नाही व्यापाऱ्यांस फायदा आकस्मिक लाभांचा योग. आता कोण-त्याही कार्यांत यशप्राप्ती ही ठरलेलीच. नवीन व्यवसाय व करार होतील. कला-वंतास अधिक अनुकूल. दि. १६ सप्टेंबरपर्यंतच अत्त्युत्तम काल असल्यामुळे या कालातच कुठल्याही गोष्टी जरूर कराव्यात म्हणजे त्या सिद्धीस जातील. वरिष्ट लोकांत मान, प्रसिद्धी, नोकरीत बढती असा योग आहे. आजचे काम आजच करा उद्यावर ढकलू नका. दि. ७–८ प्रतिकूल प्रवासाचा योग दि. ९, ११ हे जास्ती शुभ. पत्नीविरह सहन करावा लागेल. [ पत्नी माहेरी जाईल. ]

वृश्चिक : भाग्यातून गुरूचे परिभ्रर्मण व दशमान स्वगृही रवी या दोन जबरदस्त ग्रहांच्या अनुकूलतेमुळे आपणांस कोणतेही कार्य सुकर होईल. चिंतेचे वातावरण संपले. विद्यार्थ्यांना विद्येत उत्तम यश. कुमारीकांनो चिंता करू नका. आता आपले विवाह जमून येतील. ज्यांचे विशाखा नक्षत्र चतुर्थ चरण असेल त्यांना हा सप्ताह अधिक शुभ जाईल. स्त्रियांची पुत्रप्राप्तीची इच्छा पूर्ण होईल मात्र दि. ९–१० प्रति-कूल. ११ पासून पुढे आनंदी वातावरण विघ्नहर्त्या गणेशाची आपणांवर कृपादृष्टी आहे. सर्व संकटे दूर होऊन मनाजोगत्या गोष्टी घडून येतील. बेकारांस नोकरी उत्साही वातावरण राहील. दि. १६ पासून काळ अनुकूल, अकस्मिक अर्थप्राप्ती व कोर्टकामात यश येईल. घरात धार्मिक कार्य घडून तीर्थयात्रेचाही योग आहे.

धनू : आपल्या राशीस आठवा मंगळ व गुरू आहे. रवि बुधाची मात्र अनुकूलता आहे. हा सप्ताह आपण परिस्थितीशी झगडून काढला पाहिजे. आपले मित्र व सह-कारी आपणांस पोकळ आश्वासने देतील. प्रत्यक्ष कृती मात्र होणार नाही. कोणा-च्यांही गोड बोलण्यावर विश्वास ठेवू नका. समर्थ वचनाप्रमाणे

मनुष्य पारखोनि। धरावा जवळि दूरी ।। १ ।।

कारण पैशाचा अपव्यय किंवा पैसे गुंतून पडण्याचा योग आहे. व्यवहारात सावधान-तेने वागावे. दिनांक ४-५ प्रतिकूल. विद्यार्थ्यांस बऱ्याच अडचणी. विद्येत मन लाग-

णार नाही. जागरणे करू नयेत. प्रवास टाळावा. स्त्रियांचे बाबतीत पतीच्या आर्थिक अवस्थेमुळे घरात वादविवाद मुलांच्या प्रकृतीस जपावे.

**मकर :** सप्तमात गुरू-मंगळ, अष्टमात रवी आहे. त्यामुळे दूरचा प्रवास, बदलीचा योग, कुटुंबापासून दूर राहण्याचा योग. ज्याचे उत्तराषाढा नक्षत्र द्वितीय चरण असेल त्यांना हा जास्त शुभ सप्ताह आहे. दि. ११, १२ जास्ती शुभ. १६ सप्टेंबर पासून अनुकूल वातावरण निर्माण होईल. आपणांस अजून दोन महिने तरी थोडा त्रास सहन करावा लागेल. नंतरचा काळ आपणांस शुभ आहे. तेथले वातावरण जास्ती शुभ आहे. स्त्रियांचे बाबतीत पतीचे तब्येतीस थोडा त्रास राहील. कोर्टकामे लांबणीवर टाकावीत शस्त्रक्रिया करू नयेत. विद्यार्थ्यांस १६ सप्टेंबरपर्यंत प्रतिकूल नंतर शुभ. उष्ण विकारापासून तब्येतीस त्रास. बोलण्यावर संयम ठेवा. अकारण शत्रुत्व निर्माण करण्यास ते कारण होईल.

**कुंभ :** या राशीत ग्रहमानाची बरीच प्रतिकूलता आहे. कितीही प्रामाणिक राहिलात तरी इतरांना ते पटणार नाही. घरात कोणी ना कोणी आजारी होऊन द्रव्यखर्च होईल.

मनसा चिंतितं कार्यं । दैवं अन्यत्र चिन्तयेत ॥ १ ॥

आपण योजता एक, पण दैव प्रतिकूलतेमुळे होते मात्र भलतेच. आगामी २-२॥ महिने आपणांस बरेच प्रतिकूल आहेत. म्हणून संकट निवारणार्थ व मानसिक धैर्य प्राप्तीकरिता गजाननाची उपासना करावी म्हणजे हां हां म्हणता प्रतिकूल स्थिती निघून जाईल. स्त्रियांचे बाबतील प्रपंचात अडचणी निर्माण होतील. विद्यार्थ्यांचे विद्येत लक्ष राहणार नाही.

**मीन :** पंचमात गुरू, मंगळ व षष्ठात रवी अशी ग्रहांची स्थिती आहे. आपणांस जरी साडेसाती चालू आहे तरी गुरुकृपेमुळे त्याचा [साडेसातीचा] त्रास होणार नाही. वरिष्ठांची मर्जी. नोकरीत बढती. पुत्रसौख्य चांगले मिळेल. अविवाहितांचे विवाह जमतील. विद्यार्थ्यांना विद्येत उत्तम यशप्राप्ती. संततीचे घरात शुभकार्य जुळून येईल. स्त्रियांचे बाबतीत सर्व गोष्टी मनाजोग्या घडून येणार असल्यामुळे संसार सुखाचा वाटेल. प्रेमिकांना प्रेयसीची उत्तम साथ मिळेल कलावंतांना कलेचा मोबदला व अर्थप्राप्ती आणि उत्तम प्रसिद्धी मिळेल. मानसिक स्वास्थ्य लाभून आनंदी वातावरण राहील. १६-२१ प्रवासाचा योग दि. ९-११ जास्ती शुभ आकस्मिक लाभाचा योग सर्व वातावरण शुभ व आनंदी राहाणार असल्याने बेहद्द खूष राहाल. पत्नी उत्तम सहकार्य देईल.

# ' कॅट बलू '

## खळखळते विडम्बन

'कॅट बलू ' – एका कोवळया, निष्पाप पोरीचं नाव. आपल्या रगेल बापावर तिचे भारी प्रेम. दिवस कसे फुलपाखरांसारखे वाटायचे तिला. पण तिच्या बापावर एका दांडग्या गुंडाचा डोळा होता. अखेरीस त्यानेच आपल्या पिस्तुलाने 'कॅट 'च्या बापाचा निर्दयपणे खून केला. तिला घालवून देऊन गुंडांनी तिचे घर ताब्यात घेतले. 'कॅट' घर सोडून निघाली, पण डगमगली नाही. दोन तरुण नि एक दारूड्या नेमबाज यांच्या साहाय्याने तिने आपला बापाच्या वधाचा सूड घेतला. 'कॅट बलू ' ची कथा ही एवढीच. कथा तशी सनसनाटी, हाणामारी, पिस्तुलांच्या गोळयांनी भरलेली आणि सहज गल्लाभरू व्हावी अशी. परंतु निर्माते हॅरॉल्ड हेच् यांचा तेवढाच उद्देश चित्रनिर्मितीमागे नाही. त्यांनी या कथानकाच्या शिडात विनोदाचा वारा भरला आहे. इंग्रजी चित्रपटात 'काऊबॉय ' चित्रपटांचा स्वतंत्र वर्गच आहे. एका गावच्या मस्तवाल लोकांनी दुसऱ्यांची खोडी काढायची, मग तुफानी घोडदौड, दोन्ही गटांची 'आमने सामने ' लढत, पिस्तुलांच्या गोळयांची पिसाट आतषबाजी, हा या चित्रपटांचा ठरलेला 'फॉर्म्मुला '. त्यातले नायकही ठरलेले. त्यांची ती विशिष्ट हॅट, राकट चेहरा, तंग विजार आणि विजारीच्या दोन्ही बाजूंस अडकवलेली पिस्तुले. सारे काही एकजात सारखे. 'कॅट बलू 'त थट्टा आहे ती अशा 'फॉर्म्युला ' काऊबॉय चित्रपटाची. हे विडंबन मोठ्या कलात्मकतेने केले आहे. त्यात मोठा वाटा आहे तो ली मार्विन या कसलेल्या नटाचा. त्याला यंदाचे 'ॲकेडमी ॲवॉर्ड ' देण्यात आले ते त्याच्या याच चित्रपटातील अभिनय कौशल्याबद्दल.

### ली ने उभा केलेला दारुड्या

सतत झिंगून पडणाऱ्या एका दारूड्याची भूमिका ली मार्विनने केली आहे. मदिरा हाच त्याच्या जीवनाचा स्थायीभाव. फेसाळणारे मद्य उदरात गेले की, मग त्याचे बाहु स्फुरण पावू लागतात. हा दारुड्या त्याने समर्थपणे उभा केला आहे, कायम गुंगून पडलेला, बेफिकीर, हरवल्या-हरवल्यासारखा वाटणारा, दारू ढोसताच जोमाने उफाळून येणारा आवेश, अचूक नेमबाजी करणारा ही त्याची सारी रूपे ली मार्विनने आपल्या अभिनयाने जिवंत केली आहेत. अभिजात दर्जाचा काही हा अभिनय नाही, परंतु दारूड्याच्या या चित्रपटातील पात्राकडून तो अपेक्षितही नाही.

ली मार्विन हे सारे करतो ते अगदी सहजपणे. अभिनय त्याच्या घरी ऋद्धिसिद्धी-सारखा पाणी भरत असावा अशा थाटात. त्याच्या बारीक सारीक हालचालीतून या चित्रपटातील विडंबन फुलले आहे. 'काऊबॉय' चित्रपटाचे नायक विजारीला अडकवलेली पिस्तुले मोठ्या ऐटबाजपणे काढतात. ली मार्विनने जवळ पिस्तुल नसतानाही हे सनसनाटी नायक पिस्तूल कसे काढतात, याचे प्रात्यक्षिक दाखविले आहे. हात विजारीच्या मागील खिशात जाणे, अलगद पिस्तूल काढून हात वाकडा करून त्याने ते एकदम रोखणे, पिस्तूल पकडण्याची ती विशिष्ट लकब सारे काही बेमालूमपणे वठवले आहे.

'कॅट' चे काम केले आहे जेन फोंडा या नटीने. ही पोरगी आहे शाळकरी, जगाचा अनुभव नसलेली. बापाच्या मागे गुंड आहेत. हे समजताच पार घाबरून जाणारी, भेदरणारी ही पोर जेन फोंडाने रंगवली आहे कुशलतेने. सूडाच्या ईर्ष्येने पेटलेली आणि पिस्तूल हातात घेऊन आगगाडी लुटणारी रणरागिणी मात्र तिला उभी करता आली नाही. जेन फोंडाची ती 'प्रकृती'च नाही. तिचा पिंड आहे तो असाच कोवळी कामे करण्याचा. विशेषतः ली मार्विनच्या अभिनयापुढे 'कॅट' फिकी पडते.

चित्रपटात रंग भरला आहे तो दोन गायकांनी. एक काळाकुळकुळीत निग्रो—मिस्किल स्वभावाचा आणि त्याचा गोल गरगरीत चेहऱ्याचा गमत्या जोडीदार. चित्रपट घेतला आहे फ्लॅश बॅक पद्धतीने, त्यामुळे ही दुक्कल आपल्या गाण्यांतून कथेचे पुरण भरत असते. चित्रपट सुरू होतो तो त्यांच्या गाण्याने आणि संपतोही त्यांच्या गायनानेच. 'दि विल नेव्हर मेक हर क्राय' या गीताचे स्वर कायम लक्षात राहावेत.

या साऱ्या कथेतून उपहास आहे परंतु तो उघड उघड नाही. सूचित केला आहे, जाणत्यांनी तो जाणून घ्यावयाचा आहे. हॉटेलात एक मारामारीही घडवून आणली आहे—उद्देश काही नाही. टिंगल एवढाच. दोन प्रसंग मात्र खटकले. ली मार्विन खिशातील पिस्तुले काढायचा प्रयत्न करतो. त्या प्रयत्नात त्याची विजार सैल होते—हा प्रसंग ओंगळ वाटावा असा आहे. दुसऱ्या एका प्रसंगात विनोद करण्याच्या प्रयत्नात क्रूर चेष्टा झाली आहे. 'कॅट'च्या बापाच्या शवपेटिकेभोवती मेणबत्त्या तेवत असतात. झिंगलेल्या ली मार्विनला नशेत हा प्रकार कळत नाही. तो 'हॅपी बर्थ डे टू यू' म्हणत मेणबत्त्यांवर फुंकर घालतो. त्या वेळच्या गांभीर्यात हा प्रसंग खटकतो.

अगदी उच्च 'बिटनिक' पंथात मोडणाराही नाही आणि निव्वळ गल्ला भरण्यासाठी तयार केलेलाही नाही असा हा 'कॅट बलू' खळखळत्या वाहत्या विडंबनात तुम्हा-आम्हांलाही वाहून नेणार ! ●

सोज्वळ ज्यूली आता मन्रो होणार –



## 'मन्रो' होण्याचे स्वप्न पाहणारी

# ज्यूली अँड्र्यूज

गतवर्षीच्या फेब्रुवारी महिन्यातील गोष्ट आहे. न्यूयॉर्कमधील आपल्या घरात टोनी वॅल्टन आपला टी. व्ही. सेट चालू करून बसलेला होता. सन १९६५च्या 'गोल्डन ग्लोब' ॲवॉर्ड वितरण समारंभाची दृश्ये टी. व्ही. वर झळकत होती. त्या समारंभातच त्याची पत्नी ज्यूली अँड्र्यूज 'मेरी पॉपिन्स' ह्या चित्रपटाबद्दल सर्वोत्कृष्ट अभिनेत्रीचे पारितोषिक स्वीकारणार होती. थोड्याच वेळात टी. व्ही. वरील दृश्यात ज्यूली प्रकटली आणि ॲवॉर्ड स्वीकारताना ती जे बोलली त्यामुळे तेथील उपस्थितांत हशा पिकला. टोनीही हसू लागला. ज्यूलीचे उद्‌गार होते, "I would like to thank the man, who made it possible–Jack Warner." ज्यूलीच्या ह्या उद्‌गारांत हसण्याजोगे काय होते, हे ज्यूलीच्या चित्रपटजीवनाची सुरुवात ज्यांना ठाऊक आहे त्यांनाच कळेल. ज्यूलीचे वरील उद्‌गार केवळ विनोदपूर्णच नव्हते तर खोचकतेने भरलेले होते. एक स्वाभिमान, आत्मविश्वास व जिद्द ह्यामागे दडलेली होती.

आज ज्यूलीचे नाव सर्वत्र झाले आहे. 'मेरी पॉपिन्स' ह्या वॉल्ट डिस्नेच्या चित्रपटातील तिच्या भूमिकेबद्दल गतवर्षीचे 'ऑस्कर' पारितोषिक तिने पटकाविले आहे. सिनेसृष्टीतील पहिल्याच पदार्पणात इतके भव्य यश अभावानेच मिळते, तरीदेखील या यशामागे तिची तपश्चर्या आहे. ऑस्कर मिळाल्यानंतर आपली प्रतिक्रिया व्यक्त करताना ती म्हणाली होती, "ज्यांना अचानक यश मिळते त्यांच्याबद्दल मला भारी वाईट वाटते." परंतु ज्यूलीला वाईट वाटण्याचे कारण नाही. कारण, चित्रपटसृष्टीत प्रवेश मिळविण्याअगोदर तिने नाट्यसृष्टीत चांगलीच उमेदवारी केलेली आहे. नाटकाच्या धंद्यात तिचा प्रवेश सहज झाला. तिची आई व सावत्र वडील लंडनला ह्याच धंद्यात काम करीत असल्याने वयाच्या १२ व्या वर्षीच प्रथम ज्यूली स्टेजवर अवतरली. आपल्या वडिलांचे नाव (टेड अँड्र्यूज) लावून तिने प्रथम गाण्याचा जाहीर कार्यक्रम केला. नंतर अर्थात् शालेय शिक्षणाबरोबरच अभिनयाकडे तिने लक्ष पुरविले व वयाच्या अठराव्या वर्षी न्यूयॉर्कच्या रंगभूमीवर तिने पदार्पण केले. 'दि बॉय फ्रेंड' या नाटकात तिला काम मिळाले.

### 'पिग्मॅलियन'चे यश

त्यानंतर काही नाटकातून व ऑपेरांतून तिने कामे केली, परंतु तिला रंगभूमीवर ख्याती प्राप्त झाली ती जॉर्ज बर्नार्ड शॉच्या 'पिग्मॅलियन' या नाटकाने. या

नाटकातील 'एलिझा डूलिटल' हे स्त्रीपात्र साहित्यात अजरामर झाले आहे. ज्यूलीने ह्या भूमिकेत प्राण ओतला व ती भूमिका तिची पेटंट भूमिका बनली. ब्रॉडवेच्या रंगभूमीवर सातत्याने वर्षभर या नाटकाचे प्रयोग झाले व साहजिकच चित्रपट निर्मात्याच्या नजरेत ही नाटयकृती भरली. वॉर्नर ब्रदर्सनी 'माय फेअर लेडी' या नावाने ह्या नाटकावर चित्रपट काढावयाचे ठरविले. चित्रपटाच्या घोषणेनंतरही यातील ज्यूलीची प्रमुख भूमिका तिलाच मिळेल असा अनेकांसह तिचाही समज होता; परंतु धंद्याच्या दृष्टिकोनातून एखाद्या ख्यातनाम तारकेला त्या चित्रपटात काम द्यावयाचे ठरले. ऑड्री हेपबर्नची त्या कामाकरिता निवड झाली. ज्यूलीची संधी हुकली. त्या वेळी हॉलिवुडमधील एक प्रस्थ–अर्ल विल्सन म्हणाला, "She was spurned by Hollywood, because her nose wasn't fashionable" आज मात्र ज्यूली नाक वर करून हॉलिवुडच्या चित्रसृष्टीत वावरत आहे. 'माय फेअर लेडी'मधील भूमिका तिला नाकारताना जॅक वॉर्नर म्हणाला होता, "Nobody in this country ever heard of Julie Andrews. Besides we've got someone much better." हे ऐकून ज्यूलीच्या मानी मनाला काय वाटले असेल ते तिचे तिलाच ठाऊक. परंतु, आपल्या तपश्चर्येपासून ती ढळली नाही.

कधी कधी होते ते बऱ्यासाठी होते म्हणतात. कारण पुढे लवकरच एका नाटकात प्रख्यात निर्माते वॉल्ट डिस्ने ह्यांच्या नजरेत ती भरली आणि त्यांनी तिला अपाल्या 'मेरी पॉपिन्स' या चित्रपटाची नायिका बनविले. पुढे 'माय फेअर लेडी' हा चित्रपट स्पर्धेत असूनही ज्यूलीने ऑस्कर पटकाविले. बहुधा 'गोल्डन ग्लोब' अॅवॉर्ड ज्यांना मिळते, त्यांनाच 'ऑस्कर' मिळते असा एक प्रघात रूढ झाला आहे. आणि म्हणूनच तिने ते पारितोषिक स्वीकारताना खोचकपणे जॅक वॉर्नरचे आभार का मानले हे आता वाचकांच्या लक्षात येईल.

ज्यूली अँड्रूजची कथा अशी आशा–निराशेने भरलेली आहे. कष्ट व वेदना यांना तिच्या जीवनात अनन्यसाधारण स्थान आहे. आपले स्थान प्राप्त करून घेण्यासाठी तिला झगडावे लागले आहे. उपेक्षा सहन करावी लागली आहे. परंतु जसजशी तिला उपेक्षा मिळाली तसतशी ती कार्यप्रवृत्त झाली आहे. टोनीशी तिचे लग्न झाल्यानंतर त्याचा मित्र अर्ल विल्सन म्हणाला होता, "So glad to hear you and Julie tied the knot. By the way, I keep for getting; was it Julie Harris or Julie Wilson you married ?" तिचे नाव सहज कुणाच्या लक्षात राहावे, अशीही परिस्थिती गतवर्षी नव्हती. पण त्यानंतर जिद्दीने तिने जे स्थान मिळविले आहे त्याबद्दल बोलताना ती म्हणते, "I can't go anywhere now without being recognised." आणि तिचे म्हणणे खरे आहे.

हॉलिवुडच्या चित्रपट–जगतातील ती सर्वांत 'बिझी' अभिनेत्री आहे. आतापर्यंत "दि अमेरिकनायझेशन ऑफ् एमिली" "दि पब्लिक आय" हे तिचे चित्रपट प्रसिद्ध झाले असून "दि साऊंड ऑफ् म्युझिक" या चित्रपटातील भूमिकेने तर तिला जागतिक कीर्ती मिळाली आहे. या चित्रपटातील भूमिकेबद्दल तिला 'गोल्डन ग्लोब' अॅवॉर्ड मिळाले आहे. त्याव्यतिरिक्त या चित्रपटाला इतर ५ ऑस्कर्स मिळाली आहेत. याशिवाय नाटक–सिनेमा व्यवसायाशी संबधित नसलेले 'दि लॉस एंजल्स् टाईम्स' चे 'वूमन ऑफ् दि इयर' हे पारितोषिक तिला मिळाले आहे. हे पारितोषिक विविध क्षेत्रांतील १२ प्रमुख स्त्रियांना देण्यात येते. ह्या-वर्षीच्या १२ प्रमुख स्त्रियांत ज्यूली ही एकमेव नटी आहे. 'थिएटर ओनर्स ऑफ अमेरिका" या थिएटर मालकांच्या संघानेदेखील "Star of 1965" म्हणून तिची निवड केली आहे.

सध्या फोटोग्राफर्स, मुलाखती, टी. व्ही. वरील कार्यक्रम, शुटिंग्ज यांत ज्यूली गर्क आहे. परंतु हे सर्व लाभण्यापूर्वी तिला ज्या दिव्यातून जावे लागले आहे, त्याकडे पाहता अपयश ही यशाची पहिली पायरी आहे-हे म्हणणे खरे वाटू लागते. फक्त अपयशाने खचून न जाता मनुष्याने सतत कार्यप्रवण राहिले पाहिजे.

### हॉलिवुडमधील नवे वादळ

सध्या ज्यूलीची प्रमुख भूमिका असलेला "हवाई' हा चित्रपट प्रकाशनाच्या वाटेवर आहे. ह्या चित्रपटाच्या निर्मितीसाठी १२ लक्ष डॉलर खर्च करण्यात आले आहेत. या व्यतिरिक्त आल्फ्रेड हिचकॉकच्या 'टॉर्न कर्टन' ह्या रहस्यमय चित्रपटात ती पॉल न्यूमनबरोबर चमकत आहे. वास्तविक रहस्य चित्रपटातील काम तिला सर्वस्वी नवीन आहे. तिला आवड आहे संगीत–नाटयमय भूमिका करण्याची व रंगभूमीवरील तिचा पिंडही तोच होता व आहे. (ज्यूली अधून–मधून रंगभूमीवरही कामे करते.) तरीदेखील निरनिराळ्या भूमिका साकार करण्याच्या जिद्दीने तिने हे काम पत्करले आहे. 'टॉर्न कर्टन' ह्या चित्रपटात ती प्रथमच आधुनिक पोषाखात दिसेल. कारण ह्या अगोदरचे तिचे चित्रपट विशिष्ट कालासंबंधीचे म्हणजेच पोषाखी होते. 'अमेरिकनायझेशन ऑफ् एमिली' या चित्रपटानंतर 'Sex-pot role' म्हणून तिच्यातील एक नवीन पैलू जरी सर्वांसमोर आला आहे तरी 'सम लाईक इट हॉट' मधील मर्लिन मन्रोसारखी एखादी भूमिका आपणाला मिळावी, अशी ज्यूलीची इच्छा आहे व "All that blood and lust–marvelous" ह्या ऑपेरात थोडयाफार प्रमाणात ती पूर्णही होईल....व तसे झाले तर ज्यूली अँड्र्यूज हॉलिवुडच्या जगतात अजून एक वादळ माजवून टाकील ते निश्चितच आताच्यापेक्षा जोराचे असेल. ह्या ऑक्टोबर १ तारखेस ती ३१ वर्षांची होईल..... म्हणजे अमेरिकन दृष्टिकोनातून ती तरुणच आहे. विशाल शाश्वत व आशादायी भविष्यकाल ज्यूलीपुढे आहे व काळाच्या कसोटीला ती

उतरेल यात शंका नाही कारण जीवनाची नस तिला सापडली आहे. जीवनातील योग्य काम तिला गवसले आहे आणि प्रसिद्ध आंग्ल लेखक कॅरलीलने म्हटलेच आहे, Blessed is he who has found his work; let him ask no other blessedness."

ज्यूलीच्या बाबतीत हे तंतोतंत लागू पडते. कारण आपल्या आजपर्यंतच्या कलाजीवनाची वाटचाल तिने अशीच स्वतंत्ररीत्या, जिद्दीने व आत्मविश्वासाने केलेली आहे व इथून पुढील वाटचालदेखील ती भरभराटीने करील, यात शंका नाही. तिला दुसऱ्या कोणाच्या आशीर्वादाची–साहाय्याची आता अपेक्षा नाही, कारण जेव्हा हवे, तेव्हादेखील तिने ते कोणाकडून घेतलेले नाही.

—जयंतकुमार त्रिभुवन

# दारूने सर्वनाश केलेल्या नटीची शोकांतिका

'डायना बॅरीमूर' या अभिनेत्रीच्या जीवनाची शोकांतिका आहे ही! वयाच्या अठराव्या वर्षी तिने अभिनय क्षेत्रात प्रवेश केला. त्यावेळी अभिनयकला व रंगमंच हेच तिचे जीवन होते. ती तरुण होती, बालीश होती, त्यामुळे बरेच पुरुष तिच्याभोवती पिंगा घालीत. परंतु हा प्रकार फार काळ चालू शकला नाही. काही वर्षातच ब्रॉडवे आणि हॉलिवूड येथील दुहेरी अपयशामुळे ती भयंकर निराश झाली. हे सर्व विसरण्यासाठी तिने मदिरेचा आश्रय घेतला, पण त्यामुळे ती काही प्रसन्न होऊ शकली नाही. १९५५ साली तिला अत्यवस्थ स्थितीत दवाखान्यात दाखल करण्यात आले. डॉक्टरांनी मोठ्या कुशलतेने झोपेच्या २१ गोळ्या तिच्या पोटातून काढल्या. डायनाचे प्राण वाचले. यानंतर पुन्हा तिने चित्रपट व्यवसायात आपले पाऊल रोवण्याचे प्रयत्न सुरू केले. तिच्या आत्मकथेवर आधारलेला 'टू मच टू सून' हा चित्रपटहि निघाला. पण यश व प्रसिद्धी मिळाली नाही. आपल्या पदरात अपयशच आहे याची परत डायनाला जाणीव झाली. ती निराश झाली. १९५९ च्या ख्रिसमसच्या एका रात्री तिने मदिरेचा आश्रय घेण्यास सुरवात केली त्या दिवशी रविवार होता. घायाळ झालेल्या यशाप्रमाणे डायना तडफडत होती. दारू संपली होती. उठायची ताकद नव्हती, पण तडफ कायम होती. ती तशीच बाहेर पडली. मदिरेच्या शोधात ती दुसऱ्या फ्लॅटमधेच शिरली. तिने एक बाटली मिळवली. तिची परिस्थिती फारच बिकट झाली. त्या दिवशी दारूचा पेला हातात घेऊन ती बिछान्यावर पडली ती उठलीच नाही. चार दिवसानंतर तिच्या शवाची उत्तरक्रीया करण्यात आली. त्या निराश अभिनेत्रीच्या कबरेवर लिहिले गेले–"टॉम"

—अशोक आंग्रे

आपण
आपला अंक
कोठून
घेणार ?

स्थानिक विक्रेत्यांकडून घेतला तरी हरकत नाही.
पण वर्गणीदार होण्याचे ठरवत असाल तर
या आकर्षक सवलतीचा आपण विचार करू शकता.
'माणूस' साप्ताहिकाची दिवाळी अंकासहित
वार्षिक वर्गणी आहे रुपये वीस.

१००

पाच वर्षांची वर्गणी होते रुपये शंभर. आपण पाच वर्षांची शंभर रुपये वर्गणी 'माणूस'कडे एकदम भरली तर सहा वर्षे-- एक वर्ष अधिक

माणूस साप्ताहिकाचे अंक आपल्याला घरपोच मिळतील.
म्हणजेच वर्गणीत वीस टक्के सवलत मिळून आपली
वीस रुपये बचत होईल.
आपण मनात आणले तर ही


माणूस पंचवार्षिक ग्राहक योजना

यशस्वी करणे आपल्याला मुळीच अवघड नाही.
स्वावलंबनाचे उद्दिष्ट डोळ्यांसमोर ठेवून,
अधिक अन्नासाठी, अधिक पाण्यासाठी—
'माणूस'ने सव्वा लाखाचे हे प्रस्थान ठेवले आहे.
आपणही या प्रस्थानयात्रेत सहभागी होऊ शकता.
हा प्रजासूय यज्ञ सिद्धीस नेऊ शकता.



रामायणातल्या
त्या छोटया खारीइतका
पुण्य संचय करू शकता.

MANOOS (Weekly) : 40 Paise : Regd. No. M H–649




राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी संगम प्रेस प्रा. लि., ३८३ नारायण पेठ, पुणे २, येथे छापून, ४१९ नारायण पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. **श्री. ग. माजगावकर.**